CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक ३०१ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# नतमस्तक होऊन माफी मागतो

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केल्या छत्रपतींविषयी भावना

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**पालघर, दि.३० ऑगस्ट:**

छत्रपती शिवाजी महाराज माझ्यासाठी आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांसाठी केवळ नाव नाही, आमच्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आराध्य दैवत आहेत. सिंधुदुर्गात जे घडले, त्याबद्दल मी आज माझ्या आराध्य दैवताची मान झुकवून, डोकं टेकवून माफी मागतो. आमच्या आराध्य दैवतापेक्षा मोठे कुणी नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराजांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या.

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पालघर येथील वाढवण बंदराचे भूमीपूजन पार पडले. पंतप्रधानांनी भाषणाच्या सुरुवातीलाच मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेबाबत माफी मागितली. पंतप्रधान म्हणाले की, भाषणाला सुरुवात करण्याआधी मी माझ्या मनातील भावना व्यक्त करतो. भाजपाने ज्यावेळी मला सर्वप्रथम पंतप्रधानपदाचा उमेदवार घोषित केले, त्यावेळी मी सर्वांत



**पालघर जिल्ह्यातील विविध विकासकामांचे लोकार्पण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या दुर्घटनेविषयी माफी मागितली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रामुख्याने उपस्थित होते.**

आधी रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेऊन मी राष्ट्रसेवेच्या नव्या यात्रेची सुरुवात केली होती. कारण, छत्रपती शिवाजी महाराज माझ्यासाठी आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांसाठी केवळ नाव नाही. आम्हा सर्वांसाठी ते आराध्य दैवत आहेत. मी आज माझ्या आराध्य दैवताची त्यांच्या पायावर डोकं ठेवत माफी मागतो.

### आमचे संस्कार वेगळे

विरोधकांकडून होणाऱ्या टीकेला देखील नरेंद्र मोदी यांनी प्रत्युत्तर दिले. आम्ही ते नाहीत, जे रोज स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करीत असतात, देशभक्तांच्या भावनांचा अपमान करतात. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत अपशब्द वापरूनही ते माफी मागत नाही किंवा त्यांना पश्चातापही होत नाही. महाराष्ट्रातील जनतेला त्यांचे संस्कार दिसत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. आमचे संस्कार वेगळे आहेत म्हणून महाराष्ट्रात येताक्षणी मी छत्रपती शिवाजी महाराजांनी माफी मागत आहे. जे लोक छत्रपती शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानतात, त्यांना ज्या वेदना झाल्या आहेत, त्यांची देखील मी माफी मागतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# पाकिस्तानसोबत चर्चेचे युग संपले

## एस. जयशंकर यांनी ठणकावले

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ३० ऑगस्ट**

पाकिस्तानसोबत चर्चा करू, द्विपक्षीय चर्चा होईल, वगैरे शक्यतांना पूर्णविराम मिळाला आहे. पाकिस्तानसोबत चर्चेचे युग आता संपले आहे; कारण या देशात भारतविरोधी धोरण म्हणून दहशतवादाचाच वापर केला आहे, अशा अचूक शब्दांत परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी शेजारी देशाविषयी भारताची भूमिका शुक्रवारी स्पष्ट केली.

भारत आणि पाकिस्तानमध्ये गेल्या काही काळापासून संबंध चिघळले आहेत. दहा वर्षांपासून दोन्ही देशांमधील राजनैतिक चर्चा जवळपास थांबली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एकदा पाकिस्तानला भेट दिली असली तरी, संबंध अजूनही तणावपूर्णच आहेत. दिल्लीतील एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला कठोर शब्दांत ठणकावले. पाकिस्तानसोबत अखंड चर्चेचे युग संपले आहे. यापुढे या देशासोबत कोणतीही चर्चा होणे शक्य नाही, असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

जयशंकर म्हणाले, जोपर्यंत जम्मू-काश्मीरचा संबंध आहे, कलम ३७० निष्प्रभ करण्यात आले आहे. त्यामुळे आपले पाकिस्तानशी कोणत्या प्रकारचे संबंध असू शकतात, हा मुद्दा आहे. मला हे सांगायचे आहे की, भारताची कृती इतरांवर अवलंबून नसेल. आपण निष्क्रीय नाही आणि घटना सकारात्मक किंवा नकारात्मक दिशा घेत असली तरी आपण कोणत्याही प्रकारे प्रतिक्रिया देऊ. काही दिवसांपूर्वी बांगलादेशात सत्ताबदल झाला. आम्हाला तत्कालीन सरकारशी बोलावे लागेल, हे स्वाभाविक आहे. सत्तेत बदल झाले आहेत.

## ▶▶ महत्त्वाचे...

### चम्पई सोरेन यांचा भाजपात प्रवेश

**रांची :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन यांनी शुक्रवारी भाजपात प्रवेश केला. केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी सोरेन यांचे भाजपात स्वागत केले. चम्पई सोरेन यांनी दोन दिवसांपूर्वीच झारखंड मुक्ती मोर्चाचा राजीनामा दिला होता. त्याचवेळी त्यांनी, आपण नवा पक्ष काढणार नसून, भाजपात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले होते. सोरेन यांच्यासोबत त्यांच्या शेकडो समर्थकांनीही आज भाजपात प्रवेश केला.

### कर्ज वसुली एजंट म्हणजे गुंडांची टोळी

**नवी दिल्ली :** बँकांच्या वतीने कर्ज वसुली करणाऱ्या एजंटचा समूह म्हणजे गुंडांची टोळी असून, कर्जाच्या रकमेची तडजोड झाल्यानंतर ते ग्राहकांना त्यांचे वाहन परत करीत नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी संताप व्यक्त केला. कोलकात्यातील देबाशिष रॉय नावाच्या व्यक्तीने बस खरेदी करण्यासाठी बँक ऑफ इंडियाकडून १५ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्याने बँकेच्या एजंटसोबत कर्जाच्या रकमेबाबत तडजोडही केली होती. असे असतानाही त्याचे वाहन अद्याप परत करण्यात आले नाही. हा प्रकार केवळ गुंडगिरीचाच आहे, असे स्पष्ट करताना न्या. सूर्य कांत आणि न्या. उज्ज्वल भूयान यांच्या न्यायासनाने ही संपूर्ण रक्कम या एजंटकडून वसूल करण्याचा आणि दोन महिन्यांच्या आत गुन्हा दाखल करण्याचा आदेश कोलकाता पोलिसांना दिला.

### पंतप्रधान प्रथमच ब्रुनेई दौऱ्यावर जाणार

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी ३ आणि ४ सप्टेंबरला ब्रुनेईच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने याला दुजोरा दिला असून ब्रुनेईला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरणार आहेत. ब्रुनेईसोबतचे द्विपक्षीय संबंध मजबूत करणे आणि आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय सहकार्याला प्रोत्साहन देणे, हा या दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे. ब्रुनेई हा दक्षिणपूर्व आशियातील एक देश असून तो समृद्धी आणि नैसर्गिक संसाधनांसाठी विशेषत: तेल आणि वायूच्या क्षेत्रात ओळखला जातो.

### पडझडीनंतर बाजारात विक्रमी भरारी

**मुंबई :** गेल्या काही दिवसांत आस्ते कदम वाटचाल करणाऱ्या निर्देशांकाने शुक्रवारी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी गुंतवणूकदारांना मोठी भेट दिली. शुक्रवारी मुंबई शेअर बाजारातील व्यवहारांना सुरुवात होताच निर्देशांक व पाठोपाठ निफ्टी ५० नंही विक्रमी कामगिरीची नोंद केली आहे. सुरुवातीच्या काही व्यवहारांनंतर निर्देशांकाने थेट ८२ हजार ६३७ पर्यंत मजल मारली. आत्तापर्यंतची ही निर्देशांकाची सर्वोत्तम कामगिरी आहे.



**पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत शुक्रवारी भारतीय खेळाडूंनी कमालीची कामगिरी करीत भारताला सुवर्णपदकासह खाते उघडून दिले. अवनी लेखराने नेमबाजीत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले, तर मनीष नरवालने रौप्य व मोना अग्रवालने कांस्यपदक पटकावले. प्रीती पालने महिलांच्या शंभर मीटर शर्यतीत कांस्यपदक मिळविले.** (वृत्त पान ६ वर)

# अपघात नियंत्रणासाठी प्रशिक्षित चालकांची गरज

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

## राज्यातील पहिल्या चालक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**वृत्तसंस्था,**
**अमरावती, ३० ऑगस्ट**

देशामध्ये राष्ट्रीय महामार्ग व रस्ते बांधणीची कामे वेगाने सुरू असून वाहतुकीचा वेग वाढला आहे. वाढत्या वेगासोबतच रस्ते अपघातांची वाढ चिंताजनक आहे. अपघातासाठी चालक परिपूर्ण प्रशिक्षित नसणे हे एक मुख्य कारण आहे. अपघात कमी करण्यासाठी वाहनचालकांना योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे असून प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उत्तम प्रशिक्षित वाहनचालक निर्माण होऊन अपघात कमी होण्यास निश्चित मदत होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.



मार्डी रोडवरील प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन शुक्रवारी दुपारी नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले, तेव्हा ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, विभागीय परिवहन अधिकारी उर्मिला पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, सिपना शिक्षण प्रसारक मंडळ व प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष जगदीश गुप्ता प्रामुख्याने उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले, रस्ता सुरक्षा व अपघात कमी करण्यासाठी केंद्र सरकार उपाययोजना करीत आहे. ऑटोमॅटिक ब्रेकिंग सिस्टिम, आधुनिक तंत्राचा वापर करून अपघात नियंत्रण सुविधा निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. देश-विदेशात २२ लाखांपेक्षा जास्त प्रशिक्षित वाहनचालकांची गरज आहे. यातून बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहे. पेट्रोल व डिझेलचा पर्याय इलेक्ट्रिक वाहन, सीएनजी, इथेनॉलला प्रोत्साहन देण्यात येत आहे. देशात लवकरच ४०० इथेनॉलचे पंप सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्राच्या विकासात विरोधकांचा खोडा

## वाढवण बंदराच्या उद्घाटनावेळी मोदींचा हल्ला

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, ३० ऑगस्ट**

गेल्या ६० वर्षांमध्ये वाढवण बंदराचा विकास होणे अपेक्षित होते. मात्र, तो झाला नाही. वाढवणच्या आणि महाराष्ट्राच्या विकासकामांना विरोधकांमुळे ब्रेक लागला आहे, अशी सडकून टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.



वाढवण बंदराच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, महाराष्ट्रातील विरोधकांनी राज्याच्या विकासाला ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला. आपल्या देशाला अनेक वर्षांपासून व्यापारासाठी आधुनिक बंदरांची गरज होती, त्यासाठी पालघर सर्वांत जास्त योग्य जागा आहे. पण, या प्रकल्पाला ६० वर्षे लटकवून ठेवण्यात आले. या महत्त्वाच्या कामाला काही लोकांनी सुरुवातच होऊ दिली नाही. २०१४ मध्ये आपण आम्हाला दिल्लीत काम करण्याची संधी दिली. २०१६ मध्ये देवेंद्र फडणवीसांची राज्यात सत्ता आली, तेव्हा त्यांनी यावर गांभीर्याने काम सुरू केले. २०२० मध्ये बंदर बनवण्याचा निर्णय घेण्यात आला; पण तेव्हा सरकार बदलल्याने कोणतेही काम अडीच वर्षे झाले नाही. या एकाच प्रकल्पामुळे या ठिकाणी लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. १२ लाख रोजगार येणार आहेत. या विकासाला कोणाचा विरोध होता, महाराष्ट्राच्या विकासाला ब्रेक लावणारे हे कोण लोक होते, राज्यातील तरुणांना रोजगार मिळण्यास कोणाचा आक्षेप होता, आधीच्या सरकारने हे काम पुढे का नाही नेले.

# रा. स्व. संघाची पलक्कड येथे आजपासून समन्वय बैठक

**नवी दिल्ली, ३० ऑगस्ट**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक शनिवार ३१ ऑगस्ट ते सोमवार २ सप्टेंबरदरम्यान केरळमधील पलक्कड येथे होत आहे.



मागील वर्षी ही बैठक सप्टेंबर महिन्यात पुण्यात झाली होती. या बैठकीतत संघ प्रेरित विविध संघटनांमध्ये कार्यरत प्रमुख पदाधिकारी सहभागी होत असतात. या सर्व संघटना समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांत सकारात्मक कार्यात लोकतांत्रिक पद्धतीने सामाजिक परिवर्तनासाठी सक्रिय असतात. या तीन दिवसीय अखिल भारतीय बैठकीचे आयोजन सामान्यत: वर्षातून एकदा केले जाते.

बैठकीत विविध संघटनांचे कार्यकर्ते आपल्या कार्याची माहिती आणि अनुभवांचे आदान-प्रदान करतील. राष्ट्रीय हिताच्या विविध विषयांसंदर्भात वर्तमान परिस्थितीत घडणाऱ्या घटना तसेच सामाजिक परिवर्तनाच्या विविध आयामांवरील योजनांविषयी बैठकीत चर्चा होईल. सर्व संघटनांचा विविध विषयांवर परस्पर सहयोग आणि समन्वय अधिक वृद्धिंगत करण्यासाठीच्या उपायांवरही यावेळी विचार केला जाईल. बैठकीत सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे आदी सहभागी होतील.

# सहावेळा आमदार झालोय, आता मुलाला निवडून द्या

## आ. बबनराव शिंदे यांची मतदारांना साद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० ऑगस्ट-**

मी आयुष्यभर लोकात राहून काम केलं आणि त्यामुळेच तुम्ही मला आजवर सहावेळा विक्रमी मताधिक्याने विजयी केले. आता यंदाच्या निवडणुकीत माझ्याऐवजी मुलगा रणजीतला संधी द्या, असं आवाहन माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांनी केले.

बबनराव शिंदे हे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे आमदार आहेत. बबनराव शिंदे यांच्या या वक्तव्यानंतर ते माढा विधानसभेच्या रिंगणात नसून त्यांनी





माघार घेतल्याचे यावर शिक्कामोर्तब झाले आहे. पंढरपूर तालुक्यातील विविध विकास कामांच्या उद्घाटनप्रसंगी आमदार शिंदे यांनी पहिल्यांदाच थेट मुलाला निवडणुकीत उतरवणार असल्याचे जाहीर केले.ते पुढे म्हणाले की, पंढरपूर तालुक्यातील ४२ गावे ही माढा विधानसभा मतदारसंघात असून आपण या भागात खूप काम केले आहे. मला तुम्ही प्रत्येकवेळेला भरभरून मताधिक्य देऊन विजयी केले. तशी एक संधी आमच्या रणजीत भैय्यालाही द्या. तो कसे काम करतो हे पाहा. जर तुम्हाला काम नाही आवडलं तर पुढच्या वेळी मत द्यायचं की नाही ते ठरवा. मात्र या वेळेला भैय्याच्या पाठीमागे उभे राहा. कामाच्या माणसालाच निवडून देणे गरजेचे असून प्रत्येकवेळी माझ्याकडून जास्तीत जास्त कामे करण्याचा प्रयत्न मी केला आहे. गरिबातला गरीब माणूस जरी दिसला तरी मी गाडी थांबून बोलतो. अशाच पद्धतीने रणजीत भैय्याही काम करेल. जनता हीच माझी ताकद आहे आणि त्यामुळेच तुम्ही माझ्याप्रमाणे भैय्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे.

### अपक्ष लढण्याची चर्चा

लोकसभेच्या पराभवानंतर सोलापूर जिल्ह्यात अनेकजण राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भेटीला जात असून मागील काही दिवसांपूर्वी शिंदे पिता पुत्रानीही त्यांची भेट घेतली होती. आता माढ्यातून आमदार बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजीतसिंह शिंदे हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे घड्याळ सोडून तुतारी हाती घेणार का हे पहावं लागेल. मात्र माढ्यातून रणजीतसिंह शिंदे यांना तुतारी न मिळाल्यास ते महायुतीतून न लढता अपक्ष लढतील अशी चर्चा आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### वैरागच्या सुवर्णलता गांधी महाविद्यालयात जागर जाणिवांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**वैराग, दि. ३० ऑगस्ट-**

येथील सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालयात जागर जाणिवांचा कार्यक्रमांतर्गत निर्भया पथकाचा कार्यक्रम पार पडला. निर्भया पथक प्रमुख अभिजीत घाटे यांनी मुलींच्या संरक्षणासाठी कायदा सदैव तत्पर आहे. आई-वडिलांची व गुरूंची शिकवण आत्मसात केली तर तुमचे आयुष्य सुजलाम् सुफलाम् होईल. चांगल्या गोष्टी आत्मसात करण्यासाठी सदैव प्रयत्नशील रहा. कोणत्याही वाईट गोष्टींना बळी पडू नका. कोणत्याही संकटप्रसंगी निर्भया पथक हे तुमच्या पाठीशी आहे, असे सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शकील शेख होते. याप्रसंगी डॉ. शेख म्हणाले की, निर्भया पथक प्रत्येक ठिकाणी आपल्या मदतीस तयार असते. मुलींनी कोणत्याही गोष्टीची तक्रार धाडसाने पुढे येऊन निर्भया पथकाकडे करावी. किसन कोलते, पोलीस कॉन्स्टेबल शरद पाटकर उपस्थित होते. सूत्रसंचालन पूजा काळोखे हिने तर आभार स्नेहा चव्हाण हिने मानले.



### अक्कलकोट येथे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा उत्साहात

**अक्कलकोट, दि. ३० ऑगस्ट-**

प्रियदर्शनी सांस्कृतिक सभागृहात पर्यावरण पूरक गणेशोत्सव संपन्न होण्याच्या दृष्टीने पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळा संपन्न झाली. विविध शाळातील दीड हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. सदर कार्यशाळा श्री वटवृक्ष देवस्थान समिती अक्कलकोट, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट, लोकमान्य गणेशोत्सव मंडळ अक्कलकोट, अक्कलकोट नगरपरिषद, सन्मित्र डेव्हलपर्स, सुजलाम् फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव मूर्ती कसे तयार करावे याची कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी प्रशिक्षक म्हणून विकास गोसावी हे उपस्थित होते. त्याचे संयोजन आसावरी गांधी, भूमिशा शहा, सचिन जगताप, सोनाली वाघमोडे, डॉ. सतीश बिराजदार आदींनी केले. या गणेशमूर्ती कार्यशाळेसाठी अक्कलकोट शहरातील सर्वा शाळातील विद्यार्थ्यां मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते. तीन तासाचे असलेले सदर कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे निशुल्क ठेवण्यात आले होते.



### सोलापुरातील सेवासदन प्रशालेत संस्कृत दिन उत्साहाने साजरा

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

संस्कृत दिनानिमित्त सेवासदन प्रशालेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मान्यवर सेवासदन संस्था अध्यक्षा शीला मिस्त्री, प्रमुख पाहुणे गोविंद दाते यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, शिक्षिका स्वप्ना केळकर, अमित देशपांडे, स्मिता कोर्टीकर उपस्थित होते. स्वागत गीत संगीत शिक्षक विलास कुलकर्णी व विद्यार्थिनींनी सादर केले. संस्कृत भाषेची थोरवी या गाण्यातून सादर केली .पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय श्रुती कोठाडिया यांनी करुन दिला. तन्वी अरळी, प्रियदर्शनी गुंड या विद्यार्थिनींनी संस्कृतमधून कथा सादर केल्या. संस्कृत सुभाषितांच्या भेंड्या विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. श्री. दाते यांनी म्हणाले, संस्कृत भाषा ही संस्कारित भाषा आहे स्तोत्रांमुळे भाषा शुद्ध होते. संस्कृत जीवंत ठेवण्यासाठी सुभाषिते शिकली पाहिजे. सुभाषित रत्नसागर मध्ये १०००च्यावर सुभाषिते आहेत. संस्कृत भाषेतील वाचन साहित्यासाठी शारदा मासिक, अमरकोष, चांदोबा गोष्टीचे पुस्तक ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात आले आहे त्याचा वापर करावा.

### सराईत गुन्हेगार संजय घोडके दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

शहरातील सराईत गुन्हेगार संजय घोडके यास पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. घोडके यास कर्नाटकातील विजयपूर येथे सोडण्यात आलेले आहे.



संजय कुमार घोडके (वय ३६, रा. केशव नगर, झोपडपट्टी, मौलाली चौ, दक्षिण सदर बझार, सोलापूर) याच्याविरुध्द सन २०२४ मध्ये नागरिकांना शिवीगाळ व मारहाण करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे यासारखे गुन्हे दाखल आहे. त्यामुळे सदर बझार पोलीस ठाण्याकडून त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घळण्यासाठी त्याच्यावर तडीपारीचा प्रस्तावर पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे पाठवून दिला होता. या प्रस्तावास उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत संजय घोडके यास सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातून २ वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपार केल्यानंतर संजय घोडके यास कर्नाटकातील विजयपूर येथे सोडण्यात आले आहे.

# महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये झाले खांदेपालट

## एक अतिरिक्त आयुक्त, तीन उपायुक्त, चार सहाय्यक आयुक्तांना केले विभाग वाटप

### शासनाकडील अतिरिक्त आयुक्तपद अद्याप रिक्तच

### महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

महापालिका प्रशासनात शासनाकडून सहाय्यक आयुक्त रुजू झाल्यानंतर महापालिका आयुक्तांनी सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त यांच्या विभागामधील बदल करत काही खांदेपालट केली आहे. महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी १ अतिरिक्त आयुक्त, ३ उपायुक्त आणि ४ सहाय्यक आयुक्तांना विभाग वाटप करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

महापालिकेतील ज्येष्ठ अधिकाऱ्यांमधून शासन नियमाप्रमाणे स्थानिक पातळीवरील सहाय्यक आयुक्त ही पदे भरली जात नसल्याची ओरड गेल्या अनेक वर्षापासून होत आहे अशी ही सर्व पदे सध्या महापालिकेत रिक्तच आहेत मात्र शासनाकडून अतिरिक्त आयुक्त हे पद सोडल्यास सर्व उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त ही पदे देऊन शासनाचा कोटा पूर्ण करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात टप्प्याटप्प्याने शासनाने काही सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या केल्यानंतर महापालिकेत ४ सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती केली. नुकतेच महापालिकेत सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित आणि अर्जुन सुरवसे हे रुजू झाले आहेत.

महापालिकेच्या विविध विभागाचे काम काज प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ६९ अन्वये नियुक्त प्राधिकारी यांच्याकडे शासनाच्या आदेशान्वये आयुक्तांचे नियंत्रण व पुनर्विलोकनाच्या अटीस अधीन राहून त्यांना विविध विभागाचे कामकाज सोपविण्यात आले आहे. ते असे -



✻ **संदीप कारंजे (अतिरिक्त आयुक्त)** - नगर अभियंता कार्यालय, सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय, पशुवैद्यकीय विभाग व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभाग, अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, विद्युत विभाग, विभागीय कार्यालय क्रमांक ७ आणि ८

✻ **मच्छिंद्र घोलप (उपायुक्त-१)** - घनकचरा व्यवस्थापन विभाग, क्रीडा कार्यालय, परिवहन विभाग, समाज विकास विभाग, पर्यावरण संवर्धन, नगरसचिव कार्यालय, उद्यान विभाग, विभागीय कार्यालय क्रमांक २ आणि ४

✻ **तैमूर मुलाणी (उपायुक्त-२)** - शिक्षण विभाग व महापालिका १ ते ६ प्रशाला, अभिलेखापाल कार्यालय, सुरक्षा विभाग, संगणक विभाग, निवडणूक व जनगणना विभाग, मंडई-कोंडवाडा व लायसन्स विभाग, अतिक्रमण विभाग, दिव्यांग विभागासह कामगार व जनता संपर्क कार्यालय, महिला व बालकल्याण विभाग, विभागीय कार्यालय क्रमांक १ आणि ३

✻ **आशिष लोकरे (उपायुक्त-३)** - कर आकारणी विभाग, सामान्य प्रशासन विभाग, भूमी व मालमत्ता कार्यालय, आरोग्य विभाग, मलेरिया विभाग, विधान सल्लागार विभाग, विभागीय कार्यालय क्रमांक ५ आणि ६

✻ **शशिकांत भोसले (सहाय्यक आयुक्त-१)** - सामान्य प्रशासन विभाग, मंडई कोंडवाडा व लायसन्स विभाग, अतिक्रमण विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, क्रीडा कार्यालय

✻ **ज्योती भगत (सहाय्यक आयुक्त-२)** - पर्यावरण संवर्धन विभाग, पशुवैद्यकीय विभाग व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभाग, महिला व बालकल्याण विभाग, विधान सल्लागार विभाग, भूमी व मालमत्ता कार्यालय

✻ **गिरीश पंडित (सहाय्यक आयुक्त-३)** - निवडणूक व जनगणना कार्यालय शिक्षण विभाग व महापालिका १ ते ६ प्रशाला, आरोग्य विभाग, मलेरिया विभाग, परिवहन विभाग

✻ **अर्जुन सुरवसे (सहाय्यक आयुक्त-४)** - संगणक विभाग, अभिलेखापाल कार्यालय, समाज विकास विभाग, कामगार व जनता संपर्क कार्यालय, कर आकारणी विभाग-

#### स्थानिक आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्तपदे भरण्याची प्रतीक्षा

शासन स्तरावरून उपायुक्त, सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, अतिरिक्त आयुक्तपदी अजय चारठाणकर यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने काढले होते मात्र ते रुजू झाले नाहीत. त्यामुळे आता शासनाकडील एक अतिरिक्त आयुक्त पद रिक्तच आहे. तर दुसरीकडे आता फक्त महापालिका स्थानिक पातळीवरून आस्थापनेवरील अधिकाऱ्यांमधून नियमानुसार सहाय्यक आयुक्त पदे रिक्त राहिली आहेत. ती कधी भरणार याची प्रतीक्षा आणि उत्सुकता सर्वांना लागली आहे.

#### प्रस्ताव किंवा प्रकरणे आयुक्तांच्या पूर्वपरवानगीनेच पाठवली जातील

महापालिका आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांना विविध विभाग आणि कामाची जबाबदारी दिली आहे. हे कामकाज वेळोवेळी निर्गमित केलेले वित्तीय अधिकार व प्रशासकीय अधिकार यांच्या मर्यादेच्या अधीन राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींची निगडित सर्व प्रस्ताव किंवा प्रकरणे मंजूर करण्यापूर्वी मुख्य लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायासह सादर होतील याची दक्षता घेण्यात यावी तसेच स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेकडे पाठवावयाचे कोणतेही प्रस्ताव किंवा प्रकरणे आयुक्तांच्या पूर्वपरवानगीनेच नगरसचिव यांच्याकडे पाठवली जातील याची खबरदारी घ्यावी, असे महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

# दक्षिण सोलापूरवर शिवसेना शिंदे गटाचा दावा

### अण्णप्पा सतुबर यांनी केली उमेदवारीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० ऑगस्ट-**

लोकसभेनंतर आता विधानसभा निवडणुकीची तयारी सर्वत्र सुरू आहे. प्रत्येक पक्षाने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आघाडी आणि महायुतीत अजूनही कोणाला कोणत्या जागा मिळणार हे निश्चित नाही. पण इच्छुकांनी मात्र आपली तयारी सुरू केली आहे. मित्रपक्षांच्या जागांवरही त्यातून दावा केला जात आहे. म्हणूनच दक्षिण सोलापूर विधानसभेच्या भाजपाच्या ताब्यात असलेल्या जागेवर महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या अणप्पा सतुबर यांनी दावा केली आहे.

भाजपाचे सुभाष देशमुख सध्या विद्यमान आमदार असताना या जागेवर आता शिवसेना शिंदे गटाने दावा केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे या जागेवरून वाद होण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण मतदारसंघ हा पूर्वी शिवसेनेकडे होता. मात्र युती तुटल्यानंतर या मतदारसंघातून भाजपकडून सुभाष देशमुख यांनी दोनवेळा विजय मिळवला. आता तिसऱ्यांदा ते रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. दक्षिण सोलापूर मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाला सोडण्यात यावे अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अण्णप्पा सतुबर यांनी केली आहे.



दक्षिण सोलापूर मतदारसंघात शिवसेनेची मोठी ताकद असून धनगर समाजाची मतेदेखील मोठ्या प्रमाणावर आहेत तर दुसरीकडे भाजपामध्ये अंतर्गत वाद असल्याचा दावाही अण्णप्पा सतुबर यांनी केला आहे. याचा फायदा मविआला होऊ शकतो. त्यामुळे ही जागा शिवसेना शिंदे गटाला मिळावी असे ते म्हणाले. अण्णप्पा सतुबर हे या मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. अण्णप्पा सतुबर यांचे दक्षिणमध्ये आरोग्य, शैक्षणिक व महिला सबलीकरणामध्ये उल्लेखनीय कार्य आहे. दक्षिणमध्ये रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या विविध अडचणी सोडवून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्य करीत आहेत.

#### कार्यकर्त्यांचा आग्रह

वयोवृद्धांसह अनेकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिबिर आयोजित करतात. विविध धार्मिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडतात. विविध सहकारी संस्थांमधून कर्जपुरवठा करून आर्थिक प्रगती करण्यास हातभार लावत आहेत. म्हणून अण्णप्पा सतुबर यांना दक्षिणमधून विधानसभेची उमेदवारी देण्यात यावे, अशी मागणी कार्यकर्त्यांमधून होत आहे.

# रोपळेतील युवा सेनेच्या दहीहंडीत डीजेच्या तालावर युवकांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० ऑगस्ट-**

शेकडो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये साजरा झालेल्या पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील युवा सेना दहीहंडी उत्सवामध्ये गोविंदाच्या पथकाकडून थर रचण्यासाठी करण्यात आलेल्या कसरती आणि डीजेच्या गाण्यावर थिरकणाऱ्या युवकांच्या जल्लोषाने अनेकांच्या नयनांचे पारणे फिटले.

युवासेना पंढरपूर तालुकाप्रमुख महादेव भोसले यांच्या संकल्पनेतून साकारलेला आणि महादेव काका भोसले मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला युवा सेना दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी बाबर, युवती सेनेच्या प्रियंका परांडे, उपशहर प्रमुख सनी असंगे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरपूर येथील संकल्प पथकाने पाच थरांची सलामी देऊन दहीहंडी उत्सवाची सुरुवात केली. त्यानंतर सात थरांची कसरत करण्यात आली. यावेळी या गोविंदांकडून थर रचण्यासाठी होणाऱ्या विश्वास, जिद्द, चिकाटी, साहस, चपळाई आदी गुणांचे कौतुक करून उपस्थितांनी जल्लोष आणि सहसाचा हा क्षण आपल्या नयनांमध्ये साठविला. तर सात थरांचा मनोरा रचत संकल्प पथकाने ही दहीहंडी फोडण्याचा मान मिळवत सोमनाथ शिवाजी लोखंडे यांनी ठेवलेले ३१ हजार रुपयांचे बक्षीस पटकावले. पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये होणाऱ्या दहीहंडी सारखा थ्रील अनुभवण्यासाठी उपस्थित असलेली तरुणाई या दहीहंडी सोहळ्याप्रसंगी गोविंदा आला रे च्या जल्लोषात डीजेच्या गाण्यावर थीरकण्याचा मनमुराद आनंद घेतला. उपस्थित गोविंदा, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते, युवक वर्ग यांचे महादेव काका भोसले मित्र मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.



# श्रीगुरूंची श्रीफळ तुला, आदर्श माता-पित्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० ऑगस्ट-**

आई-वडिलांकडे चांगले संस्कार असतील तर मुलांकडे चांगले संस्कार होईल माणसाला सुख मिळवायचे असेल तर त्याने धर्माप्रमाणे वागले पाहिजे अंतर्मनाच्या श्रीषब्र १०८ ज्ञानभास्कर श्री गुरुमहादेव शिवाचार्य वाईकर महाराजांनी विचार मांडले.

श्रावण मासानिमित्त बसवेश्वर चौकातील श्री महादेव मंदिरात श्रीषब्र१०८ ज्ञानभास्कर श्री गुरुमहादेव शिवाचार्य वाईकर महाराज आणि श्रीषब्र १०८ गुरूनिर्वाण रुद्रपशूपती शिवाचार्य श्री कोळेकर महाराज या दोन्ही



सद्गुरूंची श्रीफळ-तुला व आदर्श माता-पित्यांचा सन्मान करण्यात आला. शिवनिर्णय संघटना, महाराष्ट्र वीरशैव सभा व वीरशैव लिंगायत समाजच्या वतीने ज्ञानभास्कर श्री गुरुमहादेव शिवाचार्य वाईकर महाराज आणि गुरूनिर्वाण रुद्रपशूपती शिवाचार्य श्री कोळेकर महाराजांची श्रीफळ-तुला करण्यात आली. यावेळी मदनसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, सांगोला शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके आणि परिसरातील विरशैव लिंगायत समाज्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच सर्व समाजबांधव, शिष्यगण बहूसंख्येने उपस्थित होते.

शिवनिर्णय'चे संस्थापक उत्कर्ष शेटे, अशोक ज.शेटे, मंगेश शेटे, रामलिंग हांडे, उमेश गुळवे, वैभव शेटे, महादेव पाटील, सुहास उरवणे, शशांक गवसणे, महेश डिकोळे, ओम राजमाने, ऋषिकेश कानडे, केदार सोनके, गणेश नरुळे, जगदीश स्वामी, निसर्ग स्वामी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी बसवेश्वर गुळवे व शकुंतला गुळवे, रामलिंग सावळजकर व संगीता सावळजकर, सुधाकर कुंभार व जयश्री कुंभार, चंद्रशेखर शेटे व कीर्ती शेटे, शामराव चक्रे व सुलभा चक्रे, प्रकाश डिकोळे व हेमलता डिकोळे, रेवाप्पा मदभावी व नागीनी मदभावी, सदानंद गवसणे व प्रज्ञा गवसणे, नागेश कोरे व उषा कोरे, ज्ञानदेव गवळी व नंदा गवळी या दांपत्यांचा आदर्श माता-पिता म्हणून सत्कार करण्यात आला.

# वस्तू देण्याचे आमिष दाखवून सात लाख ४० हजाराला गंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**


इलेक्ट्रॉनिक्स वस्तू देतो असे आमिष दाखवून महिलेची ७ लाख ४० हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना दि.१ एप्रिल २०२४ ते १० मे २०२४ दरम्यान न्यू पाच्छा पेठ येथे घडली. यप्रकरणी पुष्पाबाई विठ्ठल लिंबोळे (वय ४९, रा. न्यू पाच्छा पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अन्वर बुज्जी (रा. मंगळूर उडपी जवळ, कुंदापूर, कर्नाटक) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अन्वर याने पुष्पाबाई लिंबोळे यांना इलेक्ट्रॉनिक वस्तू देतो असे आमिष दाखवून लिंबोळे यांना मोबाईलचे ज्ञान नसल्याने त्यांची मुलगी वैशाली हिने तिच्या मोबाईल वरून अन्वर याने सांगितल्याप्रमाणे वेगवेगळ्या नंबर वर वेळोवेळी ७ लाख ४० हजार रुपये टप्प्याटप्प्याने फोन पे द्वारे पाठवले. पैसे पाठविल्यानंतरही अन्वर याने लिंबोळे यांना कोणतेही इलेक्ट्रॉनिक वस्तू न देता व पैसे घेऊन विश्वासघात करून त्यांची फसवणूक केली आहे. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मोरे हे करीत आहेत.

# खुनेश्वरमध्ये सरपंचपदासाठी चारजण रिंगणात

## नऊ जागांसाठी तब्बल ५५ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३० ऑगस्ट-**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधलेल्या व प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेतून पार पडलेल्या खुनेश्वर (ता.मोहोळ) येथील ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून, माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी १८ आणि जनतेतून सरपंच पदासाठी ४ अर्ज रिंगणात उरले आहेत. दि. ११ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या सोमवार दि. २६ रोजी शेवटच्या दिवशी ९ जागेसाठी तब्बल ५५ अर्ज प्राप्त झाले होते, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली.




राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या या ग्राम पंचायतीची तब्बल९ वर्षानंतर निवडणूक लागली आहे. राजन पाटील ग्राम विकास आघाडी विरुद्ध संत ज्ञानेश्वर माऊली ग्राम विकास आघाडी अशी ही लढत होत आहे. संत ज्ञानेश्वर माऊली आघाडीचे नेतृत्व माजी सरपंच चंद्रहार चव्हाण आणि सुरेश चव्हाण हे करीत आहेत. तर राजन पाटील आघाडीचे नेतृत्व ब्रह्मदेव चव्हाण हे करीत आहेत. राष्ट्रवादीच्याच दोन गटात ही निवडणूक होत आहे. भाजपाच्या वतीने सदस्यांचा जागांसाठी एकही अर्ज दाखल न करता फक्त जनतेतून सरपंच पदासाठी अर्ज दाखल करण्यात आला आहे. जनतेतून थेट सरपंच निवडणूकीसाठी सौ.माधुरी गणेश झाडे, रेश्मा दादासाहेब तांबोळी, रोहिणी नवनाथ मगर आणि सुषमा राम मगर यांनी अर्ज दाखल केले आहेत. यापूर्वी सन २०१५ रोजी या ग्रामपंचायतीची निवडणूक जाहीर झाली होती. त्यावेळी २ उमेदवार बिनविरोध निवडून ही आले होते. मात्र स्थानिक नागरिकांनी एकमेका विरोधात अगदी किरकोळ कारणावरून केलेल्या तक्रारीवरून ही निवडणूक प्रक्रिया तब्बल नऊ वर्ष रखडली. त्यात ४ वर्षे मुंबई उच्च न्यायालयात व ४ वर्षे सर्वोच्च न्यायालयात हा वाद चालला. या ग्रामपंचायतीवर ९ वर्ष प्रशासक असल्याने गावचा विकास म्हणावा तेवढा झाला नाही.

#### सरपंचपद ओबीसीसाठी आरक्षित

सरपंचपद ओबीसीसाठी आरक्षित असून सरपंचाची निवड जनतेतून होणार आहे. एकूण २ हजार ५६ जण आपला मतदानाचा हक्क बजाणार आहेत. त्यात ९३८ महिला व १ हजार ११८ पुरुष मतदार आहेत. उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत २९ ऑगस्ट होती. त्याच दिवशी चिन्ह वाटप करण्यात आले. मतमोजणी १२ सप्टेंबर रोजी येथील तहसील कार्यालयात होणार आहे. या ग्रामपंचायतीच्या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उद्या पुण्यात पश्चिम महाराष्ट्र प्रांत समन्वय बैठक

**पुणे, दि. ३० ऑगस्ट-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताची समन्वय बैठक रविवारी दि. १ सप्टेंबर रोजी होत आहे. स. प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई हॉलमध्ये दिवसभर होणाऱ्या या बैठकीत संलग्न विविध ४७ संस्थांचे पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित असतील. अशी प्रांत समन्वय बैठक वार्षिक नियोजनानुसार होत असते. यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, भारतीय जनता पक्ष, विज्ञान भारती, संस्कार भारती यासह विविध संघटनांचे प्रांत स्तरावरील पदाधिकारी बैठकीत सहभागी असतील. या बैठकीत बाळासाहेब चौधरी, पश्चिम क्षेत्र कार्यवाह उपस्थित असणार आहेत. या बैठकीत संघ शताब्दीच्या निमित्ताने चर्चा करण्यात येईल, असे पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांनी कळविले आहे.

### वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ वर सूचना पाठवण्याचे आवाहन

**दिल्ली, दि. ३० ऑगस्ट-**

जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४वर सूचना मागवल्या आहेत. लोकसभा सचिवालयाने काढलेल्या परिपत्रकानुसार कोणतीही व्यक्ती किंवा संस्था पोस्ट, फॅक्स आणि ईमेलद्वारे वक्फ (दुरुस्ती) विधेयकाबाबत जेपीसीला सूचना पाठवू शकतात. समितीकडे लेखी सूचना सादर करू इच्छिणाऱ्यांनी त्याच्या इंग्रजी किंवा हिंदीमध्ये दोन प्रती संयुक्त सचिव (जेएम), लोकसभा सचिवालय, कक्ष क्रमांक ४४०, संसद भवन ऍनेक्स, नवी दिल्ली-११०००१ येथे पाठवावे. फॅक्स क्रमांक २३०१७७०९ किंवा jpcwaqf-lss@sansad.nic.in वर मेल करा.



### श्री मार्कंडेय उद्यानात लहान मुलांसाठी बसविले अत्याधुनिक साहित्य

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

महानगरपालिकेच्या वतीने श्री मार्कंडेय उद्यान येथे सोलापूर शहरातील लहान मुलांसाठी खेळण्यासाठी अत्याधुनिक साहित्य बसवण्यात आले असून त्याची पाहणी आज महापालिकेचे आयुक्त शीतल तेली- उगले यांनी केली. कॅनरा बँकेच्या सी.एस.आर फंडातून ३९ लाख ९७ हजार ४६५ रूपये इतके रुपये खर्च करून शहरातील मार्कंडेय उद्यानासह, नाना नानी पार्क, साधू वासवानी उद्यान या ठिकाणी लहान मुलांसाठी अत्याधुनिक खेळण्याचे साहित्य बसवण्यात येणार आहे. तसेच साधू वासवानी, मुदगल उद्यान, नाना नानी पार्क या तीन ठिकाणी माझी वसुंधरा या योजनेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला मिळालेल्या एक कोटी बक्षीसातून तिन्ही उद्यान विकसित करण्यात येणार आहे. अशी माहिती महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली. याप्रसंगी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, नगर अभियंता सारिका अकुलवार, उप अभियंता किशोर सातपुते, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवानजी, विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर, अभिजीत बिराजदार आदी उपस्थित होते.



### देशभरात शैक्षणिक गरजापूर्तीसाठी मदत करणार : तेलंगणाचे उद्योजक कंदगटला

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-** आपल्या देशात आजदेखील शिक्षण क्षेत्रात विदारक अवस्था दिसून येते. हे हे लक्षात घेऊन माझ्यापरीने शैक्षणिक गरजापूर्तीसाठी मदत करण्याचे काम हाती घेतले आहे. केवळ तेलंगाणा, महाराष्ट्रातच नव्हे तर संबंध देशात हे काम करण्याचा प्रयत्न करणार, अशी ग्वाही तेलंगाणा मधील प्रख्यात उद्योजक व समाजसेवक सिद्धूरेड्डी कंदगटला यांनी सोलापुरात पत्रकार परिषदेत दिली. मोहोळ येथील वैष्णवी इंग्लिश मॉडेल स्कूलला शैक्षणिक साहित्य देण्यासाठी सिद्धूरेड्डी कंदगटला हे शुक्रवारी सोलापूर आले होते. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. गोरगरीब लोक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून मी काही वर्षांपासून शैक्षणिक गरजा पुर्तीचे काम करीत आहे. या अंतर्गत हैदराबाद येथे एक कोटी खर्च करून शाळा बांधून दिली. आदिवासी भागात दोन शाळा बांधून दिल्या. आता आणखी तीन शाळांचे काम सुरू आहे. शैक्षणिक क्षेत्रातील दूरवस्था पाहावत नसल्याने मी शैक्षणिक मदतीचे कार्य करण्याचे काम हाती घेतले आहे. मी तेलगू भाषेपासून सोलापुरात सुमारे पाच लाख तेलुगू बांधव राहतात, या लोकांच्या येथे शैक्षणिक संस्था आहेत हे ऐकून अभिमान वाटला. सोलापुरातील तेलुगु भाषिकांसह कुठल्याही समाज बांधवांसाठी मी शैक्षणिक मदत करण्यास इच्छुक आहे. केवळ तेलंगाणा महाराष्ट्रच नव्हे तर सबंध देशात हे काम मला करावयाचे आहे. शिक्षणाने माणसाची प्रगती होते यावर माझा ठाम विश्वास असल्याने वंचित घटकांचा शैक्षणिक उद्धार झाल्यास त्यांची भविष्यात चांगली प्रगती होईल, अशी मला आशा आहे, असे सिद्धूरेड्डी कंदगटला म्हणालेपत्रकार परिषदेत तेलगू अभिनेता इंद्रसेना बुद्धम, विशाल काळे, विपुल मिरजकर, रमेश मादास आदी उपस्थित होते.

## श्री गणेश विसर्जनासाठी

# महापालिका प्रशासनाचे नेटके नियोजन

### महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्तांनी केली विसर्जन कुंडांची पाहणी

**शहरातील एकूण ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र उभारण्यात येणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री गणेश विसर्जनासाठी नेटके नियोजन करण्यात येत आहे. आज महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले व पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी शहरातील १२ विसर्जन कुंडांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



यावेळी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, पोलीस उपायुक्त विजय काबाडे, पोलीस उपायुक्त अजित बोराडे, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, नगर अभियंता सारिका आकुलवार, उपअभियंता किशोर सातपुते, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवानजी, सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्यासह महानगरपालिकेचे विभागीय अधिकारी, पोलिस अधिकारी आणि पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सवाच्या विसर्जनासाठी आज महापालिकेच्या आयुक्त व पोलीस आयुक्त यांनी हिप्परगा येथील खाण, म्हाडा विहीर विडी घरकुल, एम. आयडीसी कुंड, अशोक चौक पोलिस मुख्यालय विहिर, मार्कंडेय उद्यान, सुभाष उद्यान, गणपती घाट, विष्णू घाट, कंबर तलाव, रामलिंग नगर विहीर,विष्णू मिल,देगाव बसवेश्वर नगर या विसर्जन कुंडच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. गणपती विसर्जनासाठी महापालिकेची तयारी सुरु केली असून विसर्जन कामाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवणे, झाडांचे फांद्या कट करणे तसेच लाईटची व्यवस्था त्याचबरोबर श्री ची मूर्ती संकलनासाठी व विसर्जनासाठी गाड्यांची, कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना गणेशोत्सव संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या.सोलापूर शहरातील गणेश भक्तांनी श्री गणेशमूर्ती संकलन केंद्रात द्यावे, असे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.

#### आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना सूचना

सोलापूर शहरातील एकूण ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे. तसेच विसर्जनापूर्वी राहिलेले कामे पूर्ण करण्यासंदर्भात महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यावर्षीचा गणेशोत्सव निर्विघ्नपणे व सुरळीत पार पडावा यासाठी म हापालिकेच्या वतीने प्रयत्न राहील, अशी माहिती आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

## पुतळ्याप्रकरणी माफी मागून चूक मान्य केली : विरोधकांचे टीकास्त्र

**तभा वृतसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० ऑगस्ट**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामातील भ्रष्टाचारामुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली असतानाही महाभ्रष्ट भाजपा युती सरकारला लाज वाटली नाही. केवळ पुतळा कोसळला नाही तर महाराष्ट्राचा स्वाभिमान धुळीस मिळाला. जनतेच्या तीव्र भावना लक्षात घेऊन नरेंद्र मोदींनी माफी मागितली याचाच अर्थ त्यांनी चूक मान्य केली आहे, पण महाराष्ट्रातील शिवप्रेमी जनता यांना माफ करणार नाही, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही याबाबत मोदीवर कडाडून टीका केली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष यांनी एक्सवर म्हटले आहे की, भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाला महाराजांनी कधीच माफी दिली नव्हती. आमचा महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी दाखवलेल्या वाटेवर चालतो. त्यामुळे साहेब, महाराष्ट्र या चुकीला माफी देऊ शकणार नाही.प्रायश्चित अटळ आहे. अंबादास दानवे म्हणाले की, मोदीजींच्या हाताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. त्यात झालेले व्यवहार, बदलले टेंडर यात मोठया प्रमाणात भ्रष्टाचाराचा विळखा आहे. एकप्रकारे पंतप्रधानांनी छत्रपती शिवाजी महाराजांची उशिराने माफी मागितली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाही मध्ये कलम केलं जातं, तशाप्रकारे मोदीजींच्या सरकारच या महाराष्ट्रातील जनता केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## ड्रग तस्कर, मनी लॉड्रिंग; सोलापुरातही इडी

### दुबईस्थित आंतरराष्ट्रीय ड्रग तस्कर जसमीत हकीमजादाचे भारतात नेटवर्क

**तभा वृत्तसेवा**
**नवी दिल्ली, दि. ३० ऑगस्ट -**

अंमलबजावणी संचालनालय (ईडी), दिल्ली विभागीय कार्यालयाने आंतरराष्ट्रीय ड्रग तस्कर जसमीत हकीमजादा याच्या प्रकरणात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) २००२ च्या तरतुदीनुसार दाखल असलेल्या गुन्ह्यात सोलापूर, दिल्ली, अमृतसर, जालंधर, मुंबई आणि इंदूर येथील १० परिसरांमध्ये शोध मोहीम राबवली.

४५ आखाती देशांतून कार्यरत असलेला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर आणि युनायटेड स्टेट्सच्या फॉरेन नार्कोटिक्स किंगपिन पदनाम कायद्यांतर्गत सिग्निफिकंट फॉरेन नार्कोटिक्स ट्रॅफिकर म्हणून नाव देण्यात आले. जसमीत हकीमजादा यांचे नाव युनायटेड स्टेट्सच्या ट्रेझरी ऑफिस ऑफ फॉरेन ॲसेट्स कंट्रोलने विशेष नियुक्त केलेल्या राष्ट्रीय आणि अवरोधित व्यक्तींच्या यादीमध्ये आहे. तो प्रतिबंधित दहशतवादी संघटना खलिस्तान लिबरेशन फोर्सशी




देखील जवळचा संबंधीत आहे आणि खलिस्तान लिबरेशन फोर्सच्या पाकिस्तानस्थित स्वयंभू प्रमुख हरमीत सिंग उर्फ पीएचडीच्या जवळचा असल्याचा आरोप आहे. ईडीने बेकायदेशीर क्रियाकलाप आणि अंमली पदार्थांच्या तस्करीबद्दल यूएपीए १९६७ आणि एनडीपीएस कायदा १९८५ च्या विविध कलमांखाली जसमीत हकीमजादा आणि इतरांविरुद्ध एनआईएद्वारे नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे तपास सुरू केला. दुबईत राहणारा जसमीत हकीमजादा भारतात अंमली पदार्थांचे नेटवर्क चालवत होता आणि प्रतिबंधित दहशतवादी संघटना खलिस्तान लिबरेशन फोर्सच्या अंमली पदार्थांच्या तस्करीतून निर्माण होणारा पैसा (पीओसी) हवालाच्या मदतीने दुबईला पाठवत होता, असे ईडीच्या तपासात उघड झाले आहे. अमृतसर येथील विकसित मनी एक्सचेंजर्स (एफएफएमसी) च्या ईडीने केलेल्या तपासात जसमीत हकीमजादा यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या ड्रग्ज तस्करांनी भारतातील जसमीत हकीमजादा यांच्याकडे असलेल्या विविध बँक खात्यांमध्ये रोख रक्कम जमा केल्याचेही तपासात उघड झाले आहे. बँक खात्यांमध्ये जमा केलेल्या पीओसीचा वापर हरियाणातील गुरुग्राम येथे उच्च मूल्याच्या वस्तू आणि स्थावर मालमत्तेच्या खरेदीसाठी केला गेला. ईडीच्या शोध मोहिमेदरम्यान, जसमीत हकीमजादा आणि त्याच्या पत्नीच्या नावे दिल्लीतील सीक्रेट बँक लॉकर्सचा शोध घेण्यात आला आणि त्यात १.०६ किलो बेहिशेबी सोने आणि ३७० ग्रॅम हिऱ्याचे दागिने असल्याचे आढळून आले. ईडीच्या शोध मोहिमेदरम्यान संपूर्ण दागिने जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू असल्याचे ईडीच्यावतीने सांगण्यात आले आहे.

## संघ विचारांनी प्रेरित राष्ट्रीय साहित्य उपलब्ध : आंबेकर

### भाविसा फाउंडेशनच्या संकेत स्थळाचे उद्‌घाटन

**पुणे, दि.३० ऑगस्ट-**

संघ विचारांनी प्रेरित राष्ट्रीय साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध झाले. हे साहित्य समाजात सर्व स्तरात जाण्यासाठी आगामी काळात यावर ऑडियो बुक, इ बुक आदी पर्याय उपलब्ध करून देऊन याचा सर्वांना उपयोग होईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी व्यक्त केला.



भारतीय विचार साधना प्रकाशन संस्थेने वाढत्या विस्ताराबरोबर भारतीय विचार साधना फाऊंडेशन ही विक्री व्यवस्था उभी केली आहे. त्याच्या संकेत स्थळाचे उद्‌घाटन आंबेकर यांच्या हस्ते झाले. साहित्य क्षेत्रात राष्ट्रीय विचारांचा प्रचार आणि प्रसार करणारे अग्रगण्य नाव म्हणजे भारतीय विचार साधना प्रकाशन संस्थेने वाढत्या विस्ताराबरोबर भारतीय विचार साधना फाऊंडेशन ही विक्री व्यवस्था उभी केली आहे. राष्ट्रीय विचारांची संस्कारक्षम पुस्तके ऑनलाईन विक्रीसाठी नवीन संकेतस्थळ bhartiyvichar.in. या नावाने सुरू केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बिपीन पाटसकर यांनी केले. भारतीय विचार साधना फाऊंडेशनतर्फे साहित्य विक्रीची माहिती अरविंद रावेतकर यांनी दिली.

## जितेश अंतापूरकर यांचा भाजपात प्रवेश

**आमदारकीचा दिला राजीनामा**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि .३० ऑगस्ट :**

नांदेड जिल्ह्यातील देगलूरबिलोली विधानसभा मतदारसंघाचे कॉंग्रेसचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी शुक्रवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. तत्पूर्वी त्यांनी पक्षाचा राजीनामा देत आमदारकीचा राजीनामा विधानसभा अध्यक्षकडे पाठविला होता.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व खा. अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत मुंबईतील प्रदेश कार्यालयात पक्षप्रवेश झाला. राज्यसभेच्या व गेल्या महिन्यात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत जनतापुरकर यांनी क्रॉस वोटिंग केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. तेव्हापासून त्यांना पक्षाच्या कार्यक्रमापासून अलिप्त ठेवण्यात आले होते ते भाजपात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर शुक्रवारी सकाळी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांची व मुंबईतील वांद्रे येथील आमदार जीशान सिद्दिकी यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जाहीर केले होते.

अंतापूरकर यांच्या पक्षप्रवेशावेळी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत नांदेड मतदारसंघात भाजपाचा थोडक्यात पराभव झाला. आता जिल्ह्यातील परिस्थिती बदलली आहे. विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात महायुतीला सर्वाधिक जागा मिळतील. अंतापुरकर यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहिल. अशोक चव्हाण म्हणाले की, अंतापूरकर यांना कॉंग्रेसमध्ये अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे त्यांनी भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. अंतापूरकर म्हणाले की, पक्षाकडून जी जबाबदारी सोपविली जाईल ती आपण निष्ठेने पार पाडू राजीनामा दिला. देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला.



## तानाजी सावंत यांच्याबद्दल अजित पवार, तटकरेंची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा/ जमीर काझी**
**मुंबई, दि. ३० ऑगस्ट-**

शिवसेना शिंदे गटाचे नेते व राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसवर केलेल्या टीकेमुळे महायुतीतील घटक पक्षात तणाव वाढला आहे. राष्ट्रवादीचे प्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करीत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर सावंत यांना समज देण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

त्यामुळे या प्रकरणावर पॅचअप करण्याचे प्रयत्न आघाडीतील वरिष्ठ नेत्यांकडून करण्यात येत आहे.आले .त्याचाच एक भाग म्हणून या विषयावर अजित पवार व तानाजी सावंत यांनी काहीही भाष्य करण्याचे टाळले. मात्र अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी तानाजी सावंत यांच्यावर टीका करीत हे ऐकून घेण्यापेक्षा सत्तेतून बाहेर पडलेले बरे असे, म्हटले आहे.

तानाजी सावंत यांनी गुरुवारी धाराशिव येथील जाहीर सभेत राष्ट्रवादी वर कडाडून टीका करताना त्यांच्या नेत्या समवेत





#### तानाजी सावंत यांचा इलाज मुख्यमंत्र्यांनी करावा

तानाजी सावंत यांच्या विधानानंतर विधानपरिषदेचे आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, तानाजी सावंत राज्याचे आरोग्यमंत्री आहेत. त्यांना उलट्या कोणत्या कारणामुळे होत असाव्यात, याबद्दल कल्पना नाही. त्याचा आरोग्याशी काही संबंध असू शकेल. पण महायुतीत असल्यामुळे उलट्या होत असतील तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीच त्यांचा इलाज करावा.

मांडीला मांडी लावून बसत असलो तरी बाहेर आल्यानंतर उलट्या होतात , असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले असून अजित पवार व प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी त्याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे. शिंदे यांनी याबाबत सावंत यांना योग्य समज दिल्याचे सांगून या विषयावर पडदा टाकण्याचे विनंती केली, त्यामुळे अजित पवार व तटकरे यांनी याबाबत काहीही प्रसार माध्यमातून भाष्य करण्याचे टाळले. तर आरोग्य मंत्री सावंत यांनीही पत्रकारांशी काही बोलण्यास नकार दिला आहे.

सावंत यांच्या विधानानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी अजित पवार यांना सत्तेतून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे. ''तानाजी सावंत यांचे ऐकून घेण्यापेक्षा महायुतीतून बाहेर पडू, आपल्याला सत्तेची गरज नाही. तानाजी सावंत यांचा आम्हाला बोलण्याचा काय अधिकार आहे? एकनाथ शिंदे यांना भाजपाने मुख्यमंत्री केले त्यामुळे तानाजी सावंत यांना मंत्रीपद मिळाले. त्याच भाजपाच्या नेत्यांनी अजित पवार यांना महायुतीमध्ये घेतले. हा निर्णय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाने घेतला होता. महायुतीमुळेच तानाजी सावंत मंत्री आहेत. हे त्यांनी विसरू नये. या पद्धतीने जर राष्ट्रवादीला कोण बोलणार असेल तर आम्ही सत्तेत राहणार नाही'', असा इशारा प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिला.तानाजी सावंत यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशीही मागणी उमेश पाटील यांनी केली आहे. जोपर्यंत हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीला हजेरी लावू नये, असेही ते म्हणाले.

#### शिंदे गटाची अजित पवारांवर नाराजी

२०२२ मध्ये जेव्हा एकनाथ शिंदे यांनी बंड करून महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा शिंदे यांच्याबरोबर असणाऱ्या आमदारांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर आरोप केले होते. अर्थमंत्री आम्हाला निधी देत नाहीत, असा आरोप अनेक आमदारांनी केला होता. मात्र २०२३ मध्ये भाजपाने अजित पवार यांना महायुतीत घेतल्यानंतर त्यांच्याकडेच पुन्हा अर्थखाते देण्यात आले. तानाजी सावंत यांनी यापूर्वीही राष्ट्रवादी कॉंग्रेसवर अनेकदा टीका केलेली आहे. २०१९ साली ते भूम-परंडा विधानसभेतून निवडून आले होते. त्याआधी हा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते राहुल मोटे यांच्या ताब्यात होता.

#### तानाजी सावंत काय म्हणाले होते?

धाराशिव येथे एका कार्यक्रमात बोलत असताना तानाजी सावंत म्हणाले की, मी हाडामासाचा शिवसैनिक आहे. आयुष्यात कधीही कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीशी माझे जमलेले नाही. शिक्षण घेत असल्यापासून मला त्यांचे पटलेले नाही. आज जरी मंत्रिमंडळात आम्ही त्यांच्या मांडीला मांडी लावून बसलो असलो तरी बाहेर आल्यानंतर उलट्या होतात. हे सहन होत नाही, असे विधान तानाजी सावंत यांनी केले होते.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पन्नाशी पार केलेली बालबुद्धी

काँग्रेस पक्षात आजपर्यंत अनेक नेते होऊन गेले. यातील सगळ्याच नेत्यांना लोकप्रियता मिळाली, जनतेने त्यांना मनापासून स्वीकारले, असे म्हणता येणार नाही. यातील अनेक नेत्यांना निवडणुकीत विजयीही होता आले नाही. काही नेत्यांवर तर भ्रष्टाचाराचे आरोप झाले; मात्र जनतेने त्यांना स्वीकारले नसले, तरी पूर्णपणे नाकारलेही नाही, त्यांची टिंगलटवाळी कधी केली नाही. विदूषक म्हणून त्यांच्याकडे पाहिले नाही. देशातील आजवरच्या राजकारणात काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची जेवढी टिंगलटवाळी झाली, तेवढी ती देशातील कोणत्याच पक्षाच्या नेत्याची झाली नाही. अगदी ज्यांच्या निष्ठा या देशावर नाही, असे ज्यांच्याबद्दल बोलले जाते, त्या डाव्या पक्षांच्या नेत्यांचीही झाली नाही. राजकारणातील ज्या व्यक्तीला काय बोलावे, यापेक्षा काय बोलू नाही, हे समजते, तो यशस्वी होतो. पण राहुल गांधींना हे कधीच समजले नाही. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांना काय बोलावे आणि काय बोलू नये हे कळत नाही. मात्र, तरीही बोलायची खुप हौस आहे. जे बोलायचे ते राहुल गांधी बोलत नाही आणि जे बोलायला नको, ते मात्र बोलून जातात. राहुल गांधी राजकारणात यशस्वी झाले नाही, त्यांना देशातील जनतेने गांभीर्याने घेतले नाही, याचे कारण याच्यातच दडले आहे. काँग्रेसेतर पक्षांचे सोडा; पण काँग्रेसचे नेतेही त्यांना गांभीर्याने घेत नाहीत. राहुल गांधी जवळपास २० वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत, पण आपल्या नेतृत्वात त्यांना काँग्रेस पक्षाला लक्षणीय असे यश कधीच मिळवून देता आले नाही. आपल्या विधानांनी आणि वर्तनाने राहुल गांधी देशातील जनतेची करमणूक मात्र नेहमीच करत असतात. त्यामुळेच जनमानसात त्यांची 'पप्पू' अशी प्रतिमा निर्माण झाली. ही प्रतिमा खोडून काढण्यासाठी त्यांनी फारसे गंभीर प्रयत्न केले नाहीत; उलट आपल्या बालिश विधानांने आणि नाटकी वर्तनाने या प्रतिमेला हातभार लावण्यातच धन्यता मानली. त्यामुळे राहुल गांधींवर समाजमाध्यमाद्वारे जेवढे मीम्स आणि विनोद तयार झाले, तेवढे आतापर्यंत देशातील सर्व नेत्यांवर मिळूनही तयार झाले नाही. एवढ्या एका बाबतीत तरी त्यांनी देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांना मागे टाकले, हे मान्य करावे लागेल.

राहुल गांधी कधी काय बोलतील, याचा भरवसा राहिला नाही. आपण काय बोलतो, जे बोलतो ते तर्कसंगत आहे का, याचा विचार ते कधीच करत नाहीत. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या पद्धतीने राहुल गांधी एकामागे एक विधाने करीत असतात. आपल्या विधानाचा जनमानसावर काय परिणाम होतो, आपण केलेली विधाने लोकांना पटतात का, याच्याशी त्यांना काहीच देणेघेणे नसते. त्यामुळेच राहुल गांधींच्या कोणत्याही विधानांना देशातील जनता गांभीर्याने घेत नाही. मुळात गांभीर्य आणि राहुल गांधी यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध नाही. राहुल गांधी यांनी जातीय जनगणनेची मागणी लावून धरली आहे. आपल्या या मागणीचा समाजमनावर आणि देशाच्या एकता आणि अखंडतेवरही काय परिणाम होतो, होईल, याचा विचार त्यांनी कधी केला नाही. आपल्या पक्षाच्या छोटाकश राजकीय फायद्यासाठी देशाला जातीय संघर्षाच्या वणव्यात ढकलायलाही ते मागेपुढे पाहात नाही. देशात सुदैवाने भाजपाची सत्ता असल्यामुळे तसेच नरेंद्र मोदींसारखा पोलादी नेता सलग दहा वर्षांपासून पंतप्रधानपदी असल्यामुळे या मागणीचा नकारात्मक परिणाम देशावर झाला नाही, हे देशाचे भाग्य म्हटले पाहिजे. जातीय जनगणनेची मागणी पुढे रेटताना राहुल गांधी यांनी आजपर्यंत जी विधाने केली, ते पाहून चेहऱ्यावरची माशी न हलणाऱ्या माणसालाही खदखदून हसू आल्याशिवाय राहात नाही. दलित, आदिवासी आणि ओबीसींना आरक्षण मिळावे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. गेल्या जवळपास ७० वर्षांपासून देशातील शोषित, पीडित आणि वंचित वर्गाला आरक्षण मिळत आहे. मात्र भाजपा सरकार आरक्षण बंद करणार, असा खोटा प्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी लोकसभा निवडणुकीत जाणीवपूर्वक केला. त्याचा काही प्रमाणात भाजपाला फटका बसला. त्यामुळे राहुल गांधींचा उत्साह वाढला आणि ते वाटेल ते बोलू लागले, म्हणण्यापेक्षा बरळू लागले. अर्थसंकल्प छपाईला पाठवताना नॉर्थ ब्लॉकमधील अर्थमंत्रालयात दरवर्षी हलवा समारंभ होत असतो. ही परंपरा अतिशय जुनी आहे. देशात काँग्रेसचे शासन असतानाही हलवा समारंभ होत होता. पण यावेळी हलवा समारंभात जे अधिकारी सहभागी झाले, त्यात एकही दलित, ओबीसी आणि आदिवासी अधिकारी नव्हता, असा जावईशोध आजपर्यंत स्वतः कधीच जावई होऊ न शकलेल्या राहुल गांधींनी लावला. त्याआधी केंद्र सरकारच्या सचिवांमध्ये दलित, ओबीसी आणि आदिवासी समाजाचे सचिव नाही, असा आरोपही त्यांनी केला होता. मध्यंतरी एकदा काँग्रेस मुख्यालयात पत्रपरिषद घेत असताना पत्रकारांमध्येही ओबीसी पत्रकार किती आहेत, असा हास्यास्पद प्रश्न त्यांनी विचारला होता.

मुघलांच्या घोड्यांना पाण्यात संताजी धनाजी दिसायचे, असे म्हटले जात होते. तसेच राहुल गांधींना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी दलित, ओबीसी आणि आदिवासी दिसत असतात. राहुल गांधींची कावीळ झाल्यासारखी स्थिती आहे. नुकतेच त्यांनी केलेले ताजे विधान आणि त्याआडून केलेली मागणी पाहून शहाण्या माणसाला आपले डोके दगडावर आपटायची इच्छा झाली, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आजपर्यंत देशात झालेल्या मिस इंडिया स्पर्धेत एकाही दलित, ओबीसी आणि आदिवासी समाजाच्या तरुणीची निवड झाली नाही, म्हणजे तिला बक्षीस मिळाले नाही, असे आश्चर्यकारक विधान त्यांनी केले. कदाचित, देशात दलित आणि आदिवासी समाजाची एकही महिला मिस इंडिया झाली नसेल, पण देशाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपतिपदी एक महिला द्रौपदी मुर्मू आहेत, याचाही त्यांना विसर पडला, असे दिसते. यामुळेच केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी राहुल गांधींचा उल्लेख 'बालबुद्धी' असा केला आहे. मेघवाल यांनी राहुल गांधींसाठी बालबुद्धीचा असा जो शब्द वापरला, तो गेल्या अनेक दिवसांपासून राहुल गांधींची वागणूक पाहून देशातील लोकांच्या डोक्यात घुमत होता. मेघवाल यांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. उद्या राहुल गांधींनी देशासाठी खेळणाऱ्या क्रिकेट संघात एकही दलित, ओबीसी आणि आदिवासी नाही, असा आरोप केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. दलित, ओबीसी आणि आदिवासींचा एवढा पुळका राहुल गांधींना आता आपली सत्ता गेल्यावर येत आहे. २००४ ते २०१४ आणि त्यांच्या आधी म्हणजे १९९१ पर्यंत एखाददुसरा अपवाद वगळता देशात काँग्रेसचीच सत्ता होती; मग त्यावेळी त्यांनी मंत्रिमंडळात या समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व का दिले नाही, असा प्रश्न त्यांना विचारायला हरकत नाही. काँग्रेस पक्ष दहा वर्षांपासून सत्तेपासून दूर असल्यामुळे त्याला आता दलित, ओबीसी आणि आदिवासी यांचा पुळका येत आहे, असा कोणाचा समज झाला तर त्याला दोष कसा द्यायचा? या तिघांसोबत राहुल गांधींना मुस्लिम समाजाचाही उल्लेख करायचा आहे, पण देशातील हिंदुत्वाच्या लाटेमुळे त्यांची तेवढी हिंमत होत नाही, असे दिसते. अन्यथा त्यांनी मुस्लिम समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप करायलाही मागेपुढे पाहिले नसते. राहुल गांधी हे काँग्रेस पक्षासाठी 'असून अडचण नसून खोळंबा' अशी स्थिती आहे. राहुल गांधी काँग्रेस पक्षाला एक पाऊल पुढे नेतात आणि दोन-तीन पावलं मागे आणतात. राहुल गांधींची वागणूक पाहून त्यांना खपवून घेत असल्याबद्दल काँग्रेसजनांच्या संयमाचे, हिंमतीचे आणि समजदारपणाचे कौतुक करावेसे वाटते. आचार्य अत्रे आज असते, तर त्यांनी राहुल गांधींसारखा (दिवटा) नेता मागील दहा हजार वर्षांत झाला नाही आणि पुढील दहा हजार वर्षांत होणार नाही, असे विधान निश्चितच केले असते.

## यंगिस्तान

# शरद पवारांची शपथ नेमकी कशासाठी?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

शरद पवारांनी, महाराष्ट्राचा मणिपूर होऊ शकतो, असे वक्तव्य केले होते. त्यावर उत्तर देताना मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणाले होते की, महाराष्ट्राचा मणिपूर करण्यात शरद पवारांनी हातभार लावू नये. राज ठाकरे यांचे काका बाळासाहेब ठाकरे शरद पवारांचे मित्र होते. मात्र, त्यांनी राजकीय मंचावरून पवारांचा विरोधच केला आणि पवारांवर विश्वास ठेवता येत नाही, असे ते म्हणाले होते. शरद पवारांबद्दल राजकीय वर्तुळात भीती असली, तरी ती आदरयुक्त भीती नसून त्यांच्या राजकीय कारस्थानाबद्दलची भीती आहे, असं दुर्दैवाने म्हणावं लागतं. त्यांना स्वतःला 'जाणता राजा' म्हणवून घ्यायला आवडतं, पण त्यासाठी त्यांना विशेष प्रयत्न करावेसे वाटत नाहीत. आता बदलापूरच्या प्रकरणावरून शरद पवार निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा पावसात भिजले. त्यांनी पावसासोबतही आघाडी केली आहे की काय, असा प्रश्न आपल्या मनाला पडू शकतो. यावेळी शरद पवारांनी एक शपथ घेतली आणि उपस्थित लोकांनाही शपथ घ्यायला लावली. महिलांचं रक्षण करण्याची ही शपथ होती. याबाबत शरद पवार यांचं अभिनंदन केलं पाहिजे. हा चांगलाच निर्णय आहे. कारण, महिलांचं रक्षण झालंच पाहिजे, त्यांना सुरक्षा मिळालीच पाहिजे. त्यांच्यावरील अन्याय थांबलेच पाहिजेत. याबाबत दुमत असण्याचं कारण नाही. द्रौपदीचं वस्त्रहरण झालं. त्यानंतर भीमाने दुःशासनाची छाती फाडली आणि त्याच्या रक्ताने द्रौपदीने आपले केस धुतलेले आहेत. महिलांचं रक्षण करणं, त्यांना मान देणं ही हिंदू संस्कृती आहे.

काहीच वर्षांपूर्वी बेस्ट सीएम उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा कोविड सेंटरमध्ये एका महिलेवर बलात्कार झाला होता. अशा अनेक घटना घडल्या होत्या. मात्र, त्यावेळी पवार उद्धव ठाकरेंना शपथ द्यायला विसरले. २०१३ मध्ये शक्ती मिल बलात्कार प्रकरणाच्या वेळी आर. आर. पाटील हे गृहमंत्री होते, पण त्यावेळी पाटलांना शपथ देण्याची आठवण पवारांना झाली नाही. आघाडीचे सरकार असताना साकीनाका, परळी, बीड अशा अनेक ठिकाणी महिलांवर अनेकदा अत्याचार झाले होते. पण पवारांना त्यावेळी महिलांची सुरक्षा महत्त्वाची वाटली नाही. कारण या विषयावरून त्यांना त्यांची राजकीय पोळी भाजता येणार नव्हती का? बरं, पवारांनी ज्या लोकांना शपथ दिली आहे, ते महिलांचे रक्षक आहेत का? जितेंद्र आव्हाड यांचा महिलेविषयीचा ऑडिओ सध्या चांगलाच गाजतोय. अनंत करमुसेला केलेली मारहाण, त्यामुळे त्यांच्या दोन लहान मुली आणि पत्नीला झालेला मनस्ताप पवार विसरले आहेत का? मागे आव्हाडांवर एका महिलेने विनयभंगाचा आरोप केला होता; तो विनयभंग नसला, तरी त्यांनी त्या महिलेशी चांगली वर्तणूक केली नव्हती. कळव्याला मुख्यमंत्री शिंदेंना भेटण्यासाठी जी महिला जात होती, तिचे दोन्ही खांदे दाबून 'काय उभी आहेस, बाजूला हो' म्हणत तिला ढकललं, अशी तक्रार त्या महिलेने केली होती. त्या महिलेला बाजूला ढकलून अपमान करणारे आव्हाड एवढे कोण मोठे लागून गेले? त्यांना महिलांशी अशी वर्तणूक करण्याचा अधिकार कोणी दिला? ते आमदार झाले म्हणजे काय त्यांनी महाराष्ट्र विकत घेतला का? ते संविधानापेक्षा, कायद्यापेक्षा खूप मोठे आहेत का? याविषयी शरद पवारांचे काही मत आहे का? या मोर्चात संजय राऊत हे मुंबईतून सहभागी झाले होते. संजय राऊत यांची महिलांविषयीची गलिच्छ, घाणेरडी वक्तव्ये सर्वश्रुत आहेत. ते महिलांना उघडपणे शिव्या देतात. विचार करा, खाजगीत काय काय बोलत असतील? स्वतः सुप्रिया सुळे कोलकाता बलात्कार प्रकरणात 'अशा गोष्टी होत असतात' असं म्हणाल्या होत्या. महिलांचा अपमान करणाऱ्या अशा लोकांना घेऊन पवार महिलांचं संरक्षण करणार आहेत का? मग पवारांनी घेतलेली ही शपथ महिलांच्या सुरक्षेसाठी होती की फडणवीसांना महाराष्ट्रातून घालवण्यासाठी होती? असा दुर्गंध आपल्याला येऊ लागतो. मराठा आरक्षण इत्यादी मुद्दे सोडून पवार अचानक महिलांच्या सुरक्षेकडे कसे वळले? की आरक्षणावरून रान पेटवून झालेलं आहे.

राजकोट किल्ल्यावरील महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. यावरून आता पवारांनी राजकारण सुरू केले आहे. ही घटना दुर्दैवीच आहे. याविषयी सखोल चौकशी होऊन कारवाई झालीच पाहिजे. मात्र, आता आघाडी हा मुद्दा चिघळण्याचा व यावरून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. महाराष्ट्राचा मणिपूर करण्यासाठी ते विविध मुद्दे हाताळत असल्याचा संशय ते स्वतःच निर्माण करत आहेत. ज्या पवारांना छत्रपतींचा पुतळा भंग झाला म्हणून राजकारण करावसं वाटतं, त्या पवारांनी छत्रपतींचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत काय काय प्रयत्न केले आहेत? छत्रपतींनी अठरापगड जाती एकत्र आणल्या आणि स्वराज्य निर्माण केलं. राज ठाकरे म्हणतात, पवारांनी महाराष्ट्रात जातिवादाचं विष पेरलं. म्हणजेच पवारांनी छत्रपतींच्या इच्छेविरुद्ध काम करून जाती-जातीत भांडणे लावली, असा याचा अर्थ होतो का? विरोधक देवेंद्र फडणवीसांना त्यांच्या जातीवरून हिणवतात. कोल्हापूरच्या संभाजीराजे यांना राज्यसभेची खासदारकी दिली तेव्हा पेशवे आता छत्रपतींची नेमणूक करू लागले, अशा प्रकारचं विधान शरद पवारांनी केलं होतं. यातून त्यांना काय संदेश द्यायचा आहे? मराठा आणि ब्राह्मण समाजात त्यांना फूट का पाडायची आहे? महाराष्ट्राचा मणिपूर होईल, अशी वक्तव्ये ते का करतात? त्यापेक्षा महाराष्ट्राचा आनंदवनभुवन होईल, असे प्रयत्न ते का करत नाहीत? त्यांचा अनुभव ते महाराष्ट्राच्या विकासासाठी का खर्च करत नाहीत? २०१४ पासून फडणवीसांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ते इतके का झटत आहेत?

लक्षात घ्या, शरद पवारांनी अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीऐवजी इतर पक्षाचाच मुख्यमंत्री बसवून त्यांनी राज्याची सूत्रे हलवली आहेत. २०१४ साली जेव्हा भाजपाचं बहुमत हुकलं तेव्हा पवारांनी बाहेरून पाठिंबा दिला होता. तोपर्यंत त्यांना फडणवीसांचा स्वभाव आणि कार्य करण्याची पद्धत माहीत नव्हती. पण जेव्हा पवारांना कळलं की, फडणवीस हे स्वयंभू आणि स्वतंत्र वृत्तीचे अभ्यासू नेते आहेत. त्यांना नाचवता येणार नाही. त्यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसू दिलं तर आपल्याला सूत्रे हलवता येणार नाहीत. तेव्हापासून पवार आणि फडणवीस संघर्ष सुरू झाला. पवारांना कोणतंही सरकार स्थापन झालेलं चालणार आहे. पण मुख्यमंत्री त्यांच्या मर्जीतला हवा. फडणवीस त्यांना नकोत. कारण महाराष्ट्रात फडणवीस पवारांना मात देतात, त्यांचं ऐकत नाहीत. म्हणूनच कोणतंही आंदोलन असेल, मोर्चा असेल तेव्हा दोष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना न देता एकट्या फडणवीसांना लक्ष्य केलं जातं. यामागचा अर्थ सामान्य जनतेला कळत नाही, असं आघाडीतल्या नेत्यांना वाटतं. पण जनता हुशार आहे. फडणवीसांनी जनतेला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे. बदलापूर प्रकरणातही त्यांनी आरोपीला पाठीशी न घालता कठोर शिक्षा होईल याची काळजी घेतली, पुणे पोर्शे अपघातातदेखील उच्चभ्रू गुन्हेगारांना शिक्षा होईल, अशी कारवाई केली. अशी चांगली कामं करणारा नेता महाराष्ट्रात नको, यासाठी मोठा डाव आखला जात आहे. पण काही केल्या फडणवीसांना मात देता येत नाही. ते मुख्यमंत्री नसले तरी आजही सत्तेत सहभागी आहेत आणि हीच विरोधकांची खरी पोटदुखी आहे. म्हणूनच पवार पावसात भिजून अचानक महिलांच्या संरक्षणाची शपथ घेतात तेव्हा मनात धडकी भरते. फडणवीसांना पाडण्यासाठी पुढे काय काय होणार आहे, याचा विचार करून मन सुन्न होतं. ही विधानसभेची निवडणूक एक महत्त्वाची परीक्षा असणार आहे. महाराष्ट्रात पवार जिंकतात की फडणवीस यावरून महाराष्ट्राच्या पुढील राजकारणाला गती मिळणार आहे. पवार हे प्रचंड अनुभवी, ज्येष्ठ नेते आहेत, तेल लावलेला पैलवान आहे. पण फडणवीस यांची बाजू सत्याची आहे. फडणवीस हे छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करीत आहेत.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**महेंद्र आकांत**

# आंदोलनं...

सध्या महाराष्ट्र राज्यात आंदोलन... आंदोलन... नावाचा खेळ सुरू आहे. काहीही खुट वाजलं... काहीही अनुचित घटना घडली तरी विरोधक आंदोलनाचा बडगा उगारत आहेत. एका प्रकरणाची आग पेटविली जाते, त्याचा धूर चारही दिशांना पसरविण्याचा प्रयत्न केला जातो न् जातो तोच दुसरी एखादी नैसर्गिक आपत्ती का होईना घटना घडते आणि पहिली आग शांत होऊन दुसरा आगडोंब उठविला जातो. साधारणतः निवडणुका आल्या रे आल्या की सत्तापक्षाला अडचणीत पकडण्यासाठी विरोधकांकडून आंदोलन, नारे निदर्शने, बंद आदी अनेक हत्यारे उपसली जातात. बदलापूरमध्ये एक घटना घडली. निश्चितच या घटनेचा निषेध व्हावा तितका थोडाच आहे. अशा घटनांमधील अपराध्यांना कठोरात कठोर शिक्षा दिली पाहिजे, ही तर सर्वसामान्य लोकांचीही मागणी राहू शकते. ज्यांना मुली आहे ते तर अशा नराधमांना ठेचून काढा, अशीही मागणी करू शकतात. मात्र, अशा घटनांचे राजकीय भांडवल न करता सामोपचाराने, सर्वसंमतीने त्यावर उपाययोजना केल्या पाहिजे. हे न करता विरोधक आंदोलनाचा आगडोंब उसळवितात. या बदलापूर घटनेच्या निमित्ताने महाराष्ट्र बंदचे आवाहन करून विरोधातील महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर सरकारविरोधी वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर महिला वर्ग सत्तापक्षाकडे वळण्याचा अंदाज घेऊन त्यांच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा विरोधकांचा डाव होता. लहान मुलीच सुरक्षित नाही तिथे लाडकी बहीण काय घेऊन बसलात, असे नॅरेटिव्हही तयार झाले होते. मात्र, न्यायालयाने हा बंद अवैध ठरवून त्यांचा डावच उधळून लावला. तेव्हापासून विरोधक चांगलेच



चवताळले आहेत. आता त्यांच्या हाती सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पुतळ्याचे प्रकरण लागले आहे. तो पुतळा उभारण्याचे काम नौदलाने केले. मात्र, त्याचे खापर महाराष्ट्र शासनावर फोडले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्या पुतळ्याचे लोकार्पण झाल्यामुळे या घटनेची नैतिक जबाबदारी मोदी यांनी घ्यावी आणि देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी केली जात आहे. जम्मू-काश्मीर आणि हरयाणा विधानसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम झाला असला, तरी इकडे महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटून विरोधक आंदोलनाचे हत्यार उपसून कामाला लागले आहेत. त्या तारखा जाहीर झाल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही आंदोलनापासून फुरसत मिळालेली नाही. कोणत्या ना कोणत्या कारणाने हे आंदोलन हाती घेतले जात आहे. अजून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत. एकूणच परिस्थिती पाहता राज्यातील महायुती सरकारनेही सावध व गरज पडल्यास आक्रमक भूमिका घेणे गरजेचे आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आधीही विरोधकांकडून देशभर असेच आंदोलन पुकारण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने शेतकरी आंदोलन, शाहीनबाग आंदोलनाचा उल्लेख करता येईल. शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे असतानाही त्याला विरोध केला गेला. एवढेच नव्हे, तर ठिय्या आंदोलन करून सर्वसामान्यांचे हाल बेहाल करून टाकले होते. शाहीनबाग आंदोलनामुळे तर देशात जातीयवादाचा मोठा आगडोंब उसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने लाल किल्ल्यापर्यंत आंदोलनकर्त्यांनी मजल मारली होती. साधारणतः माझा असा अनुभव आहे की, देशात, राज्यात जेव्हा निवडणुका अपेक्षित असतात तेव्हा विरोधकांकडून आंदोलनाचे शस्त्र पाजळले जात असते. त्यात सर्वसामान्यांच्या संपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत असते, कधी कधी तर अशी आंदोलने जीवावरही बेतत असतात. मात्र, त्यांचे कोणाला काही सोयरसुतक नसते. निव्वळ आपली पोळी भाजून घेणे, हाच त्या मागचा हेतू असतो. लोकांमध्ये सत्तापक्षाविरुद्ध जहर पसरविणे हाच त्या मागचा प्रमुख उद्देश असतो, सत्तापक्षाला सत्तेवरून हुसकावून लावून सत्ता बळकावणे, अशी विरोधकांची अपेक्षा असते. येनकेनप्रकारेण सत्ता बळकाविणे, हे विरोधकांचे उद्दिष्ट असते. यांना सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी, त्यांच्या समस्या; अडचणींशी काहीही देणे घेणे नसते. बरं, हे पुन्हा सत्तेत आले तर जनसामान्यांसाठी काही करतात का? तर उत्तर आहे नाही... मात्र, आंदोलनाचा दाह शांत झालेला असतो. एवढेच...

९८८१७१७८०३

## मुंबई वार्तापत्र

# उबाठाकडून निव्वळ ढोंगबाजी

**नागेश दाचेवार**

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी देशातील सर्वच संवैधानिक यंत्रणांचा वारंवार अपमान केला आहे. देशाच्या पंतप्रधानांचा अवमान केला आणि सातत्यानं करतच असतात. आता तर यांची मजल देशाच्या सर्वोच्च पदावरही चिखल उडविण्याइतपत पोहोचल्याचे दिसले. निमित्त झाले आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकत्याच महिला सुरक्षेविषयी व्यक्त केलेल्या भावनेचे. राष्ट्रपतींनी देशाच्या प्रमुख आणि एक महिला म्हणून देशातील तमाम महिलांच्या सुरक्षेविषयी चिंता व्यक्त केली. त्यासाठी त्यांनी काही घटनांचा दाखलादेखील दिला. राष्ट्रपतींनी व्यक्त केलेल्या भावनांमागची महत्त्वाची भूमिका ही महिला सुरक्षेविषयीची चिंता आहे. असे असताना, विरोधक अर्थात मविआचे नेते, प्रामुख्याने बोलघेवडे संजय राऊत यांनी देशातील सर्वोच्च संवैधानिक पदावर लांच्छन लावण्याचे काम केले. राष्ट्रपतींनी कधी बोलावे, कधी बोलू नये याबाबत मार्गदर्शन हे बोलघेवडे देशाच्या सर्वोच्च पदाला करत आहेत. 'या घटनेवरच का बोलल्या? त्या घटनेवर का नाही बोलल्या?' असे अनेक प्रश्न हे लोकं राष्ट्रपतींच्या भूमिकेवर उपस्थित करताना दिसत आहेत. पश्चिम बंगालची अत्याचारग्रस्त डॉक्टर आपली मुलगीच आहे. पण बदलापूरच्या चिमुकल्या मुली राष्ट्रपतींच्या कुणीच लागत नाही का, असा प्रश्न हे टिनपाट लोक करताना दिसत आहेत. त्याचवेळी संदेशखालीच्या घटनेचा उल्लेख का केला नाही, असा प्रश्न मात्र यांनी विचारला नाही. मुळात राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या लेखात पश्चिम बंगालच्या ताज्या घटनेसह बदलापूरच्या चिमुकल्यांचा, दिल्लीच्या घटनेचा दाखला दिला आहे. मात्र, प्रातिनिधिक स्वरूपात उदाहरणंदेखील केवळ भाजपाशासित राज्यांचीच द्यावी, असा आग्रह विरोधकांचा आहे. घटना कितीही संवेदनशील असो, पण मविआच्या नेत्यांना मृतांच्या टाळूवरचे लोणी खाल्ल्याशिवाय समाधान वाटत नाही. प्रत्येक घटनेचं राजकारण करणे, खोटा 'नॅरेटिव्ह' पसरवून आपली राजकीय पोळी शेकणे यापलीकडे यांची बुद्धीच चालत नाही, हे या देशासाठी, समाजासाठी, माणुसकीसाठी लांच्छनास्पद आहे.

'महिलांची सुरक्षा : आता अती झाले...' अशा आशयाचं शीर्षक असलेल्या लेखातून राष्ट्रपतींनी एक महिला म्हणून आपली संतप्त भावना व्यक्त केली. महिलांच्या सुरक्षेला घेऊन चिंताही व्यक्त केली. त्याचबरोबर त्यांनी उपाययोजना करण्याचे, महिलांना आत्मरक्षणाचे धडे देण्याचे आणि समाजातील विकृती दूर करण्याची गरज असल्याच्या सूचनाही दिल्या आहेत. त्यांनी केवळ पश्चिम बंगालमध्ये उपाययोजना करण्याची किंवा बदलाची गरज आहे, असे कुठेही म्हटलेले नसून देशातच अशा घटना घडत आहेत. त्यासाठी संपूर्ण देशात बदलाची, उपाययोजनांची गरज असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या लेखात म्हटलं आहे. पण विरोधकांना प्रत्येक गोष्टींचंच भांडवल करण्याची सवय जडली आहे. खोटा नॅरेटिव्ह पसरवून समाजात दुही निर्माण करणे, आपली राजकीय पोळी शेकणे यासारखे अत्यंत असंवेदनशील असे सुप्त हेतू यामागे आहेत. यांना महिलांच्या सन्मानाशी, रक्षणाशी काहीही देणंघेणं नाही. हे संजय राऊत यांच्या कंगना राणावत, माजी खासदार नवनीत राणा, डॉ. स्वप्ना पाटकर यांच्याविषयी वापरलेली भाषा, डॉ. स्वप्ना पाटकरांसोबतचा संजय राऊतांचा टेलिफोनिक संवाद ऐकला तर याला नेता किंवा एखाद्या वृत्तपत्राचा कार्यकारी संपादक हे पद शोभत नाही. गल्लीबोळातील हा एक विकृत, चिरकूट असा थिल्लर टपोरी असा माणूस असल्याचे सिद्ध होते आणि हीच व्यक्ती इतरांना शहाणपण शिकवते, महिलांच्या सन्मानाविषयी बोलते. इतकंच काय, देशाच्या राष्ट्रपतींनासुद्धा आता सल्ले देताना दिसतो तेव्हा हसू आवरत नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यात महिलांवर अत्याचार झाले नाहीत? राज्यात बलात्काराच्या, महिलांच्या हत्येच्या घटना घडल्या नव्हत्या? घडल्या होत्या... नुसत्या घडल्याच नाही तर त्या वाढल्या होत्या. उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात संजय राऊतांविरोधात डॉ. स्वप्ना पाटकरांनी तक्रार दिली होती. त्यांच्याच कार्यकाळात संजय राऊतांनी फोनवरून डॉ. स्वप्नांना अश्लील शिवीगाळ केली होती. उद्धव ठाकरेंकडून काय कारवाई करण्यात आली होती संजय राऊतांविरोधात तेव्हा? त्यावेळी तरुण, तरुणी, म्हातारे, अभिनेत्री, पोलिस, उद्योगपती, व्यापारी, नेव्ही ऑफिसर, खासदार, आमदार, मंत्री, केंद्रीय मंत्री असे कोणीही सुरक्षित नव्हते, कुण्या एका महिलेला मदत केली म्हणून जितेंद्र आव्हाडाने 'जाऊ दे, मरू दे तिला. तू मध्ये पडू नको'चा सल्ला दिला होता, त्याचीही ध्वनिफीत समाजमाध्यमांवर फिरत आहे, मध्यप्रदेशात काँग्रेसने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जमीनदोस्त केला होता आणि आता मात्र नकळत कुठल्या तरी नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक बाबींमुळे पुतळा कोसळला तर त्याचं भांडवल करताना हेच लोक दिसत आहेत. समाजाच्या भावना भडकावणे, जाती-जातीत, धर्मा-धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रकार हे संधिसाधू लोक वारंवार करत आहेत.

उद्धव ठाकरेंनी स्वतः मुख्यमंत्री असताना महिला सुरक्षेविषयी, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी काहीही एक केलं नाही. २०२० ते २०२३ या काळात राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले होते. महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांत वाढ झाली होती. स्वतःचं पाप आणि अपयश ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पाहायचं वाकून असा प्रकार या मविआच्या संधिसाधू, विकृत, समाजविघातक नेत्यांचा आहे. मणिपूरवर छाती बडवणारे हे लोकं संदेशखालीवर बोलताना दिसले नाही. 'आम्ही दोघं छोटेसे बहीण-भाऊ, उद्याला मोठाले होऊ...'वाले राहुल-प्रियांका या बहीण-भावाच्या जोडीने हाथरसला जाऊन प्रचंड ड्रामा केला. 'लडकी हूं लड सकती हूं'चा नारा दिला. मात्र, त्याचवेळी संदेशखाली, कोलकाता रेप ॲण्ड मर्डर केस झाल्यावर तेथे जाणे तर सोडा; त्यावर ब्रदेखील उच्चारला नाही. लाडकी बहीण योजना लागू केली तर ती रद्द करा म्हणून काँग्रेस एकदा नव्हे तर दोन-दोन वेळा उच्च न्यायालयात गेली आणि हेच लोक महिला सन्मान, महिला सुरक्षेचा कांगावा करत डांगोरा पिटत फिरत आहेत. नव्या संसदेच्या उद्घाटनाला बोलावले नाही तेव्हा हेच लोकं राष्ट्रपतींची प्रतिष्ठा, आदिवासी समाजाच्या सन्मानाचे गोडवे गात होते, पोवाडे म्हणत होते. याच लोकांना आदिवासी समाजाविषयी आत्मीयता आहे, ना संविधानाचा, ना संवैधानिक पदांचा, ना संवैधानिक यंत्रणांचा किंवा महिलांचा आदर, सन्मान आहे. त्यामुळे हे लोकं राष्ट्रपतींसारख्या सर्वोच्च संवैधानिक पदाचा आणि एक आदिवासी महिला म्हणून त्यांचा सन्मान करतील, ही अपेक्षाच करणं चुकीची आहे.

९२७०३३३८८६

### राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शन

नुकतेच राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शन मिळणार हा आनंद देणारा निर्णय कॅबिनेट बैठकीत घेतला त्यामुळे सरकारचे अभिनंदन आणि आभार. सध्या सरकार सर्व लोकांना खुश करण्याच्या योजना आखण्यात व्यस्त आहेत. पण राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, राज्य परिवहन महामंडळ, म्हाडा यासारख्या अनेक सरकारी निमसरकारी कार्यालयात, ३५ ते ४० वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना की जे कर्मचारी जनतेच्या प्रत्यक्ष संपर्कात असतात आणि जनतेची सेवा करतात अशा कर्मचाऱ्यांसाठी सरकारजवळ कुठलीही योजना नाही कारण ते कर्मचारी ईपीएस-९५ योजनेअंतर्गत येतात. गेल्या १० वर्षांपासून केंद्रात व राज्यात डबल इंजिन सरकार आहे, पण या कर्मचाऱ्यांसाठी कोणीच काही करताना दिसत नाही. या कर्मचाऱ्यांना १५०० ते ३००० इतक्याच रकमेच्या पेन्शनवर गुजराण करावी लागते. केरळमधील कोर्टाने ईपीएफओच्या विरोधात व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला होता, त्याचाच संदर्भ घेऊन विद्युत मंडळातील लोकांना ईपीएफओने ऑप्शन फॉर्म मागितले होते तसे परिपत्रकही आले होते. त्या परिपत्रकात असे होते की कंपनीचा मिळालेला वाटा परत करावा लागेल व त्या आधारे पेन्शनचे कॅल्क्युलेशन केले जाईल या करिताच २०१४ च्या नंतर जे सेवानिवृत्त झाले त्यांनी ऑप्शन फॉर्म भरून द्यावा व त्यानंतर आपणास डिमांड येईल. पण तसा फॉर्म भरूनही २ वर्षाचा कालावधी लोटला तरी सुद्धा अजून कोणालाही डिमांड आली नाही. सर्व कामगार संघटना या प्रश्नावर आवाज उठवतात परंतु केंद्र सरकार व राज्य सरकार लक्ष द्यायला तयार नाहीत. काहीतरी निवडणुकीच्या दृष्टीने प्रलोभनकारी योजना काढून हजारो कोटी रुपये खर्च करतात. परंतु कर्मचाऱ्यांचेच हजारो कोटी रुपये भविष्य निर्वाह निधीत पडून आहे. त्यातूनच एखादी पेन्शन योजना करता आली तर करावी असा विचार देखील सरकारच्या मनात येत नाही. अशा निवृत लोकांनी कसे जीवन जगावे हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. करिता केंद्र आणि राज्य सरकारला विनंती आहे की लवकरात लवकर ईपीएस-९५ च्या पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावावा व पेन्शनमध्ये वाढ करावी.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे

### आणिबाणीतील एक भयानक बाब

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७५ साली देशावर लादलेल्या आणिबाणीच्या काळ्या काळात झालेल्या अत्याचारांबद्दल अनेक गोष्टी प्रकाशित झाल्या, परंतु एका भयानक बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. तेव्हा मिसा कायद्याची सुनावणी सुप्रीम कोर्टात चालू असतानाच अँटर्नी जनरल नीरेन डे यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, पागल न्यायाधीशही मिसा अंतर्गत अटकेचा आदेश काढू शकतो तसेच मिसाबंदीच्या खुनासही कोणी जबाबदार राहणार नाही. हे वक्तव्य 'तरुण भारत'सह अनेक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. रा. स्व. संघाचे एक अधिकारी पांडुरंगपंत क्षीरसागर व अनेक मिसाग्रस्त निर्दोष नागरिक जेलमध्ये मृत्यू पावले. राजन नावाच्या एक मिसाबंदीचा भयानक छळ होऊन मृत्यू झाला. आणिबाणीनंतर जनता शासनातील गृहमंत्री चरणसिंग यांनी म्हटले होते की, जर १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसचा जय झाला असता तर जेलमध्ये अनेकांचे खून झाले असते. ॲटर्नी जनरल नीरेन डे यांच्यावर निवृत्त सरन्यायाधीश हिदायतुल्ला यांनी कठोर शब्दात टीका केली होती.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

### विरोधकांचे नीतिशून्य राजकारण

आंदोलन कशासाठी? सत्तेसाठी! आंदोलनासाठी संधीच्या शोधात असणाऱ्या विरोधकांवर कृपावंत होऊन, छत्रपतींच्या पुतळ्याने विरोकांवर जणू अनन्य उपकार केले आहेत. आंदोलकांचा अभिनिवेश बघितल्यावर छत्रपतींचा पुतळा पडला या दुःखापेक्षा, आंदोलनाची संधी मिळाली, याचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. महाराजांनी अठरापगड जातींना, गुणी लोकांना मायेनं जोडून ताकद एकवटली आणि महाराष्ट्र घडविला. पडला तो शिवाजी महाराजांचा पुतळा आहे हे जाणून, छत्रपतींचे पाईक म्हणवून घेणाऱ्यांनी आधी एकवटून पुतळा उभा करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक होते, पण ते घडले नाही. तसे घडले असते तर सकारात्मक राजकारणाचा संदेश जनतेत गेला असता. पण ते हवंय कोणाला?

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

### 'दुर्गा' एक सर्वांगसुंदर मालिका

आजच्या बहुतेक भिक्कार, टुकार, बेकार (अजून काय विशेषणं लावता येतील ती लावा!) मराठी मालिकांमध्ये कथा, अभिनय, संवाद, फोटोग्राफी या सर्व क्षेत्रात सरस व उत्कंठा वाढवणारी कलर्स मराठीवरची रात्री ७.३० वाजता येणारी मालिका 'दुर्गा' नक्कीच पाहावी अशी आहे. जरा नवीनच असणाऱ्या कलाकारांनी समरसून भूमिका केल्या आहेत. खरी पत्रकारिता करणारी सुंदर, तरुण व बेधडक दुर्गा, तिचा पत्रकार मित्र, खास राजकारणी दादासाहेब मोहिते व परिवार, त्यांचा कलंदर कलाकार मुलगा कवी गंधार, शिक्षण क्षेत्र, भ्रष्टाचाराला विरोध करताना जीव गमवावा लागणारा दुर्गाचा बाप यशवंत देशमुख, त्याची वेड लागलेली बायको व इतर समर्पक पात्रे. वाऽ बढिया सीरियल आहे दुर्गा!

**रवी वाघमारे**/९९७००१८०३०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सोलापूर : विजापूर रोड परिसरात महानगरपालिका अतिक्रमण विभागाच्या वाहनाचे टायर फुटल्याने वाहन चालकाचा सावधगिरीमुळे वाहन चालकाने दुभाजकावर ट्रक चढवला. त्यामुळे अनर्थ टळला. वाहनांची चाके निकृष्ट दर्जाची असल्यामुळे ही घटना घडली.

(छायाचित्र : केवल तिवारी)



# प्रलंबित रिक्षा थांबा प्रश्नी एका आठवड्यात बैठक घेणार

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे संभाजी आरमारला आश्वासन

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

शहरामध्ये वाढत्या रिक्षा संख्यांच्या मानाने रिक्षा थांबे नसल्यामुळे रिक्षाचालकांना व्यवसाय करण्यास अडचणी येत आहेत. तसेच वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नवीन रिक्षा थांब्यांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी संभाजी आरमारने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली. संभाजी आरमारच्या या मागणीची तातडीने दखल घेत १ आठवड्यात या प्रश्नी संबंधित विभागासोबत बैठक लावून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले आहे.

सोलापूर शहरामध्ये आजमितीस १५ हजाराच्यावर परवानाधारक रिक्षा आहेत. शासनाने रिक्षा परवाना खुला केल्यामुळे मागील काही वर्षात हजारोंच्या संख्येने रिक्षांची वाढ झालेली आहे. मात्र, त्याप्रमाणात नवीन रिक्षा थांब्यांची निर्मिती झालेली नाही. शहरातील सर्वच भागातील रिक्षाचालकांची नवीन रिक्षा थांबे होण्यासाठी प्रशासनाकडे मागणी आहे. अधिकृत रिक्षा थांबे नसल्यामुळे रिक्षाचालक अनधिकृतपणे कुठेही रिक्षा लावून व्यवसाय करत आहेत. शहरातील रिक्षा थांब्यांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर शहर पोलीस वाहतूक विभाग, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि नगर अभियंता सोलापूर महानगरपालिका यांची समिती गठीत करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र या समितीची बैठकच झाली नसल्याची बाब संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. याप्रसंगी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा संघटनेचे सचिन लंगाळे, संजय मस्के, उदय रजपूत, दत्ता किन्नूरे, किरण क्षीरसागर, विश्वास सोनवणे, राजकुमार निंबोळे, विजय माने, कुंदन तौर, फारूक मोहोळकर, शाम वाघमोडे, अय्युब शेख, कृष्णात काटे, जावेद शेख, मछिंद्र खलाटे, सादिक शेख आदींसह रिक्षाचालक सहभागी झाले होते.



सोलापूर : कला व्यवसाय केंद्र चित्रकला महाविद्यालयात मूर्तिकार अंकुश बडगू यांनी कमीतकमी वेळेत सुबक व रेखीव पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक दिले. यावेळी कलाध्यापक गोपाळ डोंगे, श्रीनिवास यनगंदूल, प्राचार्या प्रतिभा धोत्रे, विजय गाजूल आदी.

## निधन वार्ता

### चंद्रकांत खाडे



**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**

येथील श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. चे संचालक चंद्रकांत जगन्नाथ खाडे (वय ६०) यांचे शुक्रवारी पहाटे पुणे येथे खासगी रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर कुर्डूवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भगवंत पतसंस्थेचे जनरल मॅनेजर अनिल बनसोडे यांचे ते साडू होत.

### यलप्पा मैसूर



**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

अशोक चौक येथील रहिवासी यलप्पा नारायण मैसूर (वय ८६) यांचे शुक्रवारी (दि. ३०) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दुपारी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. महावीर बँकेचे व्यवस्थापक कृष्णाहरी मैसूर यांचे ते वडील होत.

### माणिकराव गोपगोंडा



**अक्कलकोट, दि. ३० ऑगस्ट-**

तालुक्यातील नागणसूर येथील मल्लिनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे चेअरमन माणिकराव रेवणसिद्धप्पा गोपगोंडा (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


## महाराष्ट्र शासन,

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मोहोळ, तालुका मोहोळ जि. सोलापूर**

गायकवाड बिल्डिंग, मेन रोड, जुन्या स्टेट बँकेजवळ मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर
दूरध्वनी क्र. ०२१८९-२३२२६९ E mail-arcsmohol@gmail.com

**जा.क्र.सनिमो/कक्ष-२/पतसंस्था/नोंदणी/ जाहिर नोटिस / ७१६/२४ दिनांक :- २७/०८/२०२४**

### जाहिर नोटीस

**१. नियो. सावित्रीबाई फुले महिला क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. कामती खु. ता. मोहोळ जि. सोलापूर**

उपरोक्त नियोजित पतसंस्थेने मोहोळ तालुका कार्यक्षेत्र करीता नवीन पतसंस्था नोंदणीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. मोहोळ तालुक्यातील कार्यरत व नोंदणीकृत सर्व महिला नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या कार्यक्षेत्राबाबत, सभासदांबाबत किंवा संस्था नोंदणी बाबत काही आक्षेप / हरकती असल्यास दि.१३/०९/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता सुनावणी घेण्यात येणार आहे.

तरी सदर सुनावणी वेळी लेखी आक्षेपासह उपस्थित राहुन आपले म्हणणे मांडावे. आपण सुनावणीस उपस्थित न राहिल्यास आपणास काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे समजुन उपरोक्त नियोजित संस्थेच्या नोंदणी बाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(नियोजित संस्थेच्या प्रवर्तक सभासदांची यादी व नोंदणी प्रस्ताव या कार्यालयात पहावयास मिळेल)

**सही/-**
**(एस.एस. कदम)**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मोहोळ**

### दाखले हरवले आहेत

मी **प्रियांका मधुकर वाघमारे,** रा. दत्त गॅरेजजवळ, कुर्डुवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर माझा **श्री विठ्ठल उच्च माध्यमिक विद्यालय, सारणी (सां), ता. केज, जि. बीड** या शाळेचा इयत्ता १० वी व १२ वी, डी.एड., वाय.सी.एम. बी.ए. चे शाळा सोडल्याचा दाखले व सर्टिफिकेट्स् बार्शी बसस्थानक परिसरात गहाळ झाले आहे. याबाबतची रीतसर गहाळ झाल्याची नोंद मी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे केली आहे. तरी कोणास सापडले असल्यास आणून द्यावे. आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क- मोबाईल नंबर - ८८८८२६०५८५**

## शिवलाल रामचंद वाचनालय, माढा

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

शिवलाल रामचंद वाचनालयाची सर्वसाधारण सभा रविवार, दि. १५/०९/२०२४ रोजी दुपारी ३ वाजता संस्थेच्या वालुबाई सभागृहात आंयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनीः वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती, विषयपत्रिका वाचनालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे. दि. ३०/०८/२०२४

**सही/** **संकल्प शहा (कार्यवाह)**

**सही/-** **हणमंत परबत (सर) (अध्यक्ष)**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी बार्शी म्युन्सिपल हद्दीतील सि.स.नं. ४०८३/अ२ पैकी प्लॉट नं. १२ याचे क्षेत्रफळ ३९.०३ चौ.मी. व ७८.०६ चौ.मी. आहे. याचे चौ.फूट ८४० मोजमाप आहे. यांसी चतुःसिमा- पूर्वेस- २० फूट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- स.नं. प्लॉट पैकी उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस- गट नं. ६५२ पैकी जागा, उत्तरेस- प्लॉट नं. १२ व १३ पैकी जागा. सदर जागेची पाणी व वागणूक पूर्व बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. सदर जागेत २१.३७ चौ.मी. पत्रा शेड आहे. त्यासह संपूर्ण जागा आतील तदंगभूत वस्तूंसह व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.

वरील वर्णन केलेली प्लॉट जागा ही श्री. लिंबराज श्रीरंग बनसोडे यांनी संतोष बळीराम शिंदे व राजेंद्र बळीराम शिंदे यांचेकडून ता. २९/०४/२०१५ रोजी खरेदी घेतली असून वर नमूद जागा ही ७/१२ रेकॉर्डला व मालमत्ता पत्रकी श्री. लिंबराज श्रीरंग बनसोडे यांचे नावे असून त्यांनी सदर प्लॉट जागा ही कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकार सौ. राजेश्री लिंबराज बनसोडे, रा. उपळाई (ठों), ता. बार्शी यांना कायम खूषखरेदी देण्याचा ठराव करुन वर नमूद प्लॉट जागेची एकूम मूळ किंमत रक्कम रुपये ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये मात्र) ठरवून त्यापैकी ता. ०२/०६/२०२२ रोजी आमचे पक्षकार यांचे हक्कात नोटरी दस्त क्र. ७०९/२०२२ अन्वये नोंदवून देवून रक्कम रुपये ४,००,०००/- (अक्षरी चार लाख रुपये मात्र) साक्षीदारा समक्ष रोख स्वीकारलेली आहे. यातील खरेदी देणार यांनी सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच वर नमूद मिळकती संदर्भाने इतर कोणीही कसल्याही प्रकारचणा साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण अथवा बँक कर्ज बोजे व विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क, अधिकार निर्माण होतील असा कोणताही व्यवहार करु नये. तसे केल्यास तो व्यवहार आमचे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. या उपरही आमचे पक्षकार सौ. राजेश्री लिंबराज बनसोडे व खरेदी देणार श्री. लिंबराज श्रीरंग बनसोडे यांचा ता. ०२/०६/२०२२ रोजीच्या इसार पावती व्यवहारा आधी कोणीही यातील श्री. लिंबराज श्रीरंग बनसोडे यांचेशी वर नमूद प्लॉट जागेसंदर्भाने साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क, अधिकार निर्माण होतील असा दस्त केला असल्यास त्या संबंधीची सर्व ती कागदपत्रे घेवून आमचे अशिल सौ. राजेश्री लिंबराज बनसोडे किंवा त्यांचे माहितीगार वकील ॲड. राहुल अंकुश पाटील यांच्याकडे येत्या आठ दिवसाचे आत संपर्क करावा अन्यथा वर नमूद प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार किंवा हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

तारीख : ३०/०८/२०२४

सही/-
**श्री. ॲड. राहुल अंकुश पाटील (गुंड),**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर मो.नं. ९५२७०२३११८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**दि. पंढरपूर मर्चंट्स को-ऑप बँक लि. पंढरपूर - अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २०८/२०२४-२५ | ४०,४५६/- | १ | **योगेश दिलीप कांबळे,** रा. जैन मंदिरजवळ, कुर्डूवाडी, ता. माढा जि. सोलापूर |
| | | | ३ | **सुनिल शिवाजी भोंग** रा. मु.पो. लऊळ, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. १३/०९/२०२४ रोजी दुपारी १२.00 वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ३०/०८/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

## श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी

**२५४९/१/१ड, जामगांव रोड, बार्शी- ४१३ ४०१ जि. सोलापूर**

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस २०२३-२०२४

**(फक्त सभासदांसाठी)**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १५/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता **मातृ मंदिर, दिनदयाळनगर, कुर्डुवाडी रोड, ढगे मळा, बार्शी** येथे खालील कामकाजाचा विचार करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहण्यास विनंती आहे.

**-: सभेपुढील विषय :-**

१) दि. १५/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२४ अखेर संपलेले वर्षाची आर्थिक हिशोब पत्रकास मान्यता देणे व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणे.
३) संस्थेचे सन २०२३-२०२४ चे लेखापरीक्षक यांनी दिलेला लेखापरीक्षण अहवाल स्वीकारणे.
४) सन २०२४-२०२५ सालाकरिता संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचे वेतन ठरविणे.
५) मा. चेअरमन यांचे परवानगीने येणाऱ्या ऐनवेळेच्या विषयांचा विचार करणे.

ठिकाण :- बार्शी
दिनांक :- ३०/०८/२०२४

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
**श्री. र. मा. माचवे,** व्यवस्थापक

**टीप :-** १) वरील सर्व बाबींचे कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात सुट्टीच्या दिवसाशिवाय कामकाजाच्या वेळेत सभासदांस पाहण्यास ठेवली आहेत. त्याबाबत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास तसे लेखी प्रश्न दि. १०/०९/२०२४ पूर्वी पाठवावेत. २) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल. त्यास कोरमची आवश्यकता लागणार नाही.

## कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,

**नोंदणीकृत कार्यालय, कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, रविवार पेठ, बी.विंग तळमजला गांधीनगर अक्कलकोट रोड सोलापूर - ४१३००६**
**CINL17119PN1980PLC022962 ई-मेल katarespinningmills@gmail.com**

### नोटीस

सर्वांना सूचना देण्यात येते की कंपनीच्या सभासदांसाठी ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार २७, सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.00 वाजता (भारतीय प्रमाणवेळ ) कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, तळमजला, बी विंग, गांधीनगर अक्कलकोट रोड, सोलापूर - ४१३००६ येथे आयोजित केली आहे. वरील सर्वसाधारण सभेसाठीच्या सूचना आणि वार्षिक अहवाला कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच एजन्सी म्हणजेच www.katarespinningmills.com CDSL www.evotingindia.com ज्या सदस्यांना वार्षिक अहवाल मिळाला नाही. त्यांनी व्यवस्थापकीक संचालक यांना वरील निर्देशित केलेले ई-मेल आयडीवर किंवा नोंदणीकृत कार्यालयाशी संपर्क साधून वार्षिक अहवालाची मागणी करावी. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ सह वाचल्या जाणा-या तसेच केलेल्या नियमाप्रमाणे आणि सेबीमधील नियम व अधिनियम ४४ नुसार ( लिस्टिंग ऑबलिगेशन ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वारमेंट ) अधिनियम २०१५ नुसार कंपनीने सभासदांसाठी त्यांचे मत इलेक्ट्रानिक पध्दतीने मत नोंदणीची सोय उपलब्ध करून दिली आहे ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील प्रस्तावांवर त्यांना या द्वारे मतदान करता येईल. कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदी आणि नियमानुसार तपशील खालीलप्रमाणे दिले आहे.

मतदाराद्वारे इलेक्ट्रानिक मतदान केला जावू शकतो. रिमोट ई-मतदानास कालावधी मंगळवार २४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९.00 वाजता सुरू होईल आणि गुरूवार, २६ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५.00 वाजता समाप्त होईल. कंपनी कायदा २०१३ मधील कलम ९१ अन्वये आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमानुसार सदस्यांची नोंदणी आणि कंपनीचे भाग हस्तांतर पुस्तक २१ सप्टेंबर २०२४ ते २७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत बंद ठेवण्यात आले आहे. कंपनीच्या सभासदांचे समभाग जे फिजिकल फॉर्ममध्ये अथवा डिमॅटराईजड फॉर्ममध्ये असतील त्यासाठी कट ऑफ डेट शुक्रवार, दिनाक २० सप्टेंबर २०२४ असेल. सभासदांनाच फक्त सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहून सभासद ई-रिमोट मतदान करून सभेत सहभाग घेऊ शकतील. परंतु पुन्हा ते प्रत्यक्ष मतदान सभेमध्ये करू शकणार नाहीत.

जी व्यक्ती ज्याच्याकडे कंपनीचे समभाग आहेत आणि जे सभेची नोटीस पाठविल्यानंतर सभासद झाले आहेत आणि कट ऑफ तारखेदिवशी म्हणजे २० सप्टेंबर २०२४ रोजी भागधारक झाले आहेत. त्यांनी ई-व्होटींग संदर्भातील सूचना पाळाव्यात. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रथमच सदस्य झालेल्यांनी नियम पाळावेत. कंपनीच्या संकेतस्थळावर याबाबतचे नियम निर्देशित केले आहेत. यासंदर्भात सभासदांना काही तपशील हवे असतील तर त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट जे की, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. यांच्याशी संपर्क साधून आवश्यक तो लॉग इन आय. डी. आणि पासवर्ड उपलब्ध करून घ्यावा. वार्षिक सर्वसाधारण सभेत मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे. जे सदस्य सभेसाठी प्रत्यक्ष हजर आहेत. परंतु त्यांनी रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान केलेले नाही केवळ तेच सदस्य मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क बजावू शकतील. इलेक्ट्रानिक मतदाना करिता सदस्य मदत विभागातर्गत नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FQs) आणि www.evotingindia.com वर इलेक्ट्रानिक पध्दतीचे ई-मतदान करण्याच्या सुविधेशी संबधित असलेल्या कोणत्याही तक्रारी दूर करण्यासाठी संपर्क साधावे. उपव्यस्थापक, सेंट्रल डिपाझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ऑफीस १७ वा मजला, पी. जे. टॉवर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०००१ दुरध्वनी क्रमांक १८००२००५५३३ / ०२२-२२७२८५८८ ई-मेल helpdesk.evotingcdslindia.com.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २९/०८/२०२४**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेडकरिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**डिन क्रमांक - ००६४५०१३**

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २८६/२०२४**

**१) योगेश मोहन पखाले,**
रा. घारी, ता. बार्शी, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे आजोबा, दत्तु नाना लोहार, रा. घारी, ता. बार्शी यांचा मौजे घारी, ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १० फेब्रुवारी १९८० रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे आजोबा दत्तु नाना लोहार यांचा दिनांक १० फेब्रुवारी १९८० रोजी मौजे घारी, ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३०६/२०२४**

**१) धनाजी बापू कोळी,**
रा. नारी, ता. बार्शी, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील अक्षय सी. काशीद) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा मयूर धनाजी कोळी, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १५ फेब्रुवारी २०१० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा मयूर धनाजी कोळी यांचा दिनांक १५ फेब्रुवारी २०१० रोजी मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर प्रकटीकरण

**मृत्यू नोंद अर्ज नं. २६८/२०२४**

**बार्शी येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

**राजश्री भिमराव जहागीरदार,** वय ५६, धंदार- घरकाम,
रा. सोमवार पेठ, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**मा. ग्रामसेवक, शेंद्री ग्रामपंचायत, शेंद्री,**
ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

ज्याअर्थी, यातील अर्जदार राजश्री भिमराव जहागीरदार यांचे चुलत आजोबा कल्याणस्वामी डोमगांव ऊर्फ कल्याणस्वामी डोमगांवकर हे दि. २७/०५/१९७३ रोजी राहते घरी मौजे शेंद्री, ता. बार्शी येथे मयत झाले आहेत. राजश्री भिमराव जहागीरदार यांचे चुलत आजोबा कल्याणस्वामी डोमगांव ऊर्फ कल्याणस्वामी डोमगांवकर यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय शेंद्री यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला होण्याबाबत अर्जदाराने सदरील अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार राजश्री भिमराव जहागीरदार यांचे चुलत आजोबा कल्याणस्वामी डोमगांव ऊर्फ कल्याणस्वामी डोमगांवकर यानचा मृत्यूबाबत कोणाची काही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १०/०९/२०२४ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांच्या मृत्यूची नोंद शेंद्री ग्रामपंचायत यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला नोंद करण्याबाबत योग्य ते आदेश देण्यात येतील. कळावे, हे जाहीर प्रकटीकरण दिले. तारीख : ३०/०८/२०२४

**लिपीक**

(गोल शिक्का)

सही/-
**तहसीलदार साहेब, बार्शी,**
ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३०७/२०२४**

**१) धनाजी बापू कोळी,**
रा. नारी, ता. बार्शी, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील अक्षय सी. काशीद) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा राज धनाजी कोळी, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०७ जून २००९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा राज धनाजी कोळी यांचा दिनांक ०७ जून २००९ रोजी मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अवनी लेखराचा 'सुवर्णभेद'

## पॅरिस पॅरालिम्पिक ● मोना अग्रवालला पदार्पणात कांस्यपदक



◆ **पॅरिस, ३० ऑगस्ट**

भारतीय पॅरा नेमबाज अवनी लेखरा हिने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएच १ मध्ये सुवर्णपदक, तर मोना अग्रवालने कांस्यपदक जिंकले. लेखरा पॅरालिम्पिकमध्ये दोन सुवर्णपदके जिंकणारी व पॅरालिम्पिकचा विक्रम मोडणारी पहिली भारतीय महिला ठरली. लेखराचे हे तिसरे ऑलिम्पिकपदक ठरले.

अवनी लेखरा आणि मोना अग्रवालने शुक्रवारी पॅरिस २०२४ पॅरालिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएस१ नेमबाजी स्पर्धेत अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकून भारताचे पदक खाते उघडले.

अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर स्टॅण्डिंग एसएच १ प्रकारात २४९.७ गुणांचा पॅरालिम्पिक विक्रम नोंदवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

मोना अग्रवालने महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये २२८.७ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

लेखरा हिने आपले टोकियो ऑलिम्पिकचे विजेतेपद कायम राखताना पॅरिसमध्ये नाट्यमय पद्धतीने सुवर्णपदक जिंकले.

अंतिम फेरीदरम्यान अवनी दुसऱ्या स्थानावर होती, ती कोरियन युनरी लीपेक्षा ०.८ गुणांनी मागे होती व अंतिम फेरीत केवळ एक शॉट शिल्लक होता, परंतु कोरियन प्रतिस्पर्धीने ६.८ गुणांसह वाईट लक्ष्य साधला, तर अवनीने पॅरिसमधील शूटिंग रेंजवर दर्जेदार कामगिरी करत १०.५ गुणांची नोंद करत अव्वल स्थान मिळवले.

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएच १ स्पर्धेत पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरलेल्या अवनीने पॅरिसमधील आपले विजेतेपद कायम राखले.

तिने २४९.७ गुणांचा नवीन पॅरालिम्पिक विक्रम प्रस्थापित करत शैलीदारपणे आपले दुसरे पॅरालिम्पिक पदक जिंकले. अवनीने यापूर्वी टोकियोमध्ये २४९.६चा विक्रम केला होता.

एकूणच २२ वर्षीय अवनी भालाफेकपटू देवेंद्र झाझरियानंतर दोन सुवर्णपदके जिंकणारी दुसरी भारतीय पॅरालिम्पिकपटू ठरली आहे.

अवनीचे पॅरालिम्पिकमधील हे तिसरे पदक आहे. तिने टोकियो येथे महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन एसएच १ नेमबाजी स्पर्धेत कांस्यपदकही जिंकले होते.

**पात्रता फेरीत अवनी अव्वल, मोना सहाव्या स्थानावर**

पात्रता फेरीत पाचव्या मालिकेनंतर अवनीने १०५.६ गुणांसह आपले स्थान कायम राखले आहे. मोनाने १०४.१ गुणांसह सहावे स्थान मिळवून ती अंतिम फेरीसाठी पात्र ठरली. ◀(*वृत्तसंस्था*)



## मनीष नरवालला रौप्यपदक

**पॅरिस, ३० ऑगस्ट -**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये पी१ पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएच१ नेमबाजी स्पर्धेत भारताच्या मनीष नरवालने रौप्यपदक जिंकले. भारताचा अन्य नेमबाज रुद्रांश खंडेलवालने नववे स्थान मिळविले.

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये अवनी लेखरा, मोना अग्रवाल व प्रीती पालच्या पदकानंतर मनीष नरवालचे हे रौप्यपदक भारताचे चौथे पदक ठरले. सुवर्णपदकासाठीच्या अंतिम लढतीत एकेवेळी मनीष ८.९ गुणांवर होता, तर कोरियाचा जो जेंगडू १०.८ गुणांवर होता. एक शॉट शिल्लक असताना मनीषला ३.७ गुणांची तूट भरून काढायची होती. अखेरच्या शॉटमध्ये मनीषने ९.९ गुण, तर जो जो जेंगडूने ८.७ गुणांची नोंद केली. ही कामगिरी जेंगडूला सुवर्णपदक जिंकण्यासाठी पुरेशी ठरली. जो जेंगडूने एकूण २३७.४ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर मनीष नरवालला २३४.९ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. चीनच्या यांग चाओने एकूण २१४.३ गुणांसह कांस्यपदक पटकावले.

## भारत अन् बांगलादेशची कसोटी मालिका रंगणार

**मुंबई, दि. ३० ऑगस्ट-**

टीम इंडिया आणि बांगलादेश यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका आणि तीन सामन्यांची टी-२० मालिका रंगणार आहे.

१९ सप्टेंबरपासून टीम इंडिया आणि बांगलादेश या मालिकेला सुरुवात होणार आहे. मात्र या मालिकेआधी भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू सुरेश रैना याने टीम इंडिया बांगलादेश संघाविरुद्ध खेळताना सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. सध्या पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात कसोटी मालिका सुरु आहे.

या मालिकेतील पहिल्या सामन्यात बांगलादेशने पाकिस्तानचा १० विकेट्सने पराभव केला. गोलंदाजी आणि फलंदाजीत बांगलादेशचा संघ भक्कम दिसून आला.

## संक्षिप्त वृत्त



### सेवासदन प्रशालेमध्ये क्रीडा दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

सेवासदन प्रशालेमध्ये क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थिनींच्या विविध क्रीडा प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, क्रीडा प्रमुख ज्ञानेश्वर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनींना खेळाविषयी व खेळा मुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक स्वास्थ्य शरीराची चलन वलन लवचिकता याविषयी माहिती सांगण्यात आली व्यायामाचे प्रकार योगासनाचे प्रकार सूर्यनमस्कार यांचे महत्त्व विशद करून सांगण्यात आले खेळामुळे शिस्त हारजीत साठी मनाची तयारी यांची बाल वयात जडणघडण होते संघ वृत्तीस चालना मिळते.




### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये राष्ट्रीय क्रीडा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका नागमणी पेगडा, सुनिता मंद्रुपकर व क्रीडा शिक्षक संतोष पाटील, शिवाजी आवताडे लावण्या दुस्सा उपस्थित होते. हॉकीचे जादुगर असलेले मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या इ ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यी व विद्यार्थ्यीनी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, उपसचिव नागेश शेंडगे यांनी कौतुक केले.



### वालचंदची नम्रता पवार हिची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालय यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या आंतरशालेय १९ वर्षाखालील मुलींच्या कुस्ती स्पर्धेत ६८ किलो वजनी गटांमध्ये नम्रता पवार हिने अजिंक्यपद पटकाविले.या कामगिरीवर तिची पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडाशिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, बायोटेक विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. आर. राव, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.



## क्रीडादिनी ठोकळ प्रशालेत उपलब्ध साधनातून स्वसंरक्षण कार्यशाळा

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

महिलांवरील वाढत्या अत्याचाराचे प्रमाण पाहता राष्ट्रीय क्रीडा दिनी उपलब्ध साधनातून स्वसंरक्षण कसे करावे यासाठीची कार्यशाळा युवती विद्यार्थ्यांसाठी विजापूर रोड्वरील निर्मलताई ठोकळ प्रशालेत झाली. पेन, वॉटर बॉटल, सॅक बॅक, स्कार्फ यापासून देखील युवती आपले स्वसंरक्षण करू शकतात. ते कसे करायचे याचे देखील प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण यावेळी उपस्थित युवती विद्यार्थ्यांना देण्यात आले.

तसेच गुड टच म्हणजे काय? बॅड टच म्हणजे काय? हे कसे ओळखावे याचे देखील प्रशिक्षण देण्यात आले. ही कार्यशाळा ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आली. ट्रेडिशनल दाडपट्टा असोसिएशनचे सचिव तथा शिवकालीन युद्ध कला प्रशिक्षक अश्विन कडलासकर व प्रतोष आळंद यांनी युवतींना प्रशिक्षण दिले. हे प्रशिक्षण ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष शिवराम भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. सदर प्रशिक्षण मोफतपणे युवतींना यावेळी देण्यात आले. ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनवतीने आजपर्यंत संपूर्णपणे मोफत ३000वर युवतींना उपलब्ध साधनातून स्वसंरक्षण कसे करावे, याचे प्रशिक्षण देत आले आहे. वर्ग आठवी. नववी. दहावी. च्या १२0 विद्यार्थीनी युवती यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. ठोकळ प्रशालाचे मुख्याध्यापक श्री गाजरे व शिक्षिका पूनम चव्हाण यांच्या सहकार्यातून हे प्रशिक्षण शिबिर पार पडले.

## शहरातील ११ वर्षाखालील मुलींचा फुटबॉल महोत्सव

### फिफाच्या उपक्रमाचे वालचंद मैदानावर आयोजन

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जागतिक फुटबॉल संघटना फिफा पुरस्कृत महिला फुटबॉल विकास योजनेअंतर्गत अकरा वर्षाखालील मुलींकरिता फुटबॉल महोत्सव आयोजित केला होता.

जागतिक फुटबॉल संघटना, अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशन, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन व सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या वतीने व हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स व वालचंद कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स यांच्या सहकार्याने वालचंद शिक्षण समूहाच्या क्रीडा संकुलात हा महोत्सव पार पडला..



या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, सोलापूरचा व्यावसायिक फुटबॉल खेळाडू किरण पांढरे व राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू गौरव नागटिळक, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉलेज कॉलेजचे प्राचार्य डॉ सत्यजित शहा, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स प्राचार्य डॉ संतोष कोटी आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थित क्रीडा शिक्षक, वैद्यकीय अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. या फुटबॉल महोत्सवामध्ये शहरातील विविध शाळेमधून १२0 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता त्यांना फुटबॉलचे प्राथमिक प्रशिक्षण देण्यात आले. महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींना फुटबॉल गणवेश व खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ किरण चौगुले यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राहुल हजारे यांनी केले.

## उमाबाई श्राविका विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन विविध पारंपरिक खेळाने साजरा

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व उमाबाई श्राविका विद्यालय यांच्या वतीने मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडाधिकारी गणेश पवार, क्रीडाधिकारी नदीम शेख, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ दिप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रशालेच्या संगीत शिक्षिका पल्लवी खांडवे व सोनाली उंडे यांनी स्वागत गीत गाऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद व खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकेमध्ये अश्विनी पंडित यांनी केले. शासनाच्या परिपत्रकानुसार श्राविका विद्यालययात १४ वर्षाखालील गटांमध्ये लंगडी, लगोरी, लिंबू चमचा, दोरीवरच्या उड्या इत्यादी अंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरवण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव बारडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अनुप कस्तुरे यांनी मानले. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी मेजर ध्यानचंद यांचे रेखाटलेले चित्र विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सुकुमार वारे, क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे, रोहन घाडगे, अजित पाटील, सोमनाथ यांनी परिश्रम घेतले.

## सोलापुरात रविवारी जेबीजी सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धा

**सातारा, दि. ३० ऑगस्ट-**

सातारा रनर्स फौंडेशनच्यावतीने दरवर्षी आयोजित केली जाणारी सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धा रविवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी होणार आहे. स्पर्धेचे हे १३ वे वर्ष असून स्पर्धेचा प्रारंभ रविवारी सकाळी ६.३0 वाजता पोलिस परेड ग्राऊंड येथून होणार असून, सर्व स्पर्धकांनी पहाटे ५.३0 वाजेपर्यंत पोलिस परेड ग्राउंडवर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

या स्पर्धेचा शुभारंभ राज्य उत्पादन शुल्क मंत्री व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले व स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असलेले जय बालाजी ग्रुपचे संचालक गौरव जजोदिया यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसेच जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलिस अधिक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले, जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ युवराज करपे, सातारा वन



विभागाच्या उपवनसंरक्षक अदिती भारद्वाज, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता रोकडे, सातारा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अभिजीत बापट, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती असणार आहे अशी माहिती संयोजन समितीच्या अध्यक्षा डॉ.आदिती चंद्रशेखर घोरपडे, उपाध्यक्ष आर्किटेक्ट उपेंद्र पंडित व सेक्रेटरी विशाल ढाणे यांनी संयुक्तरित्या दिली.

# सहारा सोलापूर, शिवरत्न अकलूजची विजयी सलामी

## ● बापूसाहेब झपके स्मृती राज्य निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० ऑगस्ट-**

देशभक्त, कै. गुरुवर्य चं. वि. तथा बापूसाहेब झपके ४३वा स्मृतीसमारोह पुरूषांच्या निमंत्रित राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत सोलापुरच्या सहारा संघाने डू इट कोल्हापूरवर ३५-१९ असा २८ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. दुसऱ्या एका सामन्यात अकलूजच्या शिवरत्न क्लबने बी.टी.एस मिरजवर ४०-२२ असा दणदणीत विजय मिळविला.

सांगोला विद्यामंदीरच्या मैदानावर शुक्रवारी सुरु झालेल्या या स्पर्धेतील अन्य सामने एकतर्फी झाले. ते निकाल याप्रमाणे : चॅलेंजर्स गुणकी वि. वि. द एअर बॉलर्स सोलापूर ४६-0, जयहिंद कडा बीड वि.वि. हुपर्स सोलापूर ३६-१६, नेक्सास नांदेड वि. वि. सांगोला तालुका ३५-१९, प्रोनेट क्लब मुंबई वि. वि. विजयपुरा ५९-४५, माणियल मुंबई वि. वि. जी.एस.एस.सी खारगर ५४-२५.

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, थोर स्वातंत्र्यसेनानी, देशभक्त, कै. गुरुवर्य चं. वि. तथा बापूसाहेब झपके ४३वा स्मृतीसमारोह पुरूषांच्या निमंत्रित राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचा उद्घाटन समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपविभागीय पोलिस अधिकारी मंगळवेढा विक्रांत गायकवाड, पुरोगामी युवक संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.बाबासाहेब देशमुख, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, पंढरपूर तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, सांगोला तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे बास्केटबॉल ॲच्युअर असो.सचिव एम.शफी, वनाधिकारी इंगोले मॅडम, सां.ता.उच्च शिक्षण मंडळ अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके आदी उपस्थित होते. सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. त्यानंतर उद्घाटन समारंभामध्ये सुरुवातीला हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंदसिंग यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण व सुनील भोरे यांनी केले. प्राचार्य अमोल गायकवाड यांनी आभार मानले. मोहिते-पाटील म्हणाले, जिल्ह्यात सांगोला अकलूज व सोलापूर या तीन ठिकाणी बास्केटबॉलचे ग्राउंड आहेत. शाळेत असणाऱ्या क्रीडा शिक्षकांच्या पाठीमागे संस्थेने उभा राहिले तर निश्चितपणाने मैदानावरून असंख्य खेळाडू घडतील. स्पोर्ट्सच्या माध्यमातून विविध पदांवर विराजमान खेळाडूंना सरकारच्या महत्त्वकांक्षी योजनांचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना झाला पाहिजे.




**पुढील वर्षी इनडोअर स्टेडियममध्ये सामने :** प्रास्ताविकातून संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी गेली ४२ वर्ष आयोजन, प्रत्येक वर्षी खेळाडूंचा वाढणारा उत्साह, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजयजी बनसोडे यांनी दिलेल्या अनुदानातून बास्केटबॉलचे मैदान पुढील वर्षी बंदिस्त होणार असे सांगत पुढच्या वर्षीचे सामने इनडोअर स्टेडियम मध्ये होतील असा विश्वास व्यक्त करत उपस्थितांचे स्वागत केले.

### स्पर्धेच्या संयोजनात उत्साह

जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार म्हणाले कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती बास्केटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागात असणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहेत या स्पर्धेसाठी महाराष्ट्र कर्नाटक अशा विविध राज्यातून स्पर्धक खेळण्यासाठी येतात ही बाब निश्चितपणे स्पर्धेच्या संयोजनात उत्साह आणणारी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर बास्केटबॉल खेळाची कामगिरी वाढवायची असेल तर शाळेबरोबर विविध संघटनांनी ही चांगले प्रयत्न करावे.

### शालेय जीवनापासूनच मैदानाशी मैत्री करा : खासदार धैर्यशील मोहिते पाटील

भारतीय संस्कृतीत खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे खेळाच्या माध्यमातून जगणं सुंदर होत आहे. गेली ४२ वर्ष समृद्ध परंपरा जपत राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून या दुष्काळी मातीतल्या असंख्य खेळाडूंना त्याचबरोबर राज्यातून परराज्यातून आलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थी मित्रांनो जेवढं अभ्यासाला महत्त्व तेवढेच खेळालाही महत्त्व द्या. शालेय जीवनात मैदानावर असणाऱ्या विविध प्रकारच्या खेळाच्या संधी वाया घालवु नका. जो युवक आपल्या शालेय जीवनापासूनच मैदानाशी मैत्री करतो तो जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर कधीही हताश होत नाही निराश होत नाही म्हणूनच शालेय जीवनापासूनच मैदानाशी मैत्री करा असे प्रतिपादन माढा लोकसभेचे खासदार मोहिते पाटील यांनी केले.

### ग्रामीण भागात खेळाडू निर्माण होत आहेत


यावेळी बोलताना उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड म्हणाले कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृती दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या बास्केटबॉल सामन्यात ग्रामीण भागातील विविध खेळाडू निर्माण होत आहे.या सामन्यांची ही समृद्ध परंपरा ४२वर्षे प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी अतिशय समर्थपणे पेलेली आहे. महाराष्ट्रातील असंख्य स्पर्धक या निमित्ताने या स्पर्धेत भाग घेतात स्पर्धकांसाठी विनंती की सर्व नियमांचे पालन करत आपण या स्पर्धा यशस्वीपणे पार पाडाव्यात.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### ह. दे. प्रशालेत जागतिक संस्कृत दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**

हरिभाई देवकरण प्रशालेतील मुळे सभागृहात जागतिक संस्कृत दिन शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली उत्साहात संपन्न झाला. प्रथम प्रमुख पाहुणे ओंकार दाते, प्र. मुख्याध्यापिका दीपा फाटक, पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, पर्यवेक्षक औंदुबर सर्वगोड, पर्यवेक्षक लक्ष्मणा कमळे, संस्कृत विभाग प्रमुख निखिल बडवे यांच्या हस्ते भारतमाता पूजन करण्यात आले. पाहणुण्यांचा परिचय साक्षी म्हेत्रे हिने केला. प्रास्ताविक निखिल बडवे यांनी केले. विद्यार्थ्यांनी संस्कृतमधून गीत, संवाद, भाषण, श्लोक, भगवद्गीता अध्याय कार्यक्रम सादर केले. ओंकार दाते यांनी संस्कृत भाषेचा उपयोग नासामध्ये करतात. अंतरीक्ष यानासाठी संस्कृत भाषेचा उपयोग करतात, असे सांगितले. दीपा फाटक यांनी संस्कृत भाषेमुळे उच्चार स्पष्ट होतात व वाणी सुधारते हे सांगितले. सूत्रसंचालन समृद्धी व श्रावणी तर आभार पद्मावती हिने मानले.



### सोजर प्रशालेतील युवा मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेला चांगला प्रतिसाद

**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने आज शुक्रवारी नवनीत एज्युकेशन लिमीटेड आयोजित 'युवा मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धा उत्साहाने संपन्न झाली. अ गट- बालवर्ग (केजी) ते तिसरी आणि ब गट- इयत्ता ४थी ते ६ वी अशा दोन गटात ही स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये अ गटातून ११८ तर ब गटातून सुमारे १०५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रिटा नेटके तसेच चित्रकला शिक्षिका आस्मा मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी अथक परिश्रम घेतले.



### अकलूजमधील 'शिवरत्न'च्या बीबीए कॉलेजला नॅक पीअर टीमची भेट

**अकलूज, दि. ३० ऑगस्ट-**

येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या बीबीए अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदेची (नॅक) तज्ञ समीतीने भेट देऊन महाविद्यालयातील विविध पैलूंची तपासणी केली. स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (दिल्ली विद्यापीठ) चे कुलगुरू डॉ. अजयकुमार सिंग, चंडीगड विद्यापिठाचे संचालक डॉ. निलेश अरोरा व तिरपुत्तूर (तमिळनाडू) येथील स्कॅर्ड हार्ट या अटॉनॉमस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारिया टोनी राज यांची बेंगळूरच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद या संस्थेने नियुक्ती केलेल्या त्रिसदस्यीय तज्ञ समीतीने महाविद्यालयाला भेट दिली. संचालक खा. धैर्यशील मोहिते-पाटील, अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील, सचिव धर्मराज दगडे यांच्याबरोबर समितीची बैठक झाली. यावेळी प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार, नॅक समन्वयक प्रा. भरत साठे, प्रा. डॉ. विश्वनाथ आवड, शहजादी काही, अरूण एकतपुरे, प्रशासनाधिकारी आश्रब शेख यांनी सहकार्य केले.



### बस-दुचाकी अपघातात एकजण गंभीर जखमी

**वैराग, दि. ३० ऑगस्ट -**

एसटी बस व दुचाकीच्या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. ही घटना गुरुवारी दुपारी वैराग-धाराशिव रोडवरील रातंजन (ता. बार्शी) येथील फॉरेस्ट जवळ घडली आहे. जखमी सोमनाथ नागटिळक (वय ४५,रा.रातंजन) यांना वैरागच्या खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे. ते शेतातून कच्च्या रस्त्याने गावाकडे येत होते. वैराग -धाराशिव रस्त्यावर धाराशिव कडून वैरागला येणाऱ्या बस (एमएच २० बीएल १७५२) व दुचाकीची समोरा समोर धडक झाली. बस चालक नितीन रमेश भिसे यांनी प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या खाली घेतली. यामुळे मोठा अनर्थ टळला. बसमधील सर्व प्रवाशी सुखरूप आहेत. घटनेचा पुढील तपास सुरू आहे.



### जीवनात क्रीडांलाही महत्त्व द्या : भुबलन

**विजयपूर, दि. ३० ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा स्पर्धांना महत्त्व द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी टी. भुबलन यांनी केले. अल्पसंख्याक संचालनालय, जिल्हा अल्पसंख्याक कल्याण विभागांतर्गत अरकेरी येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम निवासी विद्यालयात आयोजित आंतरशालेय व महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी आनंद, आयआरबी कमांडंट नंदकुमार, अल्पसंख्याक कल्याण विभागाचे जिल्हा अधिकारी प्रशांत पुजारी, मुख्याध्यापिका रेखा बर्की उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; एकावर गुन्हा

**एकच खळबळ; मित्र-मैत्रिणींसह शाळेतून घेऊन गेले; पालकांच्या सतर्कतेमुळे प्रकार उघडकीस**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३० ऑगस्ट-**

अल्पवयीन मुलीस शाळेतून बाहेर बोलावून तिच्या मैत्रिणींना तसेच इतर अल्पवयीन मुलांना घेऊन माझे तुझ्यावर प्रेम आहे, म्हणत सोलापूरला नेऊन तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एका २४ वर्षीय तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला. अजमेर महंमद शेख असे त्याचे नाव आहे.

एका शाळेतील विद्यार्थिनीच्या अजमेर शेख मागे लागला होता. तो सतत तुझ्यावर माझे प्रेम आहे. माझ्याशी तू लग्न कर असं म्हणत होता. मात्र ती मुलगी त्याला नकार देत होती. २९ ऑगस्ट रोजी अजमेर हा त्या शाळेत गाडी घेऊन गेला व तिला शाळेतून बोलावून घेतले. आपण बाहेर फिरून येऊ असे म्हणत गाडीत बसायला सांगितले. तिने एकटीने जायला नकार दिला व मैत्रिणीसोबत यायला तयार झाली. त्यावेळी तिच्या अल्पवयीन मैत्रिणीने तिच्या गल्लीतील अल्पवयीन दोन मुलांना सोबत घेतले. चारजण मिळून तरुणाने आणलेल्या गाडीत बसले. त्यावेळी गाडी सोलापूर येथे नेऊन एका हॉटेलमध्ये चारही अल्पवयीन मुला-मुलींना जेवण खायला घातले. तसेच मॉलमध्ये फिरवले. त्यावेळी तरुणाने मुलीला चॉकलेट, मोबाईल घेऊन




दिला व माझे तुझ्यावर प्रेम आहे वगैरे सांगत होता. मी तुझ्याशी लग्न करीन असे म्हणत होता. तू जर नकार दिला, तर तुझे बाहेर अफेअर आहे असे सांगून तुझी बदनामी करीन, असे तो तरुण अल्पवयीन मुलीला बोलायचा. त्यानंतर सोलापूरहून येताना सावळेश्वर टोल नाक्याजवळील पेट्रोल पंपाजवळ गाडीतील इतर एक मुलगी व दोन मुलांना तरुणाने गाडीतून खाली उतरायला सांगितले व मला तिच्याशी बोलायचे आहे असे म्हणाला. त्यावेळी तिघे गाडीतून खाली उतरल्यानंतर तरुणाने अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. त्यावेळी अल्पवयीन मुलीने इतर मुलांना आवाज दिला व ते तिघेजण येऊन गाडीत बसले. त्यादरम्यान मुली शाळेत गेल्या नसल्याबाबत पालकांना समजले. पालक शाळेत गेले व त्या ठिकाणी मुले नाहीत म्हणून सर्वत्र शोधाशोध सुरू केली. दरम्यान पाच वाजण्याच्या सुमारास तरुण चारचाकी गाडी घेऊन शाळेजवळ मुलांना सोडायला आला असता काही पालकांनी त्याला पकडले व पोलिसांशी संपर्क करत त्याला ताब्यात दिले. अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अजमेर शेख याच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर करीत आहेत.

## श्रावणमास प्रवचनमाला - २६

### संत एकनाथ महाराजांचे चरित्र महान, अद्भुत आहे

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**

निर्लोभी असणारे नाथ महाराज, मनी विषमता नसलेले नाथ महाराज, कृपेचा सागर असणारे नाथ महाराज, नाथ वाड्यात राहून ज्या परमात्म्याला धन्यता वाटते; सुखाची प्राप्ती होते असे भगवंताला प्रिय असणाऱ्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांचे चरित्र महत अद्भुत आहे, असे डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज बोधले प्रवचनमालेच्या २५ व्या सत्रात सांगत होते.

**तुम्ही करोनिया सेवा।**
**वाढविले मज नावा।।**

नाथबाबा आपल्या अभंगात म्हणतात, देवा, माझ्या नावाला तुम्ही वाढवलं, माझं नाव मोठं केलं. तसेच माझ्यावर तुम्ही केलेल्या कृपेतून मी कधीही उतराई करु शकत नाही. नाथ महाराज जेव्हा पूजेला बसत असत तेव्हा, हा श्रीखंड्या चंदनाचा गंध उगाळून हातावर घेऊन तो नाथांच्या हातावर देत असे. नाथबाबा हा गंध बोटाने भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीच्या कपाळाला लावीत असत. म्हणजे, येथे श्रीखंड्या हा साक्षात भगवान परमात्मा असूनही नाथ मूर्तीला गंध लावायचे. असे आश्चर्य नाथांच्या घरी दररोज घडत होते. म्हणून, नाथ महाराज त्यांच्या कूट अभंगात म्हणतात,

**नाथांच्या घरची उलटी खूण।**

भगवान परमात्मा अर्जुनाला उपदेश करताना सांगतात, अर्जुना, मला संताच्या संगतीनेच खरे सुख मिळते. मी जरी विदेही असलो, तरी मला संत प्रिय आहेत. म्हणून, मला त्यांच्या सहवासात राहणेच आवडते. त्यामुळे, मी देहात आलो आहे. वैष्णवांच्या संगतीमध्ये सुख मला पाहायला आवडते. खरे सुख हे माझ्या भक्ताकडेच आहे. म्हणून, मला भक्त आवडतात. पुढे डॉ. जयवंत महाराज निरुपण करताना सांगतात, १८ पुराणांमध्ये श्रीमदभागवत् हा ग्रंथ श्रेष्ठ आहे. यातील एकादश स्कंद (११वा स्कंद) हा 'उद्धवगीता' म्हणून ओळखला जातो. अतिशय महत्त्वपूर्ण असणाऱ्या या स्कंदात भगवान श्रीकृष्णाने सांगितलेले तत्त्वज्ञान आहे. १० व्या स्कंदामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या लीलांचे वर्णन आहे. हा श्रीमद्भागवताचा ११ वा स्कंद म्हणजेच संत एकनाथ महाराजांचे 'एकनाथी भागवत' म्हणून ओळखले जाते. या स्कंदात ३१ अध्याय असून नाथ महाराज म्हणतात, एकादश म्हणजे एक एक, तेथ दुजे नाही अंक।।

नाथबाबांच्या घरी एक ब्राह्मण येऊन नाथांना म्हणाला, तुम्ही आता जे दोन अध्याय लिहिले आहेत. ते घेऊन जातो. कारण, मला आता काशी यात्रा करायची आहे. मला ते तीर्थयात्रेला वाचायला मिळतील. काशीमध्ये तो ब्राह्मण वाचत असताना तेथील विद्वान ब्राह्मणांनी विचारले, याचे नेमकेपणाने वाचन कसे करावे? तेव्हा, तो ब्राह्मण सांगतो, पैठणमधील संत एकनाथ महाराजांनी हे मराठीत लिहिले आहे. तेव्हा, पैठणमध्ये येऊन काशीमधील पंडितांनी दिलेले पत्र नाथांकडे देतात. पत्र वाचताच स्मितहास्य करीत गिरीजाबाईंना सांगतात, आपल्याला आता काशी विश्वेश्वराने बोलावले आहे.

## मालवणमधील प्रकार निंदनीय, संतापजनक

**युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांचा संताप**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० ऑगस्ट-**

मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला ही घटना दुर्दैवी असून राज्य सरकारला या घटनेचा कल्पना असतानाही योग्य वेळी दखल घेतली नसल्याने ही दुर्दैवी घटना घडली आहे. महाविकास आघाडीचे नेते जयंत पाटील व आदित्य ठाकरे त्या ठिकाणी गेले असता राणे पितापुत्राने जो गोंधळ घातला तो निंदनीय, संतापजनक आहे, असा संताप युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.



पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ व संबंधित ठेकेदाराची चौकशी करावी याबाबत नायब तहसीलदार पवारांना माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या वतीने निवेदन देण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या पुतळा बसविण्याचा कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला असून याचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी जि. प. चे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी केली. लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनीही संताप व्यक्त केला. याप्रसंगी युवा नेता मल्लिकार्जुन पाटील, बाबासाहेब पाटील, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष अरूण जाधव, सद्दाम शेरीकर, मुबारक कोरबू, इरण्णा धसाडे, विकास मोरे, श्रीशैल माळी, हर्षदीप गायकवाड, शिवराज पोमाजी, गजानंद जकीकोरे, बालाजी शापवाले, राहुल मोरे, निशांत कवडे, अयाज चंदनवाले, महादेव करमल, धनराज येळमेली, जब्बार बागवान, महादेव चुंगी, हमीद गिलकी, नितीश राठोड, नागनाथ कापसे आदीसह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा : सपोनि परजने

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३० ऑगस्ट-**

नातेपुते पोलीस स्टेशनमध्ये गणेश उत्सवाच्या अनुषंगाने नातेपुते व परिसरातील गणेशोत्सव मंडळातील पदाधिकारी व सदस्य, पोलीस पाटील, मूर्तिकारांची बैठक झाली.

या बैठकीत गावामध्ये एक गाव, एक गणपती संकल्पना राबवण्यात यावी याबाबत चर्चासत्रसह मार्गदर्शन झाले. तसेच गणेशोत्सव मंडळाने ऑनलाईन अर्ज करून उत्सवासाठी परवानगी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम इतरही सामाजिक उपक्रम मंडळांनी राबवून सामाजिक आपुलकी जपण्याचे सांगण्यात आले व गणेश विसर्जन मिरवणूक डीजेमुक्त काढावी व गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडावी असे आवाहन नातेपुते पोलीस स्टेशनचे सपोनि महारुद्र परजने यांनी केले.

## 'कर्मयोगी'चा बैल पोळासाठी ५० रुपयांचा हप्ता : परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३० ऑगस्ट-**

श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांसाठी बैलपोळा सणानिमित्त ५० रुपयांप्रमाणे हप्ता बँकेत जमा केल्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले.



याप्रसंगी व्हाईस चेअरमन कैलास खुळ, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, उमेश परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, दाजी पाटील, दिलीप गुरव, सीताराम शिंदे, शामराव साळुंखे, राणू पाटील व पदाधिकारी उपस्थित होते.

**एफआरपीपेक्षा ३४९ रुपये जास्तीचा दर**

गत हंगामाची एफआरपी २५०१ रुपये असताना आत्तापर्यंत २८०० रु. अदा केले आहेत. आता पोळा सणासाठी ५० रु. प्रतिटन दिले आहेत. एफआरपीपेक्षा ३४९ रु. जास्तीचे दिले आहेत.

## तुम्ही निर्धास्त रहा... पोलिस तयार आहेत

**पोनि राजेंद्र टाकणे : अक्कलकोटमधील शाळेतील सुरक्षेचा घेतला आढावा, विद्यार्थ्यांशी साधला संवाद**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० ऑगस्ट-**

तुम्हाला काही अडचण असेल तर मदत करण्यासाठी पोलीस दादा व पोलीस दीदी सदैव तत्पर आहेत. तुम्ही निर्धास्त रहा असे आवाहन पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी केले.

बदलापूर येथील घृणास्पद प्रकारानंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे आपल्या कर्मचाऱ्यांसह सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा आढावा घेण्यासाठी मराठा मंदिर श्री शहाजी प्रशाला येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी मुख्याध्यापक एस. एन. शिंदे, पर्यवेक्षक आर. एस. पडवळकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन शिंदे, शरद चव्हाण आदी उपस्थित होते. पारंभी स्वागत व प्रास्तविक वाय. पी. कबाडे यांनी केले. पोनि राजेंद्र टाकणे म्हणाले, विद्यार्थ्यांनी लहान वयात वाहन चालवू नये व आपले लक्ष इतरत्र भटकू देऊ नये. अन्यथा तुमचे संपूर्ण करिअर खराब होऊ शकते व नोकरी लागताना अडचण येऊ शकते. त्यामुळे चांगले वागण्याचा सल्ला दिला. त्यानंतर फक्त विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांना आत्मविश्वास दिला. दिवसभर लीड स्कूल, मराठा मंदिर श्री शहाजी प्रशाला, मराठा मंदिर निर्मलाराजे कन्या प्रशाला आदी शाळांना पोलीस निरीक्षक टाकणे यांनी भेटी देऊन समुपदेशन केले व सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.



प्रत्येक शाळेत एक पोलीस दादा व एक पोलीस दीदी यांचे फोटो लावण्यात येणार आहे. त्याखाली मोबाईल क्रमांक असणार आहे. ते मदत करतील. तसेच ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही नाही. त्यांना पत्र पाठवून सीसीटीव्ही बसविण्याबाबत सांगणार आहे. **- राजेंद्र टाकणे,** पोलीस निरीक्षक, उत्तर पोलिस ठाणे, अक्कलकोट

# पाडुरंग परिवारातील वसंतराव देशमुखांचा भाजपाला रामराम

**पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० ऑगस्ट-**



भाजपचे माजी आ. प्रशांत परिचारक यांचे समर्थक व पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मतदारसंघातील आपल्या समर्थकांच्या घेतलेल्या बैठकीत हा निर्णय झाला.देशमुख यांच्या निर्णायामुळे परिचारक गटासह भाजपला मोठा धक्का बसला आहे. वसंतराव देशमुख यांनी विधानसभा निवडणूकीची तयारी देखील सुरु केली आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची कासेगाव (ता. पंढरपूर) येथे देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक झाली. त्यामध्ये देशमुख यांनी आपण लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. यावेळी माजी उपगनराध्यक्ष नागेश भोसले, दीपक वाडेकर, माजी नगरसेवक सुरेश नेहतराव, मंगळवेढ्याचे मारुती वाकडे आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले की, सहा महिन्यांपासून अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांचा रेटा होता की, राजकीय भूमिका स्पष्ट करा. त्यानुसार आजपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काम सुरु केले आहे. लवकरच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेणार आहे. पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी अनेकजण इच्छुक आहेत. आपणदेखील निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहोत. मात्र आपण अजून पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली नाही. एक-दोन दिवसात रितसर पक्षाकडे उमेदवारीची मागणी करणार आहे. पक्ष यावेळी संधी देईल अशी मला खात्री आहे. जरी पक्षाने अन्य उमेदवार दिला तरी त्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी मनापासून आपण प्रयत्न करणार असल्याचेही देशमुख यांनी सांगितले. वसंतराव देशमुख आणि नागेश भोसले यांच्या एकत्रित येऊन भाजपला सोडचिठ्ठी दिल्यानंतर परिचारक गटालाही हा मोठा हादरा असून आता परिचारक काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**परिचारकांनाही तुतारी हाती घेण्याचा आग्रह**

प्रशांत परिचारक यांनीही तुतारी हाती घ्यावी, असा त्यांच्या कार्यकर्त्यांचा आग्रह असून परिचारकांकडून अद्यापपर्यंत ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.

## 'पांडुरंग'च्या चेअरमनपदासाठी स्टंटबाजी : प्रशांत देशमुख



पंचायत समितीचे माजी उपसभापती आणि महाराष्ट्र द्राक्ष बागायदार संघाचे माजी अध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी पांडुरंग कारखान्याचे चेअरमनपद पदरात पाडून घेण्यासाठी वसंतरावांचा चाललेला हा खटाटोप आहे, असा आरोप करीत विधानसभा निवडणुकीला ते उभारत नसतात आणि जरी उभारले तरी पांडुरंग परिवाराला फारसा फरक पडणार नाही. कारण पंढरपूरची जनता सुज्ञ आहे. वसंतराव देशमुखांचे कारनामे त्यांना माहिती आहेत, असेही प्रशांत देशमुख यांनी सांगितले.

आजपर्यंत पांडुरंग परिवाराने या वसंतराव देशमुखांसाठी काय केले नाही, असा सवाल उपस्थित करुन २००९ साली तर यांनी हातवर करुन विरोध करीत परिचारक घराण्याला सोडून शरद पवारांनी कोणालाही उमेदवारी द्यावी आम्ही त्यांच्यामागे जाऊ अशी भूमिका घेतली होती. त्यावेळी परिचारकांना थांबवून विजयसिंह मोहिते-पाटलांना उमेदवारी देण्याचे पडद्यामागचे काम वसंतराव देशमुख यांचेच आहे. पण विजयसिंह मोहिते-पाटील यांना पंढरपूर तालुक्यात आणून त्यांच्या प्रचारापासून मात्र हेच वसंतराव देशमुख अलिप्त राहिले. विजयसिंहांना पंढरपूरला आणण्यामध्ये यांचाच हात आणि निवडणुकीमध्ये पाडण्यामागेदेखील यांचाच हात. त्या निवडणुकीनंतर वसंतराव देशमुख हे पुन्हा परिचारकांकडे जाऊन माफी मागितली. त्यानंतर पुन्हा परिचारकांकडून पद मिळविले. या नंतर २०१४ मध्ये देखील प्रशांत परिचारक निवडणुकीला उभे राहण्यासाठी सज्ज झाले, तेव्हाही वसंतराव देशमुखांनी त्यांना विरोध केला होता. मात्र पुन्हा निवडणुकीनंतर ते परिचारकांकडे पुन्हा पद पदरात पाडून घेतल्याची आठवण प्रशांत देशमुख यांनी सांगितली. आमदारकी वगळता सगळी पदे वसंतरावांनी उपभोगल्याची टीकाही त्यांनी केली.

**परिचारक अपक्ष निवडणूक लढविणार : प्रशांत देशमुख**

परिचारक पांडुरंग परिवाराच्या माध्यमातून पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात गेल्या महिनाभरापासून मेळावे घेऊन पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधत आहेत. मध्यंतरी कोणीतरी वावडी सोडली की परिचारक हाती तुतारी घेणार, अशी मात्र हे धादांत खोटे आहे. परिचारक यंदाची विधानसभा निवडणूक लढविण्यावर ठाम असून अपक्ष निवडणूक लढविण्याचा आग्रह पांडुरंग परिवारातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिचारकप्रेमी करत असल्याचे प्रशांत देशमुख यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यात तब्बल पाऊण लाख मतदार वाढले

## ● विधानसभेच्या अंतिम मतदार यादीत ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**



अंतिम मतदार यादी दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अंतिम मतदार यादीत एकूण ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार आहेत. ६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या दरम्यान एकूण ७५ हजार ८२४ मतदारांची वाढ झालेली आहे. अंतिम मतदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करावी, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

दि. ६ ऑगस्ट २०२४ च्या प्रारूप मतदार यादीमध्ये एकुण ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून, यामध्ये पुरूष १९ लाख ८ हजार १४६, महिला १७ लाख ८३ हजार ९६६ व इतर-२९७ मतदारांचा समावेश होता. दि. ३० ऑगस्ट २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण ३७ लाख ६३ हजार ७८९ इतकी मतदार संख्या असून यामध्ये पुरूष-१९ लाख ३५ हजार ९७९, महिला- १८ लाख २७ हजार ५०८ व इतर ३०२ मतदारांचा समावेश आहे.

**▸ २४४ करमाळा-** एकुण ३ लाख २४ हजार ३५, पुरुष १ लाख ६९ हजार ३९० महिला १ लाख ५४ हजार ६३३ अन्य १२ तर ४७३७ मतदारांची वाढ झाली. तसेच ३४७ मतदान केंद्र आहेत.

**▸ २४५ माढा-** एकुण ३ लाख ४४ हजार ५४७, पुरुष एक लाख ८० हजार ५४७, महिला एक लाख ६३ हजार ९९७ अन्य ३ तर मतदार संख्येत झालेली वाढ ५ हजार ३३९ तसेच मतदान केंद्र संख्या ३५५ आहे.

**▸ २४६ बार्शी -** एकुण ३ लाख २७ हजार ६५७, पुरुष एक लाख ६९ हजार १००, महिला एक लाख ५८ हजार ५१६ अन्य ४१ तर झालेली वाढ ४७१९ तसेच मतदान केंद्राची संख्या ३३३ इतकी आहे.

- **पुरुष मतदार १९ लाख ३५ हजार ९७९**
- **महिला १८ लाख २७ हजार ५०८ व इतर ३०२**
- **महिनाभरात ७५ हजार ८२४ वाढले मतदार**
- **नावाची खात्री करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**


**▸ २४७ मोहोळ (अ.जा)** ३ लाख २५ हजार ९९९, इतकी मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या ३३६ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ७० हजार ८४० महिला एक लाख ५५ हजार १५१ अन्य आठ तर मतदारांची झालेली वाढ ४७६२.

**▸ २४८ सोलापूर शहर उत्तर -** ३ लाख २२ हजार ६६८ इतके एकूण मतदार आहेत तर केंद्रांची संख्या २८९ इतकी आहे. पुरुष मतदार १६०१९८, महिला १लाख ६२ हजार ४२५ तर अन्य ४५. वाढ झालेल्या मतदारांची संख्या ८१९९.

**▸ २४९ सोलापूर शहर मध्य-** ३ लाख ३९ हजार ६०८ एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या ३०४ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ६७ हजार ६६२, महिला एक लाख ७१ हजार ८९४ अन्य ५२ तर वाढ झालेल्या मतदारांची संख्या ९९४७.

**▸ २५० अक्कलकोट -** ३ लाख ७४ हजार ५३६ एकूण मतदार असून मतदान केंद्राची संख्या ३९० इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ९२ हजार ८१९, महिला एक लाख ८१ हजार ६७६ अन्य ४१. मतदार संख्येत झालेली वाढ १०१७१.

**▸ २५१ सोलापूर दक्षिण -** ३ लाख ७२ हजार ५५३ एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या ३६२ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ९१ हजार ६१०, महिला मतदार एक लाख ८० हजार ९०५ अन्य ३८ तर मतदार संख्येत झालेली वाढ १०५६६.




**▸ २५२ पंढरपूर-** ३ लाख ६५ हजार ७२५ एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या ३५७ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ८७ हजार ८८९, महिला एक लाख ७७ हजार ८१० अन्य २६ तर मतदार संख्येत झालेली वाढ ५८७४.

**▸ २५३ सांगोला-** ३ लाख २२ हजार २४० एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या ३०५ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ६७ हजार ७७७ महिला एक लाख ५४ हजार ४५८ अन्य ५ तर मतदार संख्येत झालेली वाढ ६६१९.

**▸ २५४ माळशीरस (अ.जा) य-** ३ लाख ४४ हजार २२१ एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या ३४५ इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख ७८ हजार १४७, महिला एक लाख ६६ हजार ४३ अन्य ३१ तर मतदार संख्येत झालेली वाढ ४८९१. जिल्ह्यातील एकूण ११ विधानसभा मतदारसंघात ३७२३ मतदान केंद्र असून एकूण ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार संख्या आहे. ६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान ७५ हजार ८२४ इतक्या मतदाराची नोंदणी झालेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये एकूण ३६१७ मतदार केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या ३७२३ झालेली आहे. एकुण ३७२३ मतदान केंद्रापैकी शहरी ११७७ व ग्रामीण भागामध्ये २५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे. तरी नागरिकांनी आपली नावे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबतची खात्री करावी. तसेच ज्या नागरिकांची अजूनही मतदार यादीमध्ये नावे नसतील त्यांनी नोंदणी करावे असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



# महाराष्ट्रातील धनगर समाजाने आरक्षणाचा भंडारा उधळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

संपूर्ण महाराष्ट्रातील धनगर बांधवांच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे राज्यव्यापी आंदोलन होणार असल्याचे निवेदन जिल्ह्यातील धनगर समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिले. चेतन नरोटे, शिवाजी बंडगर, माऊली भाऊ हळणवर, प्रा. सुभाष मस्के, अमोल बापु कारंडे, अर्जुन सलगर, सुनील बडंगर आदी उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात धनगर आरक्षणाची अंमलबजावणी करा या एकाच मागणीचा उल्लेख करण्यात आला आहे. बहुजनांचे आराध्य दैवत मल्हारी मार्तंड खंडेराया जेजुरी येथे भंडारा उधळून पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलाला साकडं घालण्यासाठी धनगर बांधव मोठ्या संख्येने पंढरपूरला येणार आहेत. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये शिवतीर्थावरती सकल धनगर समाजाच्या वतीने प्राणांतिक उपोषणाची सुरुवात केली जाणार आहे. गेल्या ७० वर्षापासून धनगर समाजाला घटनेने दिलेलं एसटीच आरक्षण नाही; पंढरपूर ते बारामती यात्रा झाल्यानंतर बारामतीमध्ये धनगर बांधवांचे उपोषण सोडताना राज्याचे तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व शिवसेनेचे सुभाष देसाई यांनी लिखित आश्वासन दिले होते. महायुतीच सरकार आल्यावर पहिल्याच कॅबिनेटमध्ये आरक्षण देतो परंतु यावरती कुठलीही कारवाई झालेली नाही. या अगोदरही अनेक नेत्यांनी आश्वासन दिली परंतु ती पाळली गेली नाहीत.

# मिरजेतील कुख्यात गुंडास दोन जीवंत काडतूस व पिस्तुलासह पकडले

**विजयपूर रोडवरील तेरामैल येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिरजेतील कुख्यात गुंडास दोन जिवंत काडतुस व पिस्तुलासह पकडले. ही कारवाई विजयपूर रोडवरील तेरा मैल येथे करण्यात आली.

राहुल सतीश माने (वय ३१, रा. वसंत हाउसिंग सोसायटी, माजी सैनिक वसाहत, ता. मिरज, जि. सांगली) असे अटक करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे. पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी आगामी विधानसभा निवडणुकाच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेकडील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची बैठक घेवून त्यांना मालाविषयी व शरीरा विषयी गुन्हे करणाऱ्या आरोपीतांवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करून गुन्हे नियंत्रणात आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी-कर्मचारी हे आरोपींतांचा शोध घेत असताना पोलिस हवालदार विजयकुमार भरले यांना गोपनीय बातमीदारा मार्फत सराईत गुन्हेगार राहुल माने (रा. मिरज, जि. सांगली) हा अंगात गजगा- निळया रंगाचा हाफ टि शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घालून सोलापूर ते विजयपुर या महामार्गावर असलेल्या तेरामैल येथील ब्रिज खाली एक देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत कडतुस सोबत बाळगून उभा आहे, अशी माहिती मिळाली.



### राहुल माने मिरजेतील कुख्यात गुंड...

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेला आरोपी राहुल माने हा मिरजेतील कुख्यात गुंड आहे. त्याचेवर सांगली जिल्हयात मिरज शहर, महात्मा गांधी, एमआयडीसी, चिंचणीवांगी, भिलवडी या पोलीस ठाणे मध्ये दरोडा, एनडीपीएस ॲक्ट, आर्म ॲक्ट, चोरी, घरफोडी या सारखे तसेच कर्नाटकातील बेंगलोर येथील नारायणपुरा पोलिस ठाणे येथे आर्म ॲक्टचा गुन्हा दाखल असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

ही माहिती भरले यांनी वरिष्ठांना दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने सोलापुर ते विजापुर हायवे वर असलेल्या तेरा मैल ब्रीज जवळ असणा-या सर्व्हीस रोड वर बातमीदाराने दिलेल्या वर्णनाप्रमाणे दिसणाऱ्या व्यक्तीस गराडा घालून जागीच पकडले. पकडलेल्या व्यक्तीस त्याचे नाव, गाव, पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल माने असे असल्याचे सांगितले. त्याची तपासणी केली असता त्याच्या कंबरेला मागील बाजूस पॅन्टीत खोचलेले एक देशी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह मिळून आले. त्याचे खिसे तपासले असता खिशात पिस्टलची २ जिवंत काडतुसे मिळुन आली. या आरोपी विरूध्द मंद्रुप पोलीस ठाणेत भारतीय हत्यार अधिनियम १९५९ चे कलम ३, व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मंद्रुप पोलीस ठाणे करीत आहे.

ही कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक सुरज निंबाळकर, राजेश गायकवाड, ख्वाजा मुजावर, हवालदार परशुराम शिंदे, सलीम बागवान, विजयकुमार भरले, शिपाई घोरपडे, समर्थ गाजरे, अशोक हलसंगी यांनी केली.

# ‘लोकमंगल’मध्ये रविंद्र कांबळे यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात जैविक किटकनाशके संशोधन व कृषी जैवतंत्रज्ञानातील संधी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान ऑनलॉईन पद्धतीने आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानास प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रविंद्र कांबळे (संशोधक, बडोदा ॲग्रोकेमिकल लिमिटेड गुजरात) हे लाभले होते.

यावेळी कांबळे यांनी विद्यार्थ्यांना किटकनाशके व त्यांचे विविध प्रकार व त्यांचा कृषी क्षेत्रात वापर कशा प्रकारे केला जातो; याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामुख्याने जैविक किटकनाशके, त्यांचे विविध प्रकार, जैविक किटकनाशकांच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणारे विविध सुक्ष्मजीवाणू व त्यांची निवड व त्यांचा वापर करून जैविककिटकनाशके उत्पादन प्रक्रिया, सुक्ष्मजीवाणूंची कार्यक्षमता वाढवणे, उत्पादित झालेल्या जैविककिटकनाशकांची गुणवत्ता तपासणी, साठवणूक व विक्री या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करुन आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाचे समन्वयन व सुत्रसंचालन प्रा. सागर महाजन यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप आदलिंगे, प्रा. सागर महाजन, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. मंजुश्री डोंगरे, प्रा. सचिन जाधव तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# सोलापूर विद्यापीठ आणि जैनस्को अंतर्गत सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ आणि जैन सीनियर सिटीझन्स ऑर्गनायझेशन सोलापूर, अंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला.

या प्रंसगी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर, प्र कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुल सचिव योगिनी घारे, संचालक डॉ.राजेंद्र वडजे, प्राकृत विषयाच्या प्राध्यापिका श्रेया शहा व दीपा शहा, यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. कुलगुरुंच्या हस्ते करार पत्र सुपुर्त करते वेळी, जैनस्को अध्यक्षा डॉ .सरिता कोठाडिया, उपाध्यक्ष नंदकुमार कंगळे, सचिव अजित शहा- भूमकर व कोषाध्यक्ष अरुणकुमार धुमाळ उपस्थित होते. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जैनस्को व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने काही सामाजिक उपक्रम आयोजित करता येतील. दोन महत्त्वाच्या संस्थांमध्ये हा करार झाल्याने, त्यास एक प्रतिष्ठा व महत्त्व प्राप्त झाल्याचे मत प्राकृत विभाग प्रमुख प्रा.डॉ. महावीर शास्त्री यांनी व्यक्त केले.



**सोलापूर : रंगकर्मी नामदेव वठारे यांच्या स्मृतीनिमित्त गुरू वठारे यांनी नाटक एकांकिकेची १०० पुस्तके हिराचंद नेमचंद वाचनालयाचे ग्रंथपाल मोरे यांच्या सहकार्याने वठारे परिवारातर्फे आयगोळे व पाटील या कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द केली.**



# मार्कंडेयमध्ये लेटेस्ट एमआरआय मशीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

पूर्व भागातील गरीब रुग्णांसाठी वरदान ठरलेल्या श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात अत्याधुनिक एमआरआय मशीन दाखल झाली असून शुक्रवारी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी रुग्णालयाचे चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल, व्हाईस चेअरमन रमेश विडप, डॉ. माणिक गुर्रम, डॉ. लता मिठ्ठकोल, डॉ. सुदीप संभारम, अशोक आडम, मनोहर अन्नलदास, पार्वतय्या श्रीराम, श्रीनिवास कमटम, विनायक कोंड्याल, सुधाकर गुंडेली, माधवी चिटयाल, राजेश येमूल, इरेश्म कोंपेल्ली, आनंद चंदनशिवे, डॉ. भारत मुळे, श्रीधर बोल्ली, पदम शाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, तसेच रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर्स डॉ. बी. आर. धामणगांवकर, डॉ. संपत बलदवा, डॉ. सुहास पुजार, डॉ. संजय देशपांडे, डॉ. रविंद्र गुंडेली, डॉ. वेणुगोपाल संभारम, डॉ. महेश अरकाल, डॉ. आनंदनारायण मालू, डॉ. विजय अंधारे, डॉ. आदित्य पाटील, डॉ. आशिष भुतडा, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, डॉ. श्रीकांत माकम, डॉ. अभिजित वाघचवरे, डॉ. निलकंठ पोतदार, डॉ. श्रीकांत पागे आदी तज्ञ डॉक्टर्स, प्रशासकीय अधिकारी आकेन स्वामी, अशोक इंदापुरे व कर्मचारी स्टाफ यांची उपस्थिती होती. प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी सभासदांनी ठेवलेल्या विश्वासास पात्र राहून गेले २५ वर्षे सेवा करत असून रुग्णांच्या सोयीसाठी अत्याधुनिक एमआरआय ची मशीन आणल्याचं ते म्हणाले. रुग्णालयात अत्याधुनिक उपकरणे दाखल होत असून त्याचा रुग्णांना लाभ मिळत आहे. आता नव्याने दाखल झालेल्या एमआरआय मशीनमुळे रुग्णांची मोठी सोय झाली आहे. यामुळे अन्य ठिकाणी जाण्यासाठीचा वेळ आणि खर्चात बचत होणार आहे.

# आजपासून जल्लोष लोककलेचा

- **दोनशे बाल कलावंतांचा राहणार सहभाग**
- **बालरंगभूमी परिषद सोलापूर शाखेचा उपक्रम**
- **सीनेअभिनेत्री नीलम शिर्के यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबईची घटक संस्था बालरंगभूमी परिषद मुंबई यांच्यावतीने दि. ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथे महाराष्ट्रातील लोककलांवर आधारित जल्लोष लोककलेचा हा बालकलावंतांचा महोत्सव होणार आहे, अशी माहिती बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेच्या अध्यक्षा सीमा श्रीगोंदेकर- यलगुलवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.






या महोत्सवाचे उद्घाटन शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा आणि सिनेअभिनेत्री नीलम शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, महापालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी संजय जावीर, सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर रविवारी १ सप्टेंबर रोजी खासदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे.

यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, प्रिसिजन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ सुहासिनी शहा यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखा करीत आहे. बालरंगभूमी परिषद ही संपूर्ण महाराष्ट्रात बालकांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारी अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद मुंबईची घटक संस्था आहे. ही संस्था मुलांना नाट्य, अभिनय, गीत-गायन, नृत्य, काव्य या व इतर अशा अनेक कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध कार्यशाळा, प्रशिक्षण शिबिर व स्पर्धांचे आयोजन करीत असते. याचाच एक भाग म्हणून बालकलावंतांना महाराष्ट्रातील लोककलावंतांची ओळख व्हावी यासाठी ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात जल्लोष लोककलेचा या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातून २५ संघ आणि ५० बालकलाकार निवडले जाणार आहेत. यासाठी बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा, सोलापूर या भागातून दोनशे बालकलाकारांनी सहभाग नोंदवला आहे. हा महोत्सव केवळ महाराष्ट्रातील लोककला प्रकारातील गीत, नृत्य व वाद्य यावर आधारित असणार आहे. या कार्यक्रमाचा आस्वाद सोलापुरातील नाट्यरसिकांनी घ्यावा, असे आवाहन सीमा यलगुलवार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस अर्चना अडसूळ, श्रध्दा हुलेनवरू, सुभाष माने, सुनंदा शेंडगे, मिलिंद ठोंबरे, सुमित फुलमामडी, सल्लागार पद्माकर कुलकर्णी, किरण फडके आदी मान्यवर उपस्थित होते.

भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल ३रा आठवडा




12.30/3.30/6.30/09.30PM
Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## क्राईम वृत्त...

### अज्ञात चोरट्यांनी शहरातून तीन दुचाकी पळवल्या

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

अज्ञात चोरट्यांनी शहरातून तीन दुचाकी चोरून नेल्याची घटना उघडकीस आल्या आहेत. पहिली घटना ही जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २८ ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते पाच वाजण्याच्या दरम्यान मार्केट यार्ड येथे घडली. आप्पा राजाभाऊ सरवदे (वय ३८, रा. भांडेगाव ता.बार्शी) यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ सीवाय ८९८४ ही मार्केट यार्ड येतील तुळजापूर यांच्या दुकानासमोरून लावली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मस्के हे करीत आहेत. दुसरी घटना ही एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मल्लिकार्जुन नगर येथे १८ ऑगस्ट रोजी घडली आहे. बापूजी मोहन जाधव (वय ३८ ,रा. किसन नगर, अक्कलकोट रोड) यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ डीडब्ल्यू ९२१८ ही मल्लिकार्जुन नगर येथे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत. तिसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मार्केट यार्ड येतील शिवदारे मंगल कार्यालयमधील पार्किंग येथे घडली. शंकर महादेव हासुरे (वय ३८, रा. जळकोट, ता. तुळजापूर) यांनी त्यांची दुचाकी क्रं. एमएच २५ एक्यू १०६८ ही मार्केट यार्ड येतील शिवदारे मंगल कार्यालयमधील पार्किंग येथे पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरू हे करीत आहेत.

### बस चालकाशी वाद घालून कंडक्टरला शिवीगाळ

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

एसटी बस चालकाशी वाद घालून कंडक्टरला शिवीगाळ केल्याप्रकरणी एका प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सोलापूर एसटी स्थानकात घडली. याप्रकरणी एस टी कंडक्टर सैफनसाब मकदुमसाब शेख (वय २५, रा.कुडल हंगरगा ता. आळंद, जि. कलबुर्गी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजकुमार नागप्पा बबलाद (वय ४४, रा. हत्तीकणवस ता.अक्कलकोट) याच्याविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कंडक्टर शेख व बस चालक गौतम लाळवंत हे दोघे बस क्रमांक केए ३२ एफ २४४४ ही घेऊन आळंद ते सोलापूर असे प्रवास करत होते.त्यावेळी राजकुमार हा हत्तीकणबस येथे बस मध्ये चढला. त्यावेळी तो चालक गौतम लाळवंत यांच्याशी वाद घालत असताना त्याला कंडक्टर शेख यांनी शांत केले. परंतु सोलापूर एसटी बस स्थानक येथे पार्किंग मध्ये शेख हे प्रवाशांचे उरलेले पैसे देत असताना राजकुमार बबलाद याने शेख यांना तू नीट खाली उतर मी सोलापूरचा आहे, तुला बघून घेतो असे म्हणून शेख यांना खाली उतरण्यास सांगून शिवीगाळ करत अंगावरील शर्टाच्या खांद्यावरचे बॅच ओढून फाडून खाली पाडले. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून तरुणास लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

तू मला पाहून मुंडी का हलवितो असे विचारल्याने तरूणास शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी रॉडने हातावर, पाठीवर व कमरेवर मारून जखमी केल्याची घटना २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास थोबडे वस्ती येथे घडली. याप्रकरणी आतिश राहुल मस्के (वय २८, रा. थोबडे वस्ती, जुना देगाव नाका) याने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन आदित्य हिवरे (वय १९, रा. साठे पाटील वस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहायक फौजदार चंगरपल्ली हे करीत आहेत.

### टेलिफोन भवनमधील जनरेटरमधून डिझेल चोरले

**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

बाळीवेस येथील टेलिफोन भवन येथून इलेक्ट्रिकल ऑफिसमध्ये असलेले इंजिन रूमच्या उघड्या दरवाजातून अज्ञात चोरट्याने प्रवेश करून रूम मधील जनरेटर डिझेलच्या टाकीतून डिझेल चोरून नेल्याची घटना दि. २३ ते २९ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी समीर राजाराम शिंदे (वय ५०, रा. तुळशी अपार्टमेंट, विठ्ठल चौपाड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शिवशरण हे करीत आहेत.

# सोलापुरातून तिरुपती, दिल्ली, हैदराबाद विमानसेवा

**केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती**

**आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षण सुरु**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

सोलापूरहून देशाच्या विविध ठिकाणी जाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यासह सोलापूर-तिरुपती, सोलापूर-दिल्ली, सोलापूर-हैद्राबाद या विमान सेवा सुरु करण्यासंदर्भातही विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत सकारात्मक चर्चा नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली आहे.






पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाचा जिल्हा असलेल्या आणि मराठवाड्यासह दोन राज्यांच्या जवळचा जिल्हा म्हणून परिचित असलेल्या सोलापूरच्या विमानतळाची नागरिकांना मोठी प्रतिक्षा आहे. सोलापुरातून देशभरात विमानसेवा सुरू झाल्यास येथील दळणवळणाला गती मिळणार असून प्रवाशांना थेट विमानाने दूरपर्यंत कमी कालावधीत पोहोचणे शक्य होणार आहे. आता, विमानतळाची वाट पाहणाऱ्या सोलापूरकरांसाठी गुडन्यूज असून बहुप्रतिक्षित सोलापूर विमानतळावरून लवकरच हवाई वाहतूक सुरू होणार आहे. विमानतळासाठी आवश्यक असलेला डीजीसीए परवाना आणि तांत्रिक प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्याचे निर्देश नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले आहेत. हवाई वाहतुकीच्या अनुषंगाने आवश्यक असलेली कामे विमानतळावर युद्धपातळीवर सुरू असून सोलापुरकरांची प्रतिक्षा लवकरच संपणार आहे. सोलापूर विमानतळाबाबतच्या विविध विषयांसंदर्भात नवी दिल्लीत मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली नागरी हवाई वाहतूक मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली, त्यात हे निर्देश देण्यात आले. या बैठकीस भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. सुरेश, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, डॉ. शरद कुमार यांच्यासह अक्सा आणि इंडिगो कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री मोहोळ म्हणाले, 'उडान-आरसीएसच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या माध्यमातून सोलापूर विमानतळासाठी ५० कोटींची विविध विकासकामे झाली आहेत. शिवाय सोलापूर विमानतळासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचे प्रशिक्षण सुरु असून ते लवकरच सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत. महत्वाचे म्हणजे 'डीजीसीए' (नागरी विमानन महानिदेशालय) च्या परवान्यासाठी आणि तांत्रिक बाबींच्या लवकरात लवकर पूर्ततेसाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

### विमानसेवा सुरू झाली अन् बंद पडली

सोलापूर विमानतळाचा मुद्दा यंदाच्या लोकसभा निवडणुकीतही गाजला आहे. सोलापूर विमानतळ सुरू करण्याचं आश्वासन सर्वच उमेदवारांकडून देण्यात आलं होतं. आता, लवकरच ही विमानसेवा सुरू होणार असल्याचे दिसून येते. सन २००९-१० च्या दरम्यान सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील आणि ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रयत्नामुळे विमानसेवा सुरू झाली होती. मात्र, किंगफिशर कंपनी आर्थिक नुकसानीत आल्याने विमान सेवा बंद पडली आणि तेव्हापासून ही सेवा बंदच आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर २०१६ साली सोलापूर विमानतळचे नाव उडान योजनेअंतर्गत आले, चाचण्याही झाल्या. पण, विमानसेवा सुरू झाली नाही.

# काँग्रेसने तालुक्यातील जनतेला शिक्षण अन् विकासापासून दूर ठेवले

**आमदार सुभाष देशमुख यांचा आरोप**

**टाकळी ते मंद्रुप रस्तेकामाचे झाले भूमिपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्याने मुख्यमंत्री ते केंद्रीय गृहमंत्री पदापर्यंत काँग्रेसला अनेकदा संधी दिली. परंतु संधीचं सोनं न करता तालुक्यातील जनतेला शिक्षण व विकासापासून वंचित ठेवण्याचे काम काँग्रेसने केले असल्याचा आरोप आ. सुभाष देशमुख यांनी केला. टाकळी ते मंद्रूप येथील दोन कोटी साठ लाख रुपये रस्तेकामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.



या वेळी नियोजन समिती सदस्य डॉ. चनगोंडा हविनाळे, संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, संदीप टेळे, प्रशांत कडते, सरपंच भौरव्वा कोळी, उपसरपंच सिध्दाराम घोडके, सरपंच शशीकांत बिराजदार, सरपंच शिवानंद बंडे, सरपंच संगमेश्वर हत्तरसंग, दिपाली व्हनमाने, आप्पासाहेब मोटे, सरपंच भिमाशंकर बबलेश्वर, यतीन शहा, मांतेश बगले, संगमेश बगले, गौरीशंकर मेंडगुदले, नीलप्पा उंबरजे, संजय शिरढोणकर, सुरेश बगले आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुक्यातील जनतेने अनेकदा काँग्रेसला संधी दिली. परंतु तालुक्याचा विकास झाला नाही. दक्षिण तालुक्यातील विकास व शैक्षणिक दर्जा सुधारल्यास सदर मतदार आपल्या मागे राहणार नाही याची जाणीव असल्याने तालुक्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम काँग्रेस सरकारने केले. महायुती सरकारने जनतेच्या विकासासाठी अनेक योजना आणल्या आहेत. मात्र काँग्रेस पक्षातील काही नेते नेहमीप्रमाणे विरोध करून जनतेची पुन्हा दिशाभूल करत आहेत. तालुक्यातील जनतेने याकडे आता लक्ष देऊ नये. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सर्व माता-भगिनींनी लाभ घ्यावा आणि पुढील काळातही ही योजना चालूच राहणार आहे. विरोधक हे फक्त राजकारण करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांचा आशीर्वाद घेवून नवीन सीईओ जंगम यांची घेतला पदभार

**सहकारी अधिकारी आणि जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्यावतीने जोरदार स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांची बदली पुणे स्मार्ट सिटीच्या सीईओ पदावर झाल्यानंतर त्यांच्या जागेवर बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची नियुक्ती शासनाने केली आहे. गुरुवारी जंगम यांची नियुक्ती झाली आणि शुक्रवारी लगेच सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांचे आशीर्वाद घेवून सकाळी साडे दहाच्या सुमारास त्यांनी मावळत्या सीईओ आव्हाळे यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या कारभाराच्या चाव्या हाती घेतल्या.



नूतन सीईओ जंगम यांचे सकाळी दहा वाजता जिल्हा परिषदेमध्ये आगमन झाले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकांदे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, मुख्य लेखा वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर संतोष नवले यांचा सह विभाग प्रमुखांनी त्यांचे स्वागत केले. इतकेच नाहीतर जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्यावतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. आपल्या पदाचा आव्हाळे यांच्याकडून पदभार घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला आणि आपल्या भावना व्यक्त केल्या. पूर्वी विविध ठिकाणी केलेल्या शासन सेवेचा अनुभव आणि सोलापूर जिल्हावासियांच्या प्रश्नांचा अभ्यास करून सर्व समस्या निवारण करणार आहे. शासनाच्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहोचवून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न आपण सोडविणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# 'तरुण भारत'च्या राष्ट्रीय विचारात संस्कारक्षम पिढी घडविण्याची ताकद

**जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के**

**परिवारातील सदस्यांचा सन्मान सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

प्रखर राष्ट्रीय विचार घेऊन ४० वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या मातीमध्ये मरगळलेल्या माणसांची मने मजबूत करण्याच्या उद्देशाने दै. 'तरुण भारत'चा पाया घातला गेला. आजपर्यंत वाईटावर प्रहार आणि चांगल्याचे पुरस्कार करत यशस्वी वाटचाल केली. 'तरुण भारत'च्या राष्ट्रीय विचारात विकासाच्या वाटा निर्माण करण्याबरोबरच संस्कारक्षम पिढी घडविण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी केले.



दै. 'तरुण भारत' परिवारातील सदस्यांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी 'तरुण भारत'चे कार्यवाह व मुख्य समूह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभाग आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक मनोहर बायनी, लेखापाल रंजना घोडके, प्रसाद नडीमेटला, सरिता सालीमठ, वामन बावडेकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते. यावेळी मुख्य संपादकपदी प्रशांत माने यांची निवड झाल्याबद्दल जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के व कार्यवाह दिलीप पेठे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. दैनंदिन कामकाजाबरोबरच चमकदार कामगिरी बजावल्याबद्धल वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक अमोल व्यवहारे, बातमीदार यशवंत गुरव, आर्टिस्ट आनंद उपरे यांचाही सन्मान करण्यात आला. बदलत्या आव्हानाला भेदून दै. 'तरुण भारत'ने वाचकांच्या मनामध्ये एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. व्यवसायात विश्वासार्हता जपत आपलेपणा, राष्ट्र विचारांची नाळ घट्ट ठेवण्याची जबाबदारी पार पाडत असताना अभ्यास, चिंतन, वस्तूनिष्ठ आणि आदर्श पत्रकारितेच्या मूल्यांची जपणूकही केली आहे. आव्हानांच्या वावटळीत न डगमगता त्याला तोंड देत समर्थपणे राष्ट्रीय विचारांची बाजू मांडण्यासाठी कुठेही तडजोड केली नाही, ही बाब फारच गौरवास्पद असल्याचे उद्गारही सोनटक्के यांनी काढले. प्रारंभी मुख्य संपादक प्रशांत माने यांनी प्रास्ताविकात ४० वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत 'तरुण भारत'च्या मूल्यांची उजळणी केली. महाराष्ट्रभर व्यापलेल्या वाचकांच्या विश्वासामुळेच आज 'तरुण भारत'ची मुद्रण क्षेत्रामधील ओळख आणखी ठळक झाली आहे. यासाठी चेअरमन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, कार्यवाह दिलीप पेठे यांचे मार्गदर्शन आणि त्याग महत्त्वाचे ठरल्याचे सांगितले. सूत्रसंचालन मुख्य वरिष्ठ उपसंपादक जगन्नाथ हुक्केरी यांनी केले तर आभार वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांनी मानले.

### अजितकुमार संगवे वृत्तसंपादक

क्रीडा पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण करण्याबरोबरच अन्य विषय हाताळण्याची हातोटी असलेल्या अजितकुमार संगवे यांची 'तरुण भारत'च्या वृत्तसंपादकपदी तर जगन्नाथ हुक्केरी यांची मुख्य वरिष्ठ उपसंपादक, आरती कुसेकर यांची वरिष्ठ उपसंपादकपदी पदोन्नती झाल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. नव्याने पदोन्नती झालेल्यांना निवडीचे पत्रही देण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८७३

**चित्तीं चाड नाही । न धरू आणिकाची काही ।।**
**सेना म्हणे याविण काही । मोक्ष मुक्ती चाड नाही ।।**

मनुष्य हा देह पंच तत्वातून निर्माण झाल्यामुळे एके दिवशी तो निश्चितच पंचतत्वात मिळणार असतो, हे आपणा सर्वांना मान्य असते. तरीही आपण बहुतांश लोक गरजेपेक्षाही जास्त वेळ नाशवंत बाबीच्या जमवाजमवीत घालत असतो. संसाराच्या मायाजाळात अडकल्याने या देहाच्या नाशवंतपणाची जाण अनेकांना होत नसल्याने माणूस स्वार्थापोटी याच्या नाशवंतपणाला आणि पराधिनतेला विसरतो. त्याचे हे विसरणे त्याला या देहावर प्रचंड प्रेम करायला भाग पाडते. या प्रेमापोटी तो या देहाला सजवण्याचा व रुबाबदार ठेवण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात माणूस दुसऱ्यावर अन्याय करायलाही मागेपुढे पाहत नाही. देह म्हणजेच मी, अशी भावना जोपासणारा माणूस दुसऱ्याच्या भावनेची कदर करीत नाही. त्याचबरोबर देहाच्या रक्षणासाठी तसेच



देहाच्या आकर्षकतेसाठी तो वाट्टेल ते करतो. मोठेपणासाठी वाट्टेल ते करणारा माणूस लोक आपणाला नांव ठेवतील का ? या प्रश्नाकडेही कांही प्रमाणात का होईना पाहतो. तरीही जे करायचे ते केल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच समाजात, कुटुंबात अनेकांवर अन्याय होत असतात. ज्याला देह म्हणजे मी हे मान्य नसते तो व्यक्ति देहाच्या रक्षणासाठी, त्याला सजवण्यासाठी अनितीचा मार्ग अवलंबत नाही. त्याचबरोबर सद्सद् विवेक बुध्दिला पटलेले कार्य करतांना लाजतही नाही.

संत सेनाजी महाराजांची अवस्था, चित्तीं चाड नाही । न धरू आणिकाची काही ।।, सेना म्हणे याविण काही । मोक्ष मुक्ती चाड नाही ।।, अशी होती. म्हणून ते उघडपणे नाचत गात पांडूरंगाचे नांव घेण्यात कोणाची लाज बाळगत नसत. तसेच कोणी कांही म्हणेल का? याची पर्वाही करीत नसत. यालाच नि:स्सिम, नि:स्वार्थ भक्ति म्हटले तर उचितच होईल. अशी भक्ती ज्याला करता येते त्याला आनंद वेगळयाने शोधावा लागत नाही. भक्ती हा आवडीचा विषय असल्याने माऊलींच्या, आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी । पिसें आणि न भुलवी । तरी तेंचि काई ।।, या म्हणण्याप्रमाणे आवडीच्या ठिकाणी लाज असत नाही. अनेकांना भक्तीही करावी वाटते आणि भक्तीची लाजही वाटत असते. भक्तीत लाज वाटू नये. अंधश्रध्देला थारा न देता आपल्या सदसदविवेक बुध्दीला पटेल तशी भक्ती करीत आनंदी राहायला हवे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार**
**दि. ३१ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**कृ. त्रयोदशी (२७.४०)**
**ऋतु - शरद**
**नक्षत्र- पुष्य (१९.३८)**
**योग - वरियन (१७.३७)**
**करण - गर (१४.५९)**
**सुर्योदय - ०६.२६**
**सूर्यास्त - १८.५२**

**दिनविशेष -**
**पर्युषण पर्वारंभ,**
**अश्वत्थ मारुती पूजन,**
**चांगला दिवस**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल. आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

**सिंह** : वाचनाची गोडी वाढले. संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.
लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. उपयोगी चर्चा घडून येईल. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : मानसिक संतोष निर्माण होईल. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.


**मीन** : आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल. कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# ए.जी.पाटील अभियांत्रिकीमध्ये रिसर्च इनोव्हेशनवर राष्ट्रीय कार्यक्रम

## विविध राज्यांमधून ७८४ प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑगस्ट-**

सोलापूर शहरातील ए.जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये रिसर्च इनोव्हेशन विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम मोठ्या उत्साहात आणि विविध राज्यातील ७८४ प्राध्यापकांच्या उपस्थितीत नुकताच संपन्न झाला. महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सच्या सोलापूर लोकल डिव्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाला.




इमपाव्हरिंग इंनोवेशन्स थ्रू कंप्रेहेंसिव्ह ऍप्रॉचेस टू रिसर्च अँड डेव्हलपमेंट अर्थात, संशोधन आणि विकासासाठीचा सर्वसमावेशक दृष्टिकोन आणि त्यांचे उपयोजन करून नावीन्यपूर्ण आणि तांत्रिक सबलिकारण असा कार्यशाळेचा विषय होता. संशोधन क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वोकृष्ट आणि कार्यसिद्ध व्यक्तिमत्वाना एका साखळी पुष्पामध्ये गुंफण्याचा समन्वय, सदर कार्यशाळेचे प्रमुख डॉ. एस. आर.साखरे आणि सहसमन्वयक प्रा. एम. एस. बिराजदार यांनी लिलया साधला.

या कार्यशाळेमध्ये, विविध समित्यामधील तांत्रिक सल्लागार डॉ. एस. पी. कल्लूरकर, मुंबईच्या सरदार पटेल इन्स्टिटयूटच्या संशोधन विभागप्रमुख डॉ. वाय. एस राव, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन अँड इनोव्हेशनचे असिस्टंट डायरेक्टर श्री. पी. सी. ढगे, बेंगलोरच्या नागार्जुन अभियांत्रिकीचे डॉ.प्रवीण सर, तसेच डॉ. भूषण कुमार येलूरे, डॉ. रजनी सज्जन अशा विविध संशोधन क्षेत्रातील मान्यवरांनी आपला कार्यानुभव देशपातळीवरील अनेक प्राध्यापक मंडळी सोबत या कार्यक्रमाद्वारे सादर केला.

याकार्यशाळेचे प्रमुख संयोजक हे ई अँड टीसी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. व्ही.दरेकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेपासून आभार प्रदर्शनापर्यंतच्या नियोजनाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी केले तसेच सर्व उपस्थित प्राध्यापकांना कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये आणि संशोधनाचे महत्व स्पष्ट केले तर इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सच्या सोलापूर विभागाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. देशपांडे यांनी भविष्यातील अभियांत्रिकी संधी आणि संशोधन यावर मार्गदर्शन केले. यावेळी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सच्या सोलापूर डिव्हिजनचे सचिव डॉ.यु. एस. मुगळे ही उपस्थित होते. कार्यकमातील सर्व मान्यवरांची ओळख प्रा. एस. एन. कांबळे यांनी करून दिली तर प्रश्नमंजुषेचा कार्यभार प्रा. एस. पी. कटके यांनी पार पाडला. सबंध कार्यक्रमाच्या तांत्रिक तथा माहिती आणि प्रसारणाची बाजू, प्रा. एस. जे. लिगाडे, प्रा. एस. एस. मेटगार आणि प्रा. पी. सी.ढवळे यांनी यथार्थ साध्य केली तर सूत्रसंचालन प्रा. पी. बी. साबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. वालीकर आणि नंदिनी अळगी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन ए जी पाटील इन्स्टिटयूटचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील आणि विश्वस्त शिवानंद पाटील यांनी अनेकविध कार्यक्रम नियमितपणे सुरु राहण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# संतांच्या सहवासात भगवंताचा अनुभव : साध्वी प्राचीश्रीजी

**सोलापूर, दि.३० ऑगस्ट-**

शहरात संत वास्तव्यास असतील तर दर्शनाला जा. संत ज्याठिकाणी जातात ते ठिकाण अतिशय पवित्र व आनंदमय बनते. ज्याठिकाणी संत वास करतात तेथील वातावरण बहरते.संत भगवंतांचे मूर्त रूप असतात. संत दर्शन, संत सहवास आणि संतांचे प्रवचन श्रवण यासाठी सौभाग्य लागते.संत वचनांवर दृढ श्रद्धा व विश्वास हवे.संतांच्या सहवासात भगवंताचा अनुभव येतो असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

नुसता पैसा पैसा करत पैशाच्या मागे लागू नका. धर्मस्थानकात यायचे म्हटले की आपल्याला वेळ नसतो, हजारो कारणे सांगता. तुम्ही कितीही पैशाच्या मागे लागा जेवढे नशिबात आहे तेवढेच मिळणार आहे.शास्त्र श्रवणात प्रमाद नको. संत आपल्या मुखाद्वारे भगवान जिनेश्वरांची वाणी कथन करत असतात.धर्म आराधना करायचे असेल तर मंदिरात, स्थानकात या. सामूहिक धर्म आराधनेमुळे शुभ स्पंदने निर्माण होतात.त्याचा फायदा आपणास होतो. स्थानकात,मंदिरात आल्यामुळे साधर्मी बंधू भेटतात. साधर्मी बंधूंमुळे प्रेरणा मिळते. चातुर्मासानिमित्त प्रवचन सुरू आहे.त्यानिमित्त कानावर ईश्वराची




वाणी संतांच्या मुखाद्वारे ऐकावयास मिळते हे आपले सौभाग्य आहे. साधर्मी बंधूंना सहयोग करा. आपल्या बंधूची परिस्थिती कशीही असू द्या, भेदभाव करू नका. साधर्मी भक्तीची महिमा अगाध आहे.मिळालेला पैसा हा घरासाठी, व्यापारासाठी,धर्मासाठी आणि बचत अशा कार्यासाठी वापर करा.धर्मासाठी पैसा द्यायचे म्हटले की हात आखडते घेतो. देताना हात थरथरतात, असे का? दान देण्यासाठी परिस्थिती नव्हे तर धैर्य लागते.

पर्युषण पर्व काळात ज्ञान,चारित्र्य, आलोचना, क्षमापना या गोष्टींना विशेष महत्त्व आहे.दान,शील,जप यांना जोडून राहण्याचा हा पर्व.या काळात दान दिल्याने कित्येक पटीने फळ मिळते.संतांचा उपदेश ऐका,धर्माचरण करा.त्यामुळे तुमचेच कल्याण होणार आहे.आपणच जर धर्म नाही केला तर येणाऱ्या पिढी पुढे आपण काय आदर्श ठेवणार?

# चार कोटीच्या फसवणूक प्रकरणातील बनावट शिक्के बनविणाऱ्यास जामीन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट -**

श्रीशैलकुमार बसवनप्पा हदीमणी (वय ५५, रा कलबुर्गी, सध्या रा. अमेरिका) यांची शासनाचा बनावट मंजुरी आदेश तयार करून चार कोटी रुपयांची फसवणूक प्रकरणातील बनावट शिक्के बनविणाऱ्या नितीन माधव वहालकर यास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी जामीन मंजूर केला.



श्रीशैलकुमार हदीमणी हे सन २०१८ साली अमेरिकेत राहत होते. ते भारतात आल्यावर त्यांची ओळख मनोज गोडबोले यांच्याशी झाली. गोडबोले याने आपण नायब तहसीलदार पदावर कार्यरत असल्याचे खोटे सांगून इतर साथीदारांमार्फत संगणमत करून सोलापूर व पुणे येथील जमिनी विकासाच्या प्रयोजनासाठी कमी किमतीमध्ये कायदेशीर चलन भरून घेऊन देतो, असे अमिष दाखवून शासनाचे बनावट मंजुरी आदेश तयार करून हदीमणी याची ४ कोटी रुपयांची फसवणुक केली. यातील शासनाच्या आदेशावर बनावट शिक्के हे आरोपी नितीन वहालकर यांच्याकडून बनवून घेतल्याचे निष्पन्न झाल्याने याबाबत चार कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी श्रीशैलकुमार हदीमणी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ९ जून २०२३ रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात नितिन वहालकर यास पोलिसांनी अटक केली असून सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी वहालकर याचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता. त्यामुळे आरोपीने उच्च न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावरील सुनावणीवेळी आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायमूर्तींनी ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे ॲड.एम. आर.तिडके यांनी तर अर्जदार आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे, ॲड. मोहन कुरापाटी यांनी काम पाहिले.

# सिंहगड इन्स्टिट्युट येथे आजपासून दोन दिवसीय शैक्षणिक परिषद

## शिक्षकांना दोन दिवस नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

एजुकेशनल इनोव्हेशन बैंक प्रोजेक्ट अंतर्गत स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन अर्थात सर फौंडेशन सोलापूर यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील दोन दिवसीय एजुकेशनल इनोव्हेशन कॉन्फरन्स दिनांक ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर रोजी सिंहगड इन्स्टिट्युट केगांव येथे आयोजन केले आहे.

या कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्र व देशभरातील सुमारे २०० प्रयोगशील शिक्षक सहभागी होणार आहेत. शिक्षकांच्या नाविण्यपूर्ण प्रयोगांचे सादरीकरण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच चर्चासत्र, परिसंवाद व नवोपक्रम स्पर्धेतून निवडलेल्या प्रयोगशील शिक्षकांना ''नॅशनल इनोव्हेशन अवॉर्ड २०२३-२४'' चे वितरण अशा प्रकाराचे शैक्षणिक मंथन होणार आहे. पुरस्काराचे वितरण जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, महाराष्ट्र शासनाच्या ''सारथी'' संस्थेचे संचालक श्री अशोक काकडे, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, प्रिसीजन फॉउंडेशन च्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते व लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, भारत सरकार च्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा,पुणे चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.आशिष के.भट्टाचार्य, उपसंचालक कमलादेवी आवटे, डॉ शोभा खंदारे, परीक्षा परिषद पुणे उपायुक्त संजय राठोड,माजी उपसंचालक प्रदीप मोरे,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्राचार्य डॉ.इब्राहिम नदाफ, जितेंद्र साळुंखे व भागीरथी गिरी,

जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, सहायक कुलसचिव सोलापूर विद्यापीठ डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे, प्राचार्य डॉ. शंकर नवले, निवृत्त शिक्षण अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्या सुजाता लोहोकरे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक भाऊसाहेब चासकर , शिक्षण तज्ञ दत्तात्रय वारे, तंत्रस्नेही शिक्षक संदीप गुंड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. सदर शिक्षण परिषदेचा शिक्षकांनी लाभ घ्यावा, असे आव्हान फाऊंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ व महिला राज्य समन्वयक हेमा शिंदे यांनी केले आहे.

# भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध

विमुक्तदिन भटकेविमुक्त समाजाला कलंकित करणारा गुन्हेगार जाती कायदा आजच्या दिनी दि. ३१ ऑगस्ट १९५२ला भारत सरकारने मागे घेतला. भारतीय समाज हा सुमारे प्रमुख ४०० जाती आणि ५००० हजार उपजातीनी तयार झाला आहे. समाजाची जडणघडण होण्यासाठी कामाची विभागणी झाली. या कर्मविभागणीचेच पुढे जातीव्यवस्थेत रूपांतर झाले.

विविध जातींमध्ये विभागलेला हा समाज हिंदू या धर्माच्या छत्रछायेखाली प्राचीन काळापासून एकत्र नांदतो आहे. काळाच्या ओघात या समाजव्यवस्थेला वैगुण्याची कीड लागली. जातीतून अस्पृश्यता जन्माला आली. व्यवसाय, सामाजिक व्यवहार यांच्याऐवजी जात जन्मानुसार ठरू लागली. बहुसंख्य समाज या अस्पृश्यतेच्या, विषमतेच्या रोगाचा बळी ठरला. याच समाजात असणारा एक घटक म्हणजे भटके-विमुक्त होय. ५१ प्रमुख व २०० उपजातींत विखुरलेला हा समाज कायमचा समाजव्यवस्थेबाहेर फेकला गेला. आधी येथील समाजव्यवस्थेने आणि नंतर परकीय आक्रमकांनी या भटके-विमुक्तांना देशोधडीला लावले. सांगायला गाव नाही, राहायला घर नाही, अशी दैन्यावस्था या समाजावर आली. मुळात हा भटके-विमुक्त समाज म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. आपल्या देशाला प्राचीन काळापासून एक समृध्द वारसा लाभला आहे. आपला देश अनेक क्षेत्रांत अग्रस्थानावर होता. जागतिक पातळीवर सर्व क्षेत्रात नेतृत्व करणारा आपला देश होता. एकेकाळी भारतीय गावगाड्याशी आणि वैभव संपन्न समाजाशी जोडले गेलेले, भव्य मंदिरे अजिंठा वेरुळची लेणी, अशोकस्तंभ सारखी शिल्पे कृषी, गो विज्ञान वैद्यक शास्त्र शस्त्र निर्मीती, भविष्य शास्त्रात मनोरंजन इ. विषयात पारंगत होते. एका चिरंतन संस्कृतीचा वारसा आपल्या समाजाला लाभला आहे आणि या संस्कृतिकचे वाहक होते. आज ज्यांना भटके-विमुक्त म्हटले जाते ते समाजबांधव कधी मुस्लिम तर कधी इंग्रजांशी कडवी झुंज देत राहिले. राजस्थानात महाराणा प्रताप असो की महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य निर्मीती गडकोट किल्ल्यांचे बांधकाम असो की यांचे रक्षण भटके-विमुक्त जाती जमाती कायम देव देश धर्मा साठी बलीदान संघर्ष करीत राहिल्या. मुळात लढवय्ये वीर असणारे हे बांधव आपल्या परंपरागत व्यवसायातून संस्कृतिचे वहन करीत असत.

या समाजबांधवांमध्ये भिल्ल, पारधी, वैदू, वडार, बहुरूपी, वासुदेव, नाथजोगी, नंदीबैलवाले, मरिआईवाले, मेंडगी-जोशी, सरोदे, शिकलकार, धनगर, कोल्हाटी, बंजारा आदी प्रमुख समाजघटक होते. छत्रपतींच्या स्वराज्यात हे सर्व समाजबांधव समाजाच्या मुख्य प्रवाहाशी नाळ बांधून आपला उदरनिर्वाह करीत असत. बहिर्जी नाईकांसारखा वीरपुरुष याच समाजातून स्वराज्याला प्राप्त झाला. बारा बलुतेदारांबरोबर पसाभर धान्य शेतकरी या समाजबांधवांच्या झोळीत आनंदाने घालत. इंग्रजांचा अंमल सुरू झाला. १८५७च्या स्वातंत्र्यसमरानंतर मराठा सत्तेचा अस्त झाला आणि भारतावर इंग्रजांची सर्वकष सत्ता आली. या १८५७च्या पहिल्या स्वातंत्र्य समरात भटकेविमुक्त जाती जमातींचे मोठे योगदान होते. त्यानंतरही इंग्रजांना ही सत्ता सुखासुखी भोगता येत नव्हती. कधी राजे उमाजी नाईकांचे बंड, तर कधी तंट्या भिल्लाचे बंड असे प्रसंग वारंवार घडत होते. वासुदेव बळवंत फडक्यांनी उभ्या केलेल्या सैन्यात या भटके व विमुक्त समाजबांधवांचे योगदान मोठे होते. भारतभर ठिकठिकाणी भटके-विमुक्त बांधव इंग्रजांशी लढून त्यांना जेरीस आणत होते. भटके विमुक्तांनी इंग्रजांचे राज्य नाकारले स्वराजासाठी संघर्ष उभा केला. याचा बंदोबस्त करण्यासाठी १८७१ साली इंग्रजांनी जन्मजात गुन्हेगारीचा कायदा Criminal Tribes Act आणला. या जाचक कायदयापासून वाचण्यासाठी सुरू झाली भटकंती. आज येथे तर उदया तिथे. स्वातंत्र्याच्या पहाटेनंतरही त्यांची ही परवड कायम राहिली. या समाजाचा एक अविभाज्य घटक असूनही भटका समाज परका ठरला. घृणित जीवन जगू लागला. शौर्याचा वारसा लाभलेला हा सारा समाज पोटातील आगीपुढे हतबल झाला. भटके जीवन नशीबी आले. भटकेविमुक्तांना उत्पन्नाचे निश्चित साधन राहिले नाही. ते देशोधडीला आगले रानोमाळ... वनाजंगलातून लपून राहायचे, पोलीस, कायदा यापासून स्वतःचा बचाव करायचा, पण पोटाचे काय? पोटाच आग शांत कशी होणारं? या बांधवाकडे एकच उपाय होता... चोरी ... स्थिर समाजाच्या स्पर्धेत अवहेलना आणि ससेहोलपट चालु झाली ती आजतागायत कमी अधिक प्रमाणात कायम आहे. उपजीविकेसाठी चोरीसारख्या घृणित गोष्टीचा आसरा घ्यावा लागला. हे त्या बांधवांचे दुर्भाग्यच! पण चोरीचा कायमचा आणि जन्मजात शिक्का त्यांच्यावर बसला. हे साऱ्याच समाजाचे दुर्वर्तन होते. स्वांतंत्र्यानंतरही त्याच हीनदीन, वंचित अवस्थेत जीवन कंठण्याची मुक्त करण्यासाठी स्वांतंत्र्यानंतर जवळजवळ दहा वर्षाचा काळ जावा लागला. यातून मुक्त होवून सन्मानाचे जीवन जगण्याचे भाग्य काही या बांधवांच्या नशिबी आले नाही. सततच्या भटकंतीमुळे यापैकी अनेकांची कोठेही शासकीय पातळीवर नोंद नाही. जनगणनेत, मतदान यादीत स्थान नाही. जातीचे प्रमाणपत्र नाही. ८० टक्क्यांपेक्षा अधिक निरक्षर आहेत. भटके व विमुक्तांना घटनात्मक संरक्षण नाही. काही राज्यात त्याचा एस.सी.मध्ये काही ठिकाणी एस.टी.मध्ये समावेश आहे. केंद्र शासनाच्या सूचीत भटके-विमुक्तांचा समावेश ओ.बी.सी.मध्ये केला आहे. काही जमातींचा कशातच समावेश नाही. लोक देतील ते अन्न, भिकेतून मिळेल ते वस्त्र आणि चार बांबूचे पाल हीच यांची मालमत्ता. जी गावाची हागणदारी तीच यांची वतनदारी.

**-उध्दवराव काळे,**
**नाशिक उपाध्यक्ष भटके विमुक्त विकास परिषद**

**शिक्षण :** भटके विमुक्त समाज गावकुसाबाहेर पाले टाकून राहतो. भटके विमुक्तातील अनेक समाज जसे डोंबारी, नंदीबैलवाले, मरिआईवाले, मसनजोगी, बहुरूपी या समाजात कुटुंबाचा प्रमुख आधार मुलेच असतात. कुटुंबाला जगविण्यासाठी भिक्षा मागून, कसरती करून, भविष्य सांगून, अभिनय करून, कुटुंबाचे पालनपोषण करतात. यामुळे नियमित शाळेची वेळ, शाळेची शिस्त, शाळेचा दिलेला अभ्यासक्रम पाळणे अतिशय कठीण बाब आहे. यामुळे भटके विमुक्त समाजात शाळाबाहय मुलांची संख्या अधिक दिसून येते. भटके विमुक्त समाजातील मुले पुर्व प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून ते राहत असलेल्या ठिकाणी म्हणजे पालावरती शाळापूर्व शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण मिळण्याची योजना करण्यात आली. यालाच पालावरची शाळा/अभ्यासिका म्हणतात. मुलांच्या आरोग्य समस्या दुर करण्यासाठी आरोग्य आयामाची सुरवात करण्यात आली. याच्या अंतर्गत मुलांना पोषण आहार, लसीकरण तसेच वस्तीला डॉक्टर जोडणे, आरोग्य शिबीर, आरोग्य मार्गदर्शन असे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. त्याचबरोबर वस्ती स्वास्थ्य नीट रहावे म्हणून आरोग्य पेटीचेही वाटप करण्यात येते. या आयामाअंतर्गत वस्तीतल्या लोकांना एकत्रित आणण्याचे कार्यक्रम घेण्यात येतात. मुख्य उददेश वस्तीतल्या लोकांचे संघटन वाढवणे असून त्याअंतर्गत वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात. वस्तीमध्ये रक्षाबंधन, योगदिन, स्वातंत्र्यदिन, गणेशउत्सव, मकरसंक्रांत, प्रजासत्ताकदिन साजरे केले जातात. यात जास्तीतजास्त पालकांचा सहभाग घेतला जातो.

**स्वावलंबन :** वस्ती विकासासाठी या आयामाअंतर्गत भटक्या विमुक्त समाजाच्या महिलांचे बचतगट तयार करण्यात आले. महिलांना सबलीकरण करणे व आर्थिक बचत करणे हे या प्रकल्पाचे उददेश. सब समाज को लिए साथ आगे है बढ़ते जाना. भटके विमुक्त समाजाला त्याचे पुर्वी चे मानाचे सन्मानाचे स्थान, त्यांचे हक्क त्यांना मिळवुन देणे यासाठी भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश कटिबद्ध आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### चिखलठाणच्या न्यू इरा पब्लिक स्कूलमध्ये दहीहंडी उत्साहात

**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**

चिखलठाण येथील न्यू इरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी उत्साहात पार पडली. यामध्ये प्री प्रायमरी व प्रायमरीच्या बालगोपाल कृष्ण आणि राधांच्या वेशभूषेत उपस्थित होते. शाळेतील शिक्षिका अश्विनी प्रशांत पाटकुलकर यांनी दहीहंडी फोडणे हे भगवान श्रीकृष्णावरील भक्ती आणि प्रेमाचे प्रतीक मानले जाते. दहीहंडीच्या आयोजनात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण असते. हा सण भगवान श्रीकृष्णाच्या बालपणीच्या करमणुकीचे प्रतिक आहे. जेव्हा ते आपल्या मित्रांसह उंचावर टांगलेली मडकी फोडून लोणी आणि दही चोरण्याचे प्रयत्न करायचे. या सणाला परस्पर प्रेम, सहकार्य आणि सामाजिक सुसंवाद आणि एकतेचे प्रतीक मानले जाते. पहिलीच्या प्रांजल सागर लोकरे हिने राधाची तर दुसरीचा वेदांत नितीन घोडके याने श्रीकृष्णाची वेशभूषा परिधान केली होती. वेदांत नितीन घोडके याने दहीहंडी फोडली.



### मैंदर्गी कन्नड शाळेच्या पालकांची तीर्थयात्रा

**अक्कलकोट, दि.३० ऑगस्ट-**

तालुक्यातील मैंदर्गी जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेची पटसंख्या व गुणवत्ता वाढून जिल्हा परिषद शाळेकडे पालकांचा ओढा वाढवा, म्हणून पालकांना तीर्थयात्रा घडविण्यात आली. मुख्याध्यापक महांतेश्वर हनमंतराव कट्टीमनी यांनी हा अनोखा उपक्रम राबविल्यामुळे तालुक्यात कौतुक होत आहे. ही शाळा नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. परिसर भेट, साखर कारखाना भेट, वनभोजन, पालकांच्या सहकार्याने वृक्षारोपण, आषाढी एकादशी दिंडी, प्रभात फेरी असे उपक्रम राबविण्यात येत असून, दिंडीमध्ये घोडा गाडी, रथ, बग्गी याचा समावेश असतो. बालवयातच विमानात बसण्याची शेतकरी, मजुरांच्या मुलींची इच्छाही या शाळेने दोनवेळा पूर्ण केली. शाळेने श्रावण महिन्यात पालकांना श्रीशैलम्, मंत्रालय, महानंदी येथील दर्शनासाठी चक्क मोफत घेऊन गेले. यासाठी मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर गोब्बूर यांनी पुढाकार घेतला आहे.



### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या ११३ व्या जयंती निमित्त २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, कॅप्टन डॉ.विजया गायकवाड, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षक, तालुका क्रीडा समन्वयक व सीटीओ प्रा. राम काळे, महाविद्यालयातील खेळाडू, एनसीसी कॅडेट आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पूर्वापार वहिवाटीचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. ३० ऑगस्ट-**

स्टेशन रस्ता कुरनूरकर घर येथून सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय येथून ग्रामीण रुग्णालयास जाण्याकरिता पूर्वापार वहिवाट रस्ता आहे. ग्रामीण रुग्णालयास तातडीचे अपघातातील जखमी रुग्ण, प्रसुतीसाठी जाणारी महिलांना रुग्णालयात तातडीने घेऊन जाण्यासाठी वहिवाटीचा पूर्वापार रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय येथून जातो. अक्कलकोट तीर्थक्षेत्री रोज हजारो भाविकांच्या गाड्या पागाचाळ, प्रियदर्शनी सांस्कृतिक भवनातील कार्यक्रम लग्नासाठी आलेली मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर असतात. यामुळे वाहतुकीच्या रस्त्यावरून रुग्णवाहिका रुग्ण घेऊन जातात. वाहतुकीच्या कोंडीला समोरे जावे लागते. रुग्णांना तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी रहदारीचे अडथळे दूर करून जाण्यापेक्षा पर्यायी मार्ग सार्वजनिक बांधकाम कार्यालय येथून आहे. मात्र हा पूर्वापार वहिवाट जाणारा रस्ता कार्यालयाकडून बंद केला आहे. यामुळे हा रस्ता तातडीने लोकांच्या सेवेसाठी आठ दिवसांच्या आत खुला करून देण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन निवेदन लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अक्कलकोट कार्यालयास दिले आहे. अन्यथा टाळे ठोको आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. याप्रसंगी चलिक गणेश, शिरसाट, मुबीन अन्सारी, शिवा धसाडे, सद्दाम शेख, दत्ता कांबळे आदी उपस्थित होते.

# संत रोहिदास महामंडळाचे थकीत कर्ज माफ करा

## संजय शिंदे : राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मेळाव्यात ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑगस्ट-**

राज्यातील चर्मकार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी असलेल्या श्री संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळाकडून वाटप करण्यात आलेले संपूर्ण कर्ज माफ करण्याच्या मागणीचा ठराव करण्यात आला असून शासनाने वंचित असलेल्या चर्मकार समाजाच्या मागणीचा विचार करून या महामंडळाचे कर्ज माफ करण्याची मागणी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष संजय शिंदे यांनी केली आहे

चर्मकार समाजातील विविध प्रश्नांवर मुंबईतून निघालेल्या समाज जनजागृती अभियानानिमित्त सोलापुरातील सम ाजकल्याण केंद्रात चर्मकार समाजाचा मेळावा झाला, यावेळी ते बोलत होते. चर्मकार समाज कष्टकरी असून, कौशल्यावर काम करणारा आहे. त्यांनाही जागतिकीकरणाचा मोठा फटका बसला



### या मागण्यांवर विचारमंथन

राज्यातील समाजाची रखडलेल्या प्रमुख मागण्यांवर जनजागृती व्हावी, यासाठी हे अभियान सुरू केला आहे. संत रोहिदास महामंडळाची संपूर्ण थकीत कर्ज माफ करण्याची घोषणा सरकारने केली होती. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही. यासाठीच कर्ज माफी द्यावी. तसेच महामंडळाकडून समाजातील हुशार गुणवंत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी अर्थ सहाय्य करावी. महामंडळाला राज्य आणि केंद्र शासनाकडून किमान हजार कोटीचा निधी मिळावा. जेणेकरून समाजात अनेक तरूण उद्योजक होण्यास मदत होईल यासह अन्य विषयाचा मुद्दा शिंदे यांनी उपस्थित केला.

आहे. यातून सावरण्यासाठी त्यांना बळ देण्याची गरज आहे. यावेळी प्रदेश कोषाध्यक्ष प्रशांत कांबळे, अशोक खाडे, जिल्हाध्यक्ष अजय राऊत, शहराध्यक्ष परशुराम मग्रुमखाने, माने बँकेचे संचालक शावरप्पा वाघमारे, तानाजी जाधव, म लिक हब्बू, कविता कोडवाना, पिंटू इरकशेट्टी, सुनिल इरकशेट्टी, कर्मचारी युनियनचे शहराध्यक्ष सुनील काळे, दिलीप टोणपे, वनिता कासे, मच्छिंद्र कांबळे, धर्मेंद्र कांबळे, दत्ता बनसोडे, विष्णू शिंदे, राजेंद्र कांबळे, सचिन कांबळे, किरण डांगे, शंकर कांबळे, नागेश कांबळे, पंकज बनसोडे, सुधाकर कांबळे, युवराज कांबळे, व्यंकटेश शिंदे, विशाल टोणपे, शहराध्यक्ष अनिता गवळी, भाग्यश्री शिंदे, गौराबाई कोरे उपस्थित होते.



### श्री वटवृक्ष देवस्थानचे योगदान कौतुकास्पद : आ. पंकजाताई मुंडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० ऑगस्ट-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे धार्मिक क्षेत्रातील योगदान कौतुकास्पद असल्याचे मत आ. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले, यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी मंदिर समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. आ. पंकजाताई मुंडे यांनी मंदिर समितीच्या वतीने वर्षभरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हे माझ्या ऐकिवात असून यामुळे समाजात भक्तीप्रबोधनाचा प्रसार होत आहे. याबद्दल भक्तांम ध्ये धार्मिक बांधिलकी वाढण्यास मदत होईल असे सांगत वटवृक्ष मंदिरातील स्वच्छता व प्रसन्न वातावरण याबद्दलही समितीचे त्यांनी कौतुक केले. याप्रसंगी आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आनंद तानवडे, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, पंचायत समितीचे माजी सदस्य बाळासाहेब मोरे, भाजपाचे शहराध्यक्ष शिवशरण जोजन, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्याचे पोनि राजेंद्र टाकणे उपस्थित होते.

# करमाळा तहसीलवर महिला सन्मानासाठी आक्रोश मोर्चा

## ॲड. सविता शिंदे, एलिझाबेथ असादे यांनी केले नेतृत्व

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**

महिलांवरील वाढत्या अत्याचाराला आळा बसवण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात तसेच महिलांबाबतच्या कायद्याची त्वरित अंमलबजावणी करावी, यासाठी करमाळ्यात म हिला सन्मान रॅली काढण्यात आली.

त्याप्रसंगी करमाळा शहर व परिसरातील महिलांनी आपली मनोगत व्यक्त केली. या महिला सन्मान रॅलीचे ॲड. सविता शिंदे व एलिझाबेथ असादे यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी समृद्धी राखुंडे, कुमारी साखरे, डॉ. सुनीता दोशी, स्वाती फंड, ज्योती मुथा, स्वाती माने, वर्षा चव्हाण, प्रा. सुवर्णा कसबे, शीतल वाघमारे यांची भाषणे झाली. आंदोलनात विजयमाला चौरे, नलिनी जाधव, राजश्री कांबळे, प्रमिला जाधव, नीलिमा पुंड, डॉ. स्वाती बिले, माधुरी परदेशी, रेश्मा भोंगे, स्नेहा चव्हाण, सना शेख, अर्चना गायकवाड, कोमल गोरे, सारिका जवंजाळ, विद्या एकतपुरे, म ाधुरी भणगे, स्वाती मसलेकर, सुनंदा दुधे, मंगल भोसले, स्वाती पाटील, रोहिणी शिंदे, अर्पिता सोनवणे, मंजू देवी, सोनल पवार, मोहर खंकाळ, अपूर्वा मोरे, योगिता चवरे, राजश्री म ाने यांच्यासह महिला उपस्थित होत्या. महात्मा गांधी विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, करमाळा, गुरुकुल कोर्टी या शाळेतील शेकडो विद्यार्थी, शिक्षिका, शिक्षक सहभागी झाले होते. तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनास सकल मराठा सम ाज, मुस्लिम संघटना, प्रहार संघटनांनी पाठींबा दिला.



### या आहेत मागण्या

- महिलांवरील अत्याचार, हिंसेचा तपास व न्यायालयीन खटले १०० दिवसांत पूर्ण केले जावेत
- अत्याचार पीडित महिला व साक्षीदारांना संरक्षण द्यावे
- शाळा, महाविद्यालय, बस स्टँड, रेल्वे स्टेशन, सिनेमागृहे या सार्वजनिक ठिकाणी महिला सुरक्षिततेचे उपाय केले जावेत
- निर्भया निधीचा उपयोग योग्य तऱ्हेने, अत्याचार पीडित महिला व महिला सुरक्षिततेसाठी केला जावा
- लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ ची कडक अंमलबजावणी केली जावी.
- शाळा-महाविद्यालयातील शिक्षण, सरकारी कार्यालयांमार्फत व इतर सार्वजनिक कार्यक्रमांद्वारे महिलांना समतेची वागणूक देण्याबाबत व हिंसाचारविरुद्ध प्रबोधन करण्यावर भर दिला जावा

# रामभाऊ जोशी हायस्कूलमध्ये समुपदेशन



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३० ऑगस्ट-**

करकंब येथील रामभाऊ जोशी हायस्कूलमध्ये पंढरपूरच्या निर्भया पथकाने विद्यार्थिनींसाठी समुपदेशनातून मार्गदर्शन केले. महिला आणि तरुणींना त्यांची सुरक्षितता आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून देणे, पुरुषांना त्यांचे कृत्य अपराध असल्याबाबत किंवा त्याचे परिणाम, शिक्षाबाबत मार्गदर्शन करण्याच्या दृष्टिकोनातून समाजात निर्भया पथकामार्फत प्रबोधनात्मक शिबीर घेण्यात येत आहेत. निर्भया पथक प्रमुख नाईक सागर सावंत, कॉन्स्टेबल शिवाजी आवटे, महिला कॉन्स्टेबल निर्मला वाघमारे, म ाधुरी क्षीरसागर यांच्या पथकाने मार्गदर्शन केले. याप्रसंगी पर्यवेक्षक धनवंत करळे, विननाक कुलकर्णी, नागेश घुले, अतुल अभंगराव, संजय पाटील, सुरेश दहिगिरे, अभिषेक चोपडे, शुकूर बागवान, सोमनाथ माने, मनीषा ढोबळे, शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन महादेव पुजारी यांनी केले.

### निर्भया पथकाची मदत कशी मिळते?

निर्भया पथकास संपर्क साधण्यासाठी महिला १०३, १०० किंवा १०९१ या टोल फ्री क्रमांकांचा वापर करू शकतात. व्हॉटस् ॲप अथवा प्रतिसाद बरोबरच ई-मेल तसेच निर्भया पथकाने फेसबुक पेज ओपन केले असून या पेजवरही महिला तक्रार नोंदवू शकतात. सोशल मीडियावरूनही पोलिसांशी संपर्क साधता येईल. पोस्ट कार्ड किंवा पत्राद्वारेही जवळच्या पोलीस स्टेशनला कळवू शकता.

### खासगी वेशात टीम कार्यरत

निर्भया पथकाच्या प्रत्येक टीममध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक किंवा पोलीस उपनिरीक्षक दर्जाची एक महिला पोलीस अधिकारी, त्यांना मदत करण्यासाठी दोन महिला पोलीस हवालदार व दोन पुरुष हवालदार असतात. निर्भया पथकाच्या टीमचे अस्तित्व नागरिकांकरिता गोपनीय ठेवण्यासाठी ही टीम खासगी वेशात वावरते.

# नियमबाह्य बदल्या रद्द करण्यासाठी तलाठ्यांचे कामबंद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० ऑगस्ट-**

बदलीस पात्र तलाठी व मंडल अधिकाऱ्यांची नियमबाह्य बदली करण्यात आल्याने बदल्या रद्द करण्यासाठी दक्षिण सोलापूर तालुका तलाठी संघटनेने २६ ऑगष्टपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

दक्षिण सोलापूर तलाठी संघटनेनी दक्षिण सोलापूर तहसीलदार व मंद्रुप अप्पर तहसीलदारांना कामबंद आंदोलन करीत असल्याचे निवेदन दिले आहे. ऑगष्ट २०२४ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तलाठी व मंडल अधिकाऱ्यांची चुकीच्या पध्दतीने व नियमबाह्य बदली करण्यात आली आहे. सेवा ज्येष्ठतेनुसार बदली न करता मनमानी पध्दतीने बदली करण्यात आल्याने पात्र तलाठी व मंडल अधिकाऱ्यांवर अन्याय झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मनमानी कारभारामुळे बदली झालेल्या अनेक तलाठी व मंडलअधिकाऱ्यांवर अन्याय झाला आहे. नियमबाह्य व चुकीच्या पध्दतीने बदली केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून व बदली रद्द करुन बदली प्रक्रिया पुन्हा राबविण्याची मागणी तलाठी संघटनेनी केली आहे. यावेळी एस. बी. शेड्याळ, आर. व्ही. कोकरे, पी. बी. बागूल, जे. डी. हुच्चे, एम. एन. पवार, ए. बी. मगर, आर.एस. विटेकर, ए. जी. पंतुवाले, आर. आय. बबलादी, अजय जैस्वाल, चारूदत्त काकडे, सुरेश कोळी, निंगू कोळी आदी तलाठी उपस्थित होते.



सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तलाठी व मंडलअधिकाऱ्यांची चुकीच्या पद्धतीने बदली झाल्याने अन्याय झाला आहे. त्यामुळे अन्याय झालेल्या तलाठी व मंडलअधिकाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व बदली प्रक्रीया रद्द करण्यासाठी २६ ऑगष्टपासून कामबंद आंदोलन सुरू आहे.

**- रावसाहेब कोकरे,**
माजी अध्यक्ष, तलाठी संघटना, दक्षिण सोलापूर

# जोतिराम आवताडे यांच्या उपोषणाला यश

## फळवणी येथे स्मशानभूमी, ग्रामसुरक्षा यंत्रणाच्या अडचणी होणार दूर

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० ऑगस्ट-**

फळवणी (ता. माळशिरस) येथील सामाजिक कार्यकर्ते जोतीराम आवताडे यांनी शनिवारपासून सिद्धनाथ मंदिराजवळ गावातील विविध सम स्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यांच्या उपोषणाला यश मिळाले आहे.

यामध्ये फळवणी येथे गावामध्ये स्मशानभूमी व्हावी, शाळेसमोरील इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मर शिफ्ट करण्यात यावा, गावामध्ये हिंसक वन्य प्राणी (बिबट्या, तरस) यांचा बंदोबस्त व्हावा, ग्रामसुरक्षा यंत्रणा (१८००२७०३६००/९८२२११२२८१) गावामध्ये कायमस्वरूपी चालू ठेवावी, प्राथमिक आरोग्य केंद्र सेवा व आरोग्य सेविका गावामध्ये कायमस्वरूपी हजर राहावे, गावातील सर्व विधवा महिलांना शासकीय योजना मिळाव्या या म ागण्यासाठी उपोषण सुरू करण्यात आले होते सदर मागण्यांच्या संदर्भात जोतीराम आवताडे यांच्यासोबत माळशिरसचे तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी चर्चा करून आपल्या अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले होते. त्याचबरोबर फळवणी ग्रामपंचायतीच्या वतीने ग्राम सभेचे आयोजन करून सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत स्मशानभूमी बांधण्यासाठी जागा उपलब्ध करणे तसेच ग्रामसुरक्षा यंत्रणेसाठी लागणारा निधी जमा करून ग्राम सुरक्षा यंत्रणा सुरू करण्याचे ठोस आश्वासन दिल्याने माळशिरस तालुक्याचे भाजपचे नेते के.के पाटील, माजी सरपंच सचिन पाटील, सरपंच माधुरी सुरवसे तसेच सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत जोतीराम आवताडे यांनी आपले उपोषण मागे घेतले.

फळवणी हायस्कूल मधील विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मागील काही महिन्यांमध्ये आवताडे यांनी उपोषण केल्याने त्या अडचणी दूर झाल्या होत्या .त्याचबरोबर गावाच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या स्मशानभूमी,ग्राम सुरक्षा यंत्रणा, वन्य प्राणी, बिबट्या तरस आदींचा बंदोबस्त करण्यासाठी चार दिवस उपोषण करून यावर उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाला दखल घेणे भाग पाडले असल्याने जोतीराम आवताडे यांच्या सामाजिक कार्याचे ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे.




### जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा

इच्छाशक्ती असल्यास कुठलेही कार्य यशस्वीरीत्या पूर्ण होते, याचा प्रत्यय फळवणी ग्रामस्थांना आला असून जोतीराम आवताडे यांनी कोणत्याही पक्ष, संघटना यांचा आधार न घेता, कोणी नावे ठेवेल याचा विचार न करता एकट्याने सलग दोनवेळा उपोषण करून ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एक्सप्रेस गाड्यांना जेऊर येथे थांबा मिळणार

### रश्मी बागल यांच्या निवेदनाची पालकमंत्र्यांकडून दखल

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**

जेऊर स्टेशनवर प्रवाशांच्या सोयीसाठी हुतात्मा इंटरसिटी एक्स्प्रेस व उद्यान एक्स्प्रेसना थांबा देण्याबाबत भाजप प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. याची सकारात्मक दखल घेत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना जेऊर रेल्वे स्टेशन येथे एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा अशा स्वरुपाचे पत्र देऊन मागणी केली आहे.



रेल्वे मंत्री आश्विन वैष्णव यांना दिलेल्या पत्रात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे की, जेऊर हे सोलापूर रेल्वे विभागातील मध्य रेल्वेचे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन आहे. करमाळा तालुकाच नाही, तर आसपासच्या इतर जिल्ह्यांतील तालुक्यांमधूनही प्रवासी या रेल्वे स्टेशनवरुन पुणे, मुंबई, दौंड, इंदोर, अहमदनगर, बेंगळुरू, चेन्नई, तिरुपती बालाजी इत्यादी ठिकाणी नागरिक, विद्यार्थी रोज ये-जा करतात. प्रवाशांच्या सोयीसाठी व भाजपा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांची मागणी लक्षात घेऊन जेऊर येथे हुतात्मा इंटरसिटी एक्स्प्रेस व उद्यान एक्स्प्रेस या दोन्ही गाड्यांना थांबा देण्याबाबत संबंधित विभागास लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत असे पत्रात नमूद केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा अजित दळवी तलवारबाजीत जिल्ह्यात प्रथम

**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**



येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थी अजिंक्य लक्ष्मण दळवी यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, तालुका क्रीडा अधिकारी सत्येज जाधव, नदीम शेख, राज्य तलवारबाजी संघटनेचे कार्याध्यक्ष प्रकाश काटुळे, जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव दीपक शिंदे उपस्थित होते. १९ वर्ष वयोगटामध्ये करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामधील अकरावीचा खेळाडू अजिंक्य लक्ष्मण दळवी यांने इप्पी या प्रकारात प्रथम क्रमांक तर श्रीकांत शिवाजी वीर या खेळाडूने सेबर प्रकारात चौथा क्रमांक पटकावला. या यशस्वी खेळाडूंना महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण शिक्षक प्रा. राम काळे व नागनाथ बोळगे यांचे मार्गदर्शन लाभले. या विजयी खेळाडूंचे अभिनंदन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.



### रूपालीताई इंगळे यांच्या स्मृतीनिमित्त चुंगीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**अक्कलकोट, दि. ३० ऑगस्ट-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष नगरसेवक महेश इंगळे यांच्या सुविद्य पत्नी रूपालीताई इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रथमेश इंगळे व फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजू माने यांच्या उपस्थितीत चुंगी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. चुंगीतील फत्तेसिंह शिक्षण संस्था संचलित श्रीमती धोंडूबाई स्वामी प्रशालेतील विद्यार्थ्यांना बाळासाहेब एकबोटे मित्र परिवाराच्या वतीने ६०० वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा.शिवशरण अचलेर, स्विमिंग ग्रुपचे सदस्य बाळासाहेब एकबोटे, तानाजीराव चव्हाण, अमर शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष संतोष जाधव, सुधाकर गोंडाळ, आनंदराव माने, रामचंद्र समाणे, अंकुश केत, श्रीकांत झिपरे, सुनील पवार, बाळासाहेब एकबोटे, चंद्रकांत सोनटक्के, मुख्याध्यापक के. एस. गायकवाड उपस्थित होते.



### नरेगांतर्गत फळबाग लागवड योजना

**सांगोला, दि. ३० ऑगस्ट-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (नरेगा) अंतर्गत पात्र असलेले व फळबाग लागवडीसाठी इच्छुक असलेले शेतकरी बांधवांनी फळबाग लागवडीचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे. या योजनेंतर्गत डाळिंब, आंबा, पेरू, सीताफळ, लिंबू, नारळ, आवळा, चिंच, केळी ड्रॅगन फ्रूट, द्राक्षे आदी फळपिकांची लागवड करता येते. जॉबकार्डधारक व अल्पभूधारक म्हणजे ज्यांची एकूण जमीनधारणा २.० हे किंवा त्यापेक्षा कमी आहे असे शेतकरी या योजनेंतर्गत पात्र आहेत. अनुसूचित जाती व अनु. जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधव २.० हे पेक्षा जास्त जमीन धारणा असले तरी लाभ घेऊ शकतील. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ७/१२ उतारा, ८ अ उतारा, आधारकार्ड, बँक पासबुक, जॉब कार्ड व ग्रामसभेचा लाभार्थी निवडीचा ठराव इत्यादी कागदपत्रांसह अर्ज कृषी सहाय्यक किंवा मंडळ कृषी अधिकारी कार्यालयास सादर करावा. अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

### प्रा. मुक्ता काटवटे यांना पीएच.डी प्रदान

**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**



करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या प्रा. मुक्ता प्रल्हाद काटवटे-महाडिक यांना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरने भूगोल विषयातून पीएच. डी पदवी प्रदान केली. त्यांनी हॉर्टिकल्चर फार्मिंग इन सदर्न पुणे डिस्ट्रिक्ट अ जिओग्राफिकल ॲनालिसिस या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. यासाठी त्यांना डॉ. अर्जुन ननवरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी त्यांचा सत्कार केला. संस्थाध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.

## जीवन गौरव पुरस्काराने झालो कृतार्थ

### डॉ. बोधले महाराज : दलित महासंघाचे पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**



धामणगावच्या माणकोजी महाराज बोधले यांच्या उच्च कुळात जन्म घेतला, ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. तशीच गोष्ट आज दलित महासंघाचा जीवनगौरव पुरस्कार मिळाल्यावर झाली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मी कीर्तनातून सेवा करीत आहे त्यासाठी कृतार्थ झालो, अशी भावना ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी व्यक्त केली.

दलित महासंघाच्यावतीने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय दलितमित्र गौरव पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी आ. राजेंद्र राऊत, दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे, आ. राजेंद्र राऊत, तहसीलदार एफ. आर. शेख, अप्पर तहसीलदार वृषाली केसकर, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काकासाहेब गुंड, शाहू, फुले, आंबेडकर, अण्णा भाऊ विचार मंचचे अध्यक्ष श्रीधर कांबळे, बांधकाम समितीचे माजी सभापती ज्योतिर्लिंग कसबे, रिपाइंचे अण्णासाहेब लोंढे, उद्योजक शशांक गुगळे, भीम टायगर संघटनेचे शंकर वाघमारे आदी उपस्थित होते.

बोधले महाराज म्हणाले, ज्याप्रमाणे संतांनी समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा संदेश दिला. त्याच पद्धतीने येथील दलित महासंघ कार्य करीत आहे. दलित आणि इतर समाजामध्ये समन्वय साधण्याचे मोठे काम दलित महासंघ करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे म्हणाले, बार्शीत सामाजिक बांधिलकी जपणारी माणसे खूप आहेत, म्हणूनच मागील १६ वर्षांपासून दिवसेंदिवस या पुरस्काराची उंची वाढत आहे, असे सांगितले. जातीच्या पलीकडे जाऊन बार्शीच्या महासंघाचे कार्य कौतुकास्पद आहे, असेही त्यांनी सांगितले.

आ. राऊत म्हणाले, सध्या सर्व जाती-धर्मांनी एकत्र राहण्याचे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारचा वादविवाद न करता समाजात एकसंधपणे वागणे देशासाठी महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले. विकास कामांमध्ये बार्शी नेहमीच अग्रेसर राहिली असून यापुढे देखील या सभागृहासारखे आणखी एक सभागृह आपण उभा करु, असे आश्वासन देखील आमदार राऊत यांनी यावेळी दिले.

श्रीधर कांबळे यांनीदेखील आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक सुनील अवघडे यांनी केले. सूत्रसंचालन नीता देव यांनी तर आभार शहराध्यक्ष संदीप आलाट यांनी मानले. कार्यक्रमासाठी जिल्हा उपाध्यक्ष निलेश खुडे, तालुकाध्यक्ष संगीतराव शिंदे, माढा तालुकाध्यक्ष बाळासाहेब देवकुळे, संतोष बगाडे, अमृत आलाट, सत्यजित खलसे, सचिन क्षीरसागर, महादेव भिसे, युवराज शिंदे, अमोल कांबळे, हरिश्चंद्र कांबळे, चाणक्य आलाट, विधान आलाट, सारंग अवघडे, सुनील कांबळे, राम नवले यांनी परिश्रम घेतले.

#### पुरस्कार मिळालेले मान्यवर

जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ कीर्तनकार जयवंत बोधले महाराज यांना प्रदान करण्यात आला तर तहसीलदार एफ. आर. शेख, डॉ. अजित आव्हाड, कविता मोहिते, शिवशक्ती बँकेचे संचालक राजेंद्र मोरे, उद्योजक नितीन देशमुख, जिजाऊ गुरुकुलचे संभाजी घाडगे, माऊली उद्योग समूहाचे अमृत राऊत, विक्रम सावळे, उडान फाउंडेशन सामाजिक संघटना, विजय साळुंखे, ॲड. अविनाश गायकवाड, किरण तौर, विजय निलाखे, श्याम थोरात, ॲड. अमोल अलाट, रवींनद मोहिते, आनंद कांबळे, नीता देव यांच्यासह दहावी आणि बारावीमध्ये उज्ज्वल यश संपादन केलेल्या समर्थ नेटके, प्रगती नेटके, प्रतीक्षा चव्हाण, ओंकार नेटके, प्रिया अवघडे, सुरभी कसबे यांचा सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## करकंबमध्ये काटवटे, पवार, माने यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३० ऑगस्ट-**



करकंब गावच्या लेकीचं झाड, जागर स्वच्छता अभियान, एकलव्य अभ्यासिका टीम, शिक्षक, शिक्षिका परिवाराच्यावतीने धनश्री पांडुरंग काटवटे यांची जलसंपदा विभागात अनुरेखकपदी, प्रदीप सुभाष पवार यांची पवित्र पोर्टलद्वारे प्राथमिक शिक्षकपदी तर साईराज हणमंत माने यांची अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई येथे इंजिनीयर म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी लेकीच झाड संकल्पक ज्ञानेश्वर दुधाणे,, दत्तात्रय खंदारे, पोपट कापसे, अंजली टकले, सुवर्णा टकले यांनी मनोगत व्यक्त केले. सत्कारमूर्तींनी स्पर्धा परीक्षेत सहजासहजी यश मिळवणे शक्य नसले तरी अपार कष्ट, जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर यश प्राप्त होते. यासाठी नवनवीन ॲडव्हान्स अभ्यासक्रमाची माहिती घेतली पाहिजे, असे सांगितले. आभार रमेश खारे यांनी मानले.

#### बहिण-भावाला एकदम नोकरी

जलसंपदा विभागात अनुरेखकपदी निवड झालेल्या धनश्री काटवटे व पवित्र पोर्टलद्वारे प्राथमिक शिक्षकपदी निवड झालेले प्रदीप पवार हे दोन्ही उमेदवार निवृत्त माध्यमिक शिक्षक सुभाष पवार व प्रा.शिक्षिका शोभा पवार यांची मुले आहेत. एकाचवेळी बहीण, भावास यश मिळाल्याने हा दुग्धशर्करा योग काटवटे व पवार कुटुंबीयांत आला आहे. प्राथमिक शिक्षिका मंगल माने यांचा मुलगा साईराज हणमंत माने यांचीही अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई येथे इंजिनीयर म्हणून निवड झाली आहे.

## अविनाश पाटील यांचे ६ सप्टेंबरपासून लंडन येथे तबला वादन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० ऑगस्ट-**



युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांच्या सोलो तबला वादनाच्या मैफिली युके देशातील लंडन, न्यू कॅसल, रेडिंग तसेच आयर्लंड देशातील डबलीन येथे होणार आहेत. येथील विविध महाराष्ट्र मंडळे, सांकृतिक संस्था यांच्यातर्फे ६ सप्टेंबर ते १६ सप्टेंबरदरम्यान त्यांच्या तबला वादनाच्या मैफिलींचे आयोजन करण्यात आले आहे.

पाटील यांनी तबला वादनात संगीत अलंकार पदवी व एम. ए. तबला वादनात पुणे विद्यापीठचे सुवर्णपदक प्राप्त केले आहे. पाटील यांनी तबल्याची तालीम त्यांचे वडील कलापिनी संगीत विद्यालयाचे संचालक व प्रसिद्ध तबला वादक गुरु पं. प्रमोद पाटील व दिल्ली घराण्याचे ख्यातनाम तबला वादक पं. उमेश मोघे यांच्याकडे घेतली आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर प्रचंड संघर्ष व कष्ट करुन त्यांनी स्व-कर्तृत्वावर स्व:ताची वेगळी ओळख संगीत विश्वात निर्माण केली आहे. पद्मभूषण पं. राजन-साजन मिश्रा यांच्यासारख्या जागतिक ख्यातीच्या अनेक कलाकारांना त्यांनी साथ संगत केली आहे. तसेच सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशात व परदेशातील रसिकांची त्यांनी दाद मिळवली आहे.

## रायगावमध्ये बागल गट सोडून कार्यकर्त्यांचा पाटील गटात प्रवेश





**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० ऑगस्ट-**

रायगाव (ता. करमाळा) येथील बागल गटाचे विश्वासू समर्थक माजी ग्रामपंचायत सदस्य डॉ. चंद्रकांत गोरे, चेअरमन देविदास बरडे, नानासाहेब शिंदे, भरत गोरे यांनी माजी आ. नारायणआबा पाटील यांच्या कार्यावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीमध्ये प्रवेश केला.

माजी आ. नारायणआबा पाटील यांच्या हस्ते शाल श्रीफळ फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नवनाथ कोळेकर, डॉ. बंडगर, चंद्रशेखर पाटील, संतोष वाघमोडे आदी उपस्थित होते.

## संत सेना महाराजांकडून धर्माची संजीवनी : प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३० ऑगस्ट-**



संत सेना हे फार मोठे संत होते. त्यांनी समाजाला विश्वात्मक धर्माची संजीवनी दिल्याचे मत प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी व्यक्त केले.

नाभिक समाज बांधवांच्या वतीने अणदूर येथे संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजू महाबोले, सुभाष महाबोले, सोमेश सोमवंशी, आप्पा महाबोले, राजू महाबोले, तुकाराम महाबोले, राम घोडके, राम हांडगे, नारायण महाबोले, तानाजी महाबोले, मंगलबाई भुरे उपस्थित होते. प्रा. डॉ. बिराजदार म्हणाले की, दुभंगत गेलेल्या समाजाला विश्वात्मक धर्माची शिकवण देऊन अध्यात्मिक संजीवनी संत सेना महाराजांनी दिली. बहुजन समाजाच्या जीवनात सुख समृद्धी आणणारे राष्ट्रसंत सेना महाराजांनी वर्णव्यवस्था, जातीभेद, अज्ञान, रूढी, परंपरा, विषमता, अंधश्रद्धा, कर्मकांड, व्यसनाधिनता, वाईट प्रवृत्तीमुळे माणुसकी हरवलेल्या समाजाला आध्यात्मिक संजीवनी सेना महाराजांनी दिली. वत्सला नगर, अणदूर येथे नाभिक समाज बांधवांच्या वतीने पुण्यतिथीनिमित्त कीर्तन, भजन, जागरण व गुलाल उधळून सेना महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून जयघोष करीत अभिवादन करण्यात आले. नाभिक समाजाचे अध्यक्ष प्रकाश भुरे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक सिद्राम सोमवसे यांनी सूत्रसंचालन भारत महाबोले व आभार अमोल महाबोले यांनी मानले. राजकुमार गाढवे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मधुकर माने, संतोष क्षीरसागर, पांडू महाबोले, अनिल महाबोले, सदाशिव भुरे, अप्पू भुरे, स्वप्निल भुरे, गोविंद गवळी, प्रवीण महाबोले, संजू महाबोले, प्रभाकर सोमवंशी, प्रदीप आगलावे, राजू मोटे, मनोज मोठे, पंडित माने, नंदू सुरवसे, सुधाकर भुरे, मधुकर भुरे, चंद्रकांत मुळे, विशाल महाबोले यांनी परिश्रम घेतले.

## बार्शीत भाकप, आयटक कामगार केंद्राचा मोर्चा

### शासनाविरोधात संताप; जातनिहाय जनगणना करा, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा उठवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० ऑगस्ट-**



बार्शीत आज शुक्रवारी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कामगार केंद्र, सोलापूर जिल्हा कौन्सिल यांच्यावतीने शासनाविरोधात तहसील कार्यालयावर कामगार व जनतेच्या मागण्या घेऊन कॉ. तानाजी ठोंबरे व कॉ. ए. बी. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला.

जात निहाय जनगणना करा, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा उठवा, सर्व कामगारांना २५ हजार रुपये किमान वेतन करा, कष्टकरी वर्गाला साठ वर्षांनंतर पाच हजार रुपये पेन्शन द्या, कामगार भरती करा, बेरोजगारी संपवा, महागाई कमी करा, कंत्राटी करुन खासगीकरण थांबवा, स्मार्ट मीटर मागे घ्या, महिला मुली यांच्यावरील अत्याचार तातडीने थांबवा, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यास जबाबदारांवर कारवाई करा, मागेल त्याला रेशन द्या, शिक्षणाचा बाजार थांबवा, शेतीमालाला हमीभाव द्या, स्वामीनाथन आयोग लागू करा, भ्रष्टाचार थांबवा, या सोबतच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे एकोणीस महिन्यांची वेतन यावलकर समिती व थकीत वेतन द्या, बांधकाम कामगारांना भांड्यांचा संच द्या, नोंदणी पूर्ववत करा, शिष्यवृत्ती द्या, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिसर यांना वाढीव वेतन द्या, पूर्ण वेळ करा, बोनस, रजा, गणवेश द्या, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न आहेत. या मागण्या पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी कॉ. ए. बी. कुलकर्णी, लहू आगलावे, प्रविण मस्तूद, रशीद इनामदार, अनिरुद्ध नखाते, भारती मस्तुद, भारत भोसले, शौकत शेख, बालाजी शितोळे, भारत चव्हाण, आनंद धोत्रे, आनंद गुरव, शीतल करडे, सुवर्ण नंदाने, उषा कांबळे, सागर पालखे, साईनाथ झांबरे, पांडुरंग यादव, दत्ता कदम, अजित लंगडे, राजेश ढगे, बाळू शिंदे, धनाजी पवार, अब्बास बागवान आदी उपस्थित होते.

#### कष्टकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष

राज्यात देशात महिला सुरक्षित नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळतो आहे. रोज वृत्तपत्रांमध्ये गुन्ह्यांच्या बातम्या येत आहेत. अशावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री हे फोटो काढत मिरवत फिरत आहेत. कष्टकरी वर्गाच्या मागण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. बेरोजगारांची भरती केली जात नाही. मनुस्मृतींना अनुसरून हे सरकार काम करीत आहे. त्यामुळेच राज्यात ही परिस्थिती निर्माण झाली आहे, असे प्रा. तानाजी ठोंबरे यांनी सांगितले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दारफळच्या जि.प. शाळेच्या मुलींची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

बारामती येथे दि.३० व ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर कालावधीत होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनियर १४ वर्षाखालील स्पर्धेसाठी आसावरी घुटे, प्रगती जाधव, सिध्दी हावळे सानिका भोयटे यांची धाराशिव जिल्हा Tennikoit रिंग टेनिस संघात निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची जिल्हा संघात निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक बिभीषण पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भैरवनाथ जाधव, पोलीस पाटील सचिन जाधव, धर्मराज जाधव, सरपंच रवींद्र जाधव यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.





## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### भोसले हायस्कूलची नवभारत साक्षरता अभियान प्रसार व प्रचार फेरी संपन्न

**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या वतीने भारत सरकार द्वारा नवभारत साक्षरता अभियानांतर्गत भारतीय एकही नागरिक असाक्षर न राहता शिक्षणा पासून वंचित राहू नये या करिता सदर अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानाचा शालेय परिसरात प्रसार व प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीत प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख, राजेंद्र आंबेवाडीकर, डॉ. विनोद आंबेवाडीकर, शेषनाथ वाघ, श्यामराव राठोड, दिपक केंगार, शिवाजी भोसले शिक्षक शिक्षकेत्तर विद्यार्थी उपस्थित होते.



### नागूर येथे अखंड हरीनाम सप्ताह संपन्न

**लोहारा, दि.३० ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील नागूर येथे दरवर्षी प्रमाणे श्रावण महिण्यात हनुमान मंदिरात दि.२१ ते २७ ऑगस्ट या कालावधीत संपन्न झाला. या काळात चोवीस तास विणा मंदिरात उभा असतो. ज्ञानेश्वर ग्रंथाचे वाचन, महिलांचे भजन, प्रवचन आणि किर्तन यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील सर्व समाजातील लोक आवडीने एकत्र येऊन हा अखंड हरीनाम सप्ताह उभा करतात यात अनेक हभप. महाराजांच्या प्रवचन आणि किर्तनाच्या श्रवणाचा आनंद गावातील जनतेला मिळतो. हभप. धनंजय रोंगे पाटील रिंगणीकर महाराज, इंद्रजीत चव्हाण महाराज कास्तीकर, हभप. लिंबराज चव्हाण महाराज कास्तीकर, हभप. ज्ञानेश्वर कोळी महाराज कास्तीकर, हभप. पाटील महाराज रिंगणीकर, हभप. श्रीहरी ढेरे महाराज यांच्या किर्तन सेवेचा तर हभप. बाबासाहेब विठ्ठलराव जाधव, हभप. यशवंत विलास चंदनशिवे, हभप. सुभाष मारूती क्षीरसागर यांच्या प्रवचनाचा लाभ सहा दिवस ग्रामस्थांनी घेतला.



### ढगपिंपरी शाळेत विद्यार्थ्यांना मोफत शालेय किटचे वाटप

**परंडा, दि.३० ऑगस्ट -**

सेवा सहयोग फाउंडेशन यांच्या सहयोगाने आज दि.२९ ऑगस्ट रोजी जि.प. प्राथमिक शाळा ढगपिंपरी येथे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय किट वाटप करण्यात आले. यावेळी विशेष सहकार्य लाभलेले असे सिध्देश्वर कोळी व शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय सोनवणे यांच्या प्रयत्नाने हे शालेय किट मुलांना प्राप्त झाले. हे किट वाटप करताना उपस्थित सरपंच प्रज्ञा काळे, शालेय समितीचे अध्यक्ष शरद पाटील, बप्पा काळे, रविंद्र पाटील, बाळासाहेब भंडार, अनिता चिपडे, संगीता ठोगे, नम्रता हांडे, वंदना इंगळे, गणेश वाघमोडे, पुजा कात्रे, सुजाता कुंभार, डॉ. सोमनाथ शिंदे, संभाजी काळे, बिभीषण तरंगे, समाधान नागणे, बप्पा हावळे शाळेतील विद्यार्थी व गावातील समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.



### तावशीगडच्या सरपंचपदी महेश घोटाळे यांची निवड

**लोहारा, दि.३० ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील तावशीगड ग्राम पंचायतीच्या सरपंच पदी महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. तावशीगड ग्राम पंचायतीच्या कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी महेश घोटाळे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी ग्रामपंचायत तावशीगडचे ग्रामसेवक, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तेर येथे मुलींना लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण

**तेर, दि.३० ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि.प. कन्या प्रशालेत लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. मुलींना स्वसंरक्षण करता येणे गरजेचे आहे. या दृष्टीने तेर येथील जि.प. कन्या प्राथमिक शाळेत मुलींना तेर ग्रामपंचायतचे सदस्य नवनाथ पसारे यांच्या मार्गदर्शनाखाली लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.

## तुळजाभवानी मंदीर परिसर ५४ कोटींची विकास कामांचा आरंभ होणार



### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी मंदीर परिसर विकास कामांचा आराखडा प्रक्रिया अंतिम टप्यात असुन यातील मंदिर परिसरातील विकास कामांचा निविधा १५ सप्टेबंर पर्यत बऱ्यापैकी कामाचा निविदा अंतिम होवुन वर्क ऑर्डर देण्यासाठी आपण प्रयत्नशिल राहणार असल्याची माहीती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना पाटील पुढे म्हणाले कि, कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदीर पपरिसरातील विकास कामांसाठी ५४ कोटी रुपयांच्या काही निविदा प्रसिध्द झाल्या असुन काही होणार आहेत. पुरातत्व विभागाने या कामांची निविदा प्रसिद्ध केली आहे. एक ते दोन कामे तांत्रिक अडचणीमुळे थांबले असुन येत्या आठ दिवसात या तांत्रिक अडचणी दुर केल्या जाणार आहेत. तिर्थक्षेत्र तुळजापूर विकास कामांना अंदाजे १५०० कोटी रुपये खर्च येणार आहे. यासाठी केंद्र राज्य सीआरएस फंड तसेच आमदार, खासदार यांच्याकडे निधी मागितला जाणार आहे. तुळजाभवानी मंदीर या राज्य संरक्षित मंदिराच्या जतन व दुरुस्तीसाठी विविध कामे करण्यात येणार असुन यामुळे मंदिराचे पुरातन रूप कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भूसंपादन कमी असणार आहे तिर्थक्षेत्र तुळजापूर येथील रिंगरोडच्या अंर्तबाह्य भागा लगत विकास कामे करण्याचे नियोजन आहे.

तुळजाभवानी मंदिरातील जतन व दुरुस्ती कामाचे ६ भाग म्हणजे टप्पे करण्यात आले आहेत. त्यात पहिला भागात भुयारी मार्ग, यज्ञ मंडप, सभा मंडप व भवानी शंकर मंदीर सभा मंडप व भवानी शंकर मंदीर जतन व दुरुस्ती हे ११ कोटी ३६ लाखांचे काम आहे. दुसरा भागात कार्यलयीन, प्रशासकीय इमारत, पोलीस चौकी, खुला प्रेक्षक मंच, गोमूख तीर्थ, दत्त मंदीर, मातंगी मंदीर, कल्लोळ तीर्थ, निंबाळकर महाद्वार, मार्तंड ऋषी मंदीर, टोळ भैरव मंदीर, दीप माळ, शिवाजी महाद्वार व ओवऱ्या, खंडोबा व यमाई मंदीर जतन व दुरुस्ती अशी १२ कोटी ९ लाखांची कामे आहेत.

तिसरा भागात तुकोजीबुवा मठाकडील दगडी संरक्षण भिंत, दगडी फरशी, आवश्यकतेनुसार दगडी पायऱ्या, महावस्त्र अर्पण केंद्र जतन व दुरुस्ती अशी ९ कोटी ४६ लाखांची कामे आहेत. चौथा भागात महंत तुकोजी बुवा मठावरील ओव्हऱ्या, आराध्य खोलीवरील ओव्हऱ्या, आराध्य खोली दगडी फरशी जतन व दुरुस्ती अशी ९ कोटी ४५ लाखांची कामे आहेत. पाचवा भागात मुख्य प्रवेशद्वार व जिजामाता महाद्वार जतन व दुरुस्तीचे ७ कोटी २१ लाख आणि सहावा भागात लिफ्ट व रॅम्पचे ४ कोटी २५ लाख असे ५३ कोटी ८४ लाख ४७ हजार ७ रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. सर्व कामे पुरात्तव विभागाच्या मार्गदर्शनाखाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ तसेच शहरात चार व नँशनल, हायवे वर चार अशा आठ कमानी उभारल्या जाणार आहेत.

सध्या श्री तुळजाभवानी मंदीर गाभारा सोनेरी करण्याचा विषय स्थगित करण्यात आला आहे. यावेळी नितीन काळे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सचिन रोचकरी कृषी उत्पन्न बाजार समिति सभापती सचिन पाटील, शांताराम पेंदे उपस्थितीत होते.

## सिद्धेश्वर विद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या कष्टातून साकारली परसबाग



**तभा वृत्तसेवा**
**खसगी, दि.३० ऑगस्ट**

सिद्धेश्वर विद्यालयातील इको फ्रेंडली क्लब आणि राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने शाळेतील वीस गुंठे जमिनीवरती वांगी, टोमॅटो, हिरवी मिरची, फुलकोबी, गवार, भेंडी, पालक, मेथी, चुका अशा विविध पालेभाज्या आणि फळभाज्याची लागवड करून या परसबागेतील पालेभाज्या आणि फळभाज्यांचा इयत्ता पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात याच भाजीपाल्याचा वापर करण्यात येणार आहे.

त्यामुळे सर्वच भाजीपाला सहजतेने उपलब्ध होणार असून विद्यार्थ्यांना सकस आणि पोषण आहार या माध्यमातून मिळणार आहे. वीस गुंठे वरती पालेभाज्या आणि फळभाज्या लागवड करणारी तालुक्यातील अशी एकमेव शाळा आहे.

त्यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे सर्व विद्यार्थी आणि इको फ्रेंडली क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सर्वांनी स्वकष्टाने हा परस्पर तयार केला आहे. त्यावेळी मुख्याध्यापक माशाळे, राष्ट्रीय हरित सेनेचे गुरव, प्राध्यापक काडरामे, प्राध्यापक डाळिंबे, किरण अंकुशे, कांबळे जी.एन., सेवक एस.पी. पुजारी विष्णू गायकवाड सुरेश जमादार यांचे सहकार्य लाभले.

ही सर्व रोपे डाळिंब येतील रोपवाटेकडून आणण्यात आले. लाकडी बरोबरच खत व्यवस्थापन म्हणून भेसळ डोस देण्यात आले आहे.

## तेरणा महाविद्यालयास उत्कृष्ट क्रिडा महाविद्यालयाचा पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

धाराशिव येथील तेरणा महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षीचा उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय सन्मान प्राप्त झाला.

त्याचबरोबर महाविद्यालयातील मयुरी पवार आणि जान्हवी पेठे यांना खो-खो या क्रीडा प्रकारात अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलक यांचा सत्कार केला.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.जी.जी. हिडगे, डॉ. तुळशीराम उकिरडे, प्रा. बालाजी काकडे तसेच बालाजी निचळ उपस्थित होते.

## डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालय, आय.एल.एस. विधी महाविद्यालय पुणे, स्विस एड आणि युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने निर्धार समानतेचा प्रकल्पा अंतर्गत दि.२९ व ३० ऑगस्ट रोजी कौटुंबिक हिंसाचार व त्या संदर्भातील कायदा आणि विविध शासकीय अशासकीय यंत्रणांच्या भूमिका या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवसाची सुरुवात अमोल काळे (प्रशिक्षक) यांनी स्त्रियांवरील हिंसाचार समजून घेताना. या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणा दरम्यान अमोल काळे यांनी हिंसा म्हणजे काय? हिंसेचे प्रकार, ओळख व सत्ता आणि महिलांवरील हिंसा यांचा परस्पर संबंध याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवसाची सुरुवात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वसंत यादव यांनी कौटुंबिक हिंसाचार आणि न्यायालयीन प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. सखी वन स्टॉप सेंटरच्या ॲड. प्रियंका जाधव यांनी सेंटर बद्दल माहिती दिली. त्यानंतर ॲड. परिक्रमा खोत यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारे कायदे आणि त्यांच्या तरतुदी विविध कृती प्रकाराद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

भुजंग भोसले जिल्हा संरक्षण अधिकारी महिला व बालविकास विभाग यांनी कौटुंबिक हिंसाचारातील जिल्हा संरक्षण अधिकारी यांची कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. कायला क्रिष्णमूर्ती, प्रा.डॉ. संजय आंबेकर, प्रा. कैलास शिकारे, दिपाली चव्हाण, सुरज व्हरकट, श्रुती जाधव व बालाजी गुरव यांनी कार्यशाळेचे व्यवस्थापनाच्या नियोजनाची महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. तसेच निर्धार समानतेच्या प्रकल्पातील ४५ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती नोंदवली.

## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये राधा-कृष्ण वेशभूषा स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

श्रीपतराव भोसले हायस्कूल मध्ये कृष्ण जन्माष्टमी व गोपाल काला या दिनाचे औचित्य साधून पाचवी विभागामध्ये राधा व कृष्ण या वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये इ. पाचवीच्या वर्गातून १७० मुलामुलींनी उस्फुर्त सहभाग नोंदवला सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत आकर्षक अशा वेशभूषा केल्या होत्या.

विद्यार्थ्यांच्या वेशभुषा पाहून संस्था सरचिटणीस प्रेमा सुधीर पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील व प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुअ पी.एन.



कदम, डी.ए. देशमुख, पर्यवेक्षिका बी.बी. गुंड, एन.एन. गोरे आदी मान्यवरांनी सर्व मुला मुलींचे मनापासून कोडकौतुक केले व सर्वांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली वेशभुषा स्पर्धा संपन्न झाल्या.

## 'टिस'च्या विद्यार्थ्यांची नळदुर्ग महाविद्यालयात अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० ऑगस्ट**

नळदुर्ग कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यास भेट घेतली.

या कार्यक्रमांमध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील डॉ. आशिष नवनीत यांनी अभ्यास भेटीच्या पाठीमागचा उद्देश विद्यार्थ्यांना सांगितला. त्यानंतर डॉ.निलेश शेरे यांनी अशा अभ्यास भेटी मधुन विचारांची देवाण-घेवाण होते आणि यातुनच विद्यार्थी प्रगल्भ होतो. तसेच या अभ्यास गटामध्ये उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, राजस्थान दिल्ली,



केरळ या राज्यातील विद्यार्थ्यांशी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैचारिक संवाद करता आला. त्यामुळे निश्चितच याचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांना होईल, असे मत व्यक्त केले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थ्यांनी विविध विषयावर चर्चा केली. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांनी अभ्यास गटाचे प्रमुख डॉ. आशिष नवनीत व त्यांच्यासोबत आलेले सर्व विद्यार्थी यांचा सत्कार केला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. बालाजी क्षिरसागर, प्रा. राजेंद्र म्हमाने, रमेश सर्जे यांनी परिश्रम घेतले.

## एसबीआय बँकेसमोर मोटरसायकलींमुळे वाहतुकीची कोंडी

### परंडा न.पा., पोलीस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० ऑगस्ट**

शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या एसबीआय बँकेसमोर रस्त्यावर मोटरसायकली लावल्याने वाहतुकीची कोंडी दररोज होत असल्याने याचा व्यापाऱ्यासह सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करीत मंडई चौक ते डीसीसी बँके पर्यंतचा मार्ग मोठी कसरत करीत काढावा लागत आहे. नगरपालिका व पोलीस प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन रस्त्यावर उभी असलेल्या मोटरसायकल चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी



नागरिकातून केली जात आहे.

एसबीआय बँक ही बाजार पेठेतून इतरत्र हलवावे यासाठी लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला होता मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. ही बँक तालुक्याची असल्याने या बँकेचे मोठ्या प्रमाणावर खातेदार असुन ते बँकेच्या व्यवहारासाठी दररोज येतात. शहराच्या मध्यभागी बँक आहे या बँकेत येणाऱ्यांना आपली वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने खातेदार बँकेच्या समोर अंरुद असलेल्या रस्त्यावर मोटारसायकली उभी करून बँकेत जातात त्यांच्या मोटरसायकलीमुळे रस्त्यावरून दुसरी वाहने जाताना वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे व्यापाऱ्यांसह सर्वसामान्य नागरीकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एखाद्या मोटरसायकलला धक्का लागून पडल्यास त्याचे झालेले नुकसानी भरपाई द्यावे लागते म्हणून इतर वाहन चालक जोरजोराने होर्न वाजवत असतात त्याचा मोठा त्रास सर्व सामान्य नागरिकांना व व्यापाऱ्यांना होतो.

मात्र बँकेत बसलेल्या अधिकाऱ्यांवर त्याचा काहीच फरक पडत नाही. नगरपालीका प्रशासण व पोलीस प्रशासणाने रस्त्यावर उभी असलेल्या मोटारसायकल चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरीकांतुन केली जात आहे.

## तेर येथे शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३० ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त २५० वह्यांचे तेर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेतील विद्यार्थीनीना वाटत करण्यात आले.

यावेळी अमोल कस्तुरे, लक्ष्मण राऊत, सुरेश माने, हरिदास झांबरे, काकासाहेब राऊत, जनकराज जगदाळे, सोमनाथ यादव, दत्ता सुरवसे, बबलू राऊत, संदीप राऊत यांच्यासह तेर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### नवोदय विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन गुरुवार दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरती वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे,टी.ए.काळे, एच.जी.जाधव यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यानंतर अरहंता वाघमारे या विद्यार्थिनीने सर्व विद्यार्थ्यांना खेळाच्या संदर्भात प्रतिज्ञा दिली. रोहन माळी सातवी ब या विद्यार्थ्याने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या विषयी माहिती सांगितली. इंग्रजी विषयाचे अध्यापक टी.ए.काळे यांनी मेजर ध्यानचंद यांचे बालपण, त्यांचे कुटुंब हॉकी प्रेमी कसे होते, त्यांच्या नेतृत्व गुण व देशप्रेमी कशी होते याविषयी आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना दररोज प्रामाणिकपणे व्यायाम करण्याचे आवाहन केले. त्यानंतर विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे म्हणाले की, मेजर ध्यानचंद यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून खेळाची आराधना करून भारत देशाला ऑलिंपिकमध्ये तीन वेळा सुवर्णपदके मिळवून दिले हे सांगून तुम्हीही प्रामाणिकपणे खेळ खेळून देशाचे नाव उज्वल करून आपले आरोग्य उत्तम ठेवण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

### ऑनलाईन प्लेसमेंट न झालेल्या उमेदवारांचा डाटा सादर करण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी सुरु असलेले महास्वयंम वेब पोर्टल तांत्रिक अडचणीमुळे वापरण्यात व्यत्यय येत आहे.यामुळे ज्या कार्यालयाने ऑफलाईनरित्या नियुक्त्या देवून रुजू झाले आहेत. परंतु त्यांचे प्लेसमेंट ऑनलाईन टाकण्यात आलेले नाही,अशा उमेदवारांचा डेटा जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाच्या ईमेलवरून गुगल फॉर्मद्वारे जिल्हयातील सर्व विभागांनी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.ज्या कार्यालयाने ऑफलाईनरित्या नियुक्त्या देवून उमेदवार रुजू झाले आहेत.त्या कार्यालयाने दोन फॉरमॅटमधील माहितीसह आस्थापनेवरील जबाबदार कर्मचारी यांना डाटा एन्ट्री करण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास कार्यालयास पाठवावेत.त्यामुळे सर्व डेटा ऑनलाइन करण्यास मदत होईल या डेटाद्वारे उमेदवारांना पुढील महिन्यापासून डीबीटी करण्यास मदत होणार आहे. यासाठी ३१ ऑगस्ट ही अंतिम दिनांक असल्याने आहे.ही प्रक्रिया राबविण्यासाठी शनिवारी व रविवारी सुद्धा कार्यालय चालू असल्याने संबंधितांना माहितीसह पाठवण्याचे आवाहन ही जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाने केले आहे.



### पार्वती प्रशालेत सखी-सावित्री समिती स्थापन

**जळकोट, दि.३० ऑगस्ट -**

पार्वती कन्या प्रशाला येथे सखी-सावित्री समिती स्थापन करण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश कदम यांच्या हस्ते तक्रार पेटी बसवण्यात आली. तसेच सखी सावित्री समितीमधील सदस्यांचे मुख्याध्यापिका व शिक्षकवृंदांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना समितीच्या कार्याबद्दल माहिती देण्यात आली. महिला सुरक्षा, गुडटच व बॅडटच, चिरागप, पॅनिकबटन,ई-बॉक्स याबद्दल प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी व शिक्षक यांनी सविस्तर माहिती सांगितली. शाळा स्तरावर निर्माण झालेल्या समस्यांचे समाधान व तक्रारीचे निवारण करणे, वेळोवेळी मुला-मुलींना मार्गदर्शन करणे इ. कामे समितीने करावयाची असल्याचे सांगण्यात आले. सखी-सावित्री समितीमध्ये अध्यक्ष कदम महेश बंकटराव, कदम दीपा महेश (ग्रामपंचायत सदस्यातून सदस्या), सोमवंशी लता जयेंद्र मुख्याध्यापिका (सचिव), होटकर एस.एच. महिला शि.प्र. (सदस्य), कस्तुरबाई कारभारी (समुपदेशक), ढगे, वैद्यकीय आरोग्य सेविका (सदस्या), सुचिता करबस पुजारी (सदस्या) चव्हाण देविदास हरिदास (पोलीस पाटील सदस्य), कदम सरिता बलभीम महिला पालक प्रतिनिधी (सदस्या), हिंडोळे सुष्मिता लक्ष्मण विद्यार्थी प्रतिनिधी (सदस्य) वैष्णवी कमलाकर बिराजदार, विद्यार्थी प्रतिनिधी (सदस्य), माळी श्रेयस नागनाथ, विद्यार्थी प्रतिनिधी (सदस्य), पटेल फैद इरफान, विद्यार्थी प्रतिनिधी (सदस्य), सगर प्रांजल प्रशांत, विद्यार्थी प्रतिनिधी (सदस्य) यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरे व्ही. एस.यांनी केले. आभार प्रदर्शन अभिमन्यू कदम यांनी मानले.



### वाशी येथे ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता

**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

वाशी येथील वास्कर महाराजांच्या विठ्ठल मंदिर मध्ये श्रावण मासानिमित्त पारायण दररोज सकाळी ठेवले होते. पारायणासाठी दररोज १५० भाविक वाचन करीत होते. तर सायंकाळी १०० भाविक भक्त नाम जप मध्ये सहभागी होते. तसेच दररोज रात्री ९ ते १२ पर्यंत कीर्तन चालू होते. त्याचा दररोज शेकडो भाविक लाभ घेत होते यावेळी वास्कर महाराजांचे वंशज ह.भ.प एकनाथ महाराज वास्कर, ह.भ.प गोपाळ महाराज, ह.भ.प प्रभू महाराज, ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज व ह.भ.प विठ्ठल महाराज वास्कर यांचे सुश्राव्य कीर्तनाचा लाभ वाशीकरांना मिळाला बाहेर गावाहून आलेल्या महाराजांचे ही कीर्तन झाले. एकंदरीत संपूर्ण महिना दररोज किर्तनाने वाशिकर मंत्र मुग्ध २९ तारीखेस ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात टाळ, मृदुंग सह भक्तगन तसेच महिला मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या. अखेर शनिवारी समाप्ती करण्यात येऊन भाविक भक्तांना महाप्रसाद देऊन सांगता करण्यात आली. एकंदरीत संपूर्ण श्रावण महिना भक्तांना विठ्ठल नामस्मरणाने व श्रवणाने भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मोठे समाधान देणारे

## तेरणा धरणाचे आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते जलपूजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट-**

यावर्षी सुरूवातीपासूनच चांगला पाऊस झाला. ऑगस्ट महिन्यातच तेरणा धरण भरून ओसंडून वाहू लागल्याने धरण परिसरातील शेतकर्यांच्या चेहर्यावर आनंद दिसू लागला आहे. त्यांचा हा आनंद आपल्यासाठी समाधानकारक व प्रेरणा देणारा आहे, अशी भावना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली.

शुक्रवार, ३० ऑगस्ट रोजी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते तेरणा धरणाचे जलपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, तेरणा कालवा दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून महायुती सरकारने त्यासाठी तीन कोटींचा निधी दिला आहे. डावा कालवा दुरुस्तीचे काम जवळपास ७० टक्के पूर्ण झाले आहे. रब्बी हंगामात या कालव्याद्वारे डिसेंबरमध्ये पहिल्या आवर्तनाचे पाणी सोडण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना अधिकार्यांना दिल्या आहेत. तर उजव्या कालव्याच्या साफसफाईचे काम काही प्रमाणात झाले आहे. पावसामुळे कालव्यात पाणी असल्याने दुरुस्तीचे काम सध्या बंद असले तरी हे काम देखील लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. यावेळी शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.



माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी सिंचन क्षेत्रात केलेल्या कामामुळेच जिल्ह्यातील उसाच्या क्षेत्रात मोठी वाढ होऊन साखर कारखान्यांची संख्या एक वरून चौदा वर गेली आहे. याव्यतिरिक्त गूळ पावडर कारखान्यांची संख्याही तेरावर पोहोंचली आहे. एकेकाळी जिल्ह्यात एकच कारखाना असताना सुद्धा परराज्यातून ऊस आणावा लागत होता, आज ही परिस्थिती एवढी बदलली आहे की, जिल्ह्यात ३० कारखान्यांना पुरेल एवढा ऊस उपलब्ध होत आहे. ही हरितक्रांती केवळ डॉक्टर साहेबांनी केलेल्या कामामुळेच शक्य झाली आहे. आज शेतकऱ्यांच्या घरात त्यामाध्यमातून जवळपास दीड हजार कोटींपेक्षा अधिकची रक्कम दरवर्षी येत आहे.

**बंद पाईपलाईनद्वारे पाणी आणण्याचा प्रकल्प**

तेरणा धरणातून बंद पाईपलाईनद्वारे थेट शेतात पाणीपुरवठा करण्याचा पथदर्शी प्रकल्प आपण आणला होता. राज्यात पहिल्यांदाच अशा प्रकारचा प्रकल्प राबविला असल्याने यात काही तांत्रिक दोष आढळल्याने योजना बंद आहे. मात्र आगामी काळात या पथदर्शी प्रकल्पातील तांत्रिक दोष दूर करून योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आपले प्रयत्न सुरु राहणार असल्याचे आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अनंतराव देशमुख, झुंबर बोडके, निहाल काझी, तानाजी गायकवाड, बाळासाहेब खांडेकर, नरहरी बडवे महाराज, गुणवंत देशमुख, नीलकंठ पाटील, ज्ञानेश्वर जंगाले, दत्ताभाऊ तिवारी, बबलू मोमीन, रमेश भोसले, अमोल पाटील, नासेर शेख, एजाज काझी, विलास रसाळ, कुमार लोमटे, शिव सुरवसे यांच्यासह तेरणा धरण परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत रवींद्र हायस्कूल प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३० ऑगस्ट-**

येथिल रवींद्र हायस्कुलच्या १४ व १७ वयोगटाच्या संघांनी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. भूम येथे शंकरराव पाटील महाविद्यालयातील इनडोअर हॉल मध्ये संपन्न झालेल्या कबड्डी स्पर्धेत रवींद्र हायस्कुलच्या दोन्ही संघानी बाजी मारली. या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दोन्ही विजेत्या संघांचा शाळेच्या उपमुख्याध्यापिका एस.व्ही.सूळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. १७ वर्षे वयोगटात यशोदीप कांबळे, सुजय कुटे, आदित्य जगदाळे, ओम पाटील, मयूर पाटील, मोहित माने, साहिल सुरवसे, सुमित गरड, पृथ्वीराज पवार, विनायक आहेर, देवराज येळमकर, गणेश चौगुले, अमित राऊत तर १४ वर्षे वयोगटाच्या संघात अनुष माने, पार्थ साठे, वैभव पवार, विजय माने, गणेश पवार, अविनाश जगदाळे, सयाजी जगदाळे, कुंदन माने, समर्थ खारगे, वेदांत काशीद, समर्थ बकरे यांचा समावेश होता.

यावेळी स्पर्धेचे संयोजक अमर सुपेकर, विजयकुमार पाटील, एस पी महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक एम.जी.सूर्यवंशी हे हजर होते. या स्पर्धेचे उदघाटन संचालक डी. डी.बोराडे, मुरलीधर काटे, प्राचार्य संतोष शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पंच म्हणून प्रा.एम. जी.सूर्यवंशी, निलेश व्हरे, अक्षय बाराते, स्वप्नील सुपेकर, हर्षद बाबर, अमित सुपेकर, कुणाल भारती, जगदीश काळे, स्वराज मुळे यांनी काम पाहिले. विजयी संघाना अमर सुपेकर व कमलाकर डोंबाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

### त्रिशताब्दी वर्षानिमित्त अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राचा प्रसार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट-**

शहारातील महाजन महाविद्यालयातील प्रमोद महाजन सभागृहात देवगिरी प्रांत संस्कार भारती जिल्हा शाखेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त अहिल्यादेवी यांच्या जीवन चरित्राचा प्रसार नवीन पिढीस माहिती व्हावी त्यांनी केलेल्या सामाजिक, आध्यात्मिक, विहिरीचे, नदी घाटाचा जीर्णोध्दार यासारख्या असंख्य उदाहरणार्थ व्याख्या नातून देवगिरी प्रांत



अध्यक्षा प्रा. स्नेहल पाठक यांनी व्याख्यानमालेचे पुष्प गुंफले.

प्रथम प्रतिमा पुजन करुन मान्यवरांचा संस्कार भारतीच्या पदाधिका राच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी व्याख्यान मालेचे अध्यक्ष शेषाद्री डांगे, प्रमुख अतिथी कमलाकर पाटील, कमलताई नलावडे, प्राचार्य प्रशांत चौधरी उपस्थित होते.

सदर व्याख्यानामाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आजोळ चोराखळीकर, यमगरवाडी येथे घेण्यात आले.

यशस्वीतेसाठी संस्कार भारती जिल्हा सचिव प्रभाकर चोराखळीकर, देवगिरी प्रांत लोककला विधा प्रमुख डॉ.सतिश महामुनी, जिल्हाकार्याध्यक्ष अनिल ढगे, कोषप्रमुख अरविंद पाटील, धनंजय कुलकर्णी, पद्माकर मोकाशे, दिपक महामुनी, अविनाश घट, संजय बोंदर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मुअ मनीष देशपांडे आर्य चाणक्य प्रशालेचे व महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन डॉ. कृष्णा तेरकर आभार सुरेश वाघमारे यांनी मानले.

### अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मंगरुळ येथे भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.३० ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०४व्या जयंती निमित्त २८ ऑगस्ट रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली. मातंगनगर येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन करून मिरवणुकीस सुरवात करण्यात आली. यावेळी परिसरातील मातंग समाजातील माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते गावातील मातंग बांधवांच्या वतीने बाहेरून आलेल्यांना



जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती या मिरवणुकीसाठी किसन पारधे, अनुप गवळी, राजकुमार पारधे, भीमसेन पारधे, किरण पारधे दत्ता पारधे, आकाश पारधे, दिपक पारधे, सोमनाथ कांबळे, अमोल पारधे, उमेश पारधे, लक्ष्मण पारधे, ओंकार पारधे, अनिकेत गवळी, किशोर डोलारे, अभि पारधे, हणमंत वाघमारे, येडबा सगट, रामेश्वर सगट, दादा पारधे, सुजित पारधे, संजय पारधे यांच्यासह मातंग बॉईज व मातंग समाजातील युवकांनी परिश्रम घेतले कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी व मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनही दक्ष होते.

### तुळजापुरातील निबंध स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**तुळजापूर, दि.३० ऑगस्ट-**

संस्कार भारती तुळजापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय निबंध स्पर्धेमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष प्रफुल्ल कुमार शेटे, स्पर्धा संयोजक संजयकुमार बोंदर यांनी केले आहे.

तुळजापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर श्री शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या शालेय आणि महाविद्यालयीन निबंध स्पर्धेसाठी अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्र या विषयावर निबंध लेखन करण्यासाठी उपस्थित राहावे. शालेय गटासाठी शब्द मर्यादा ७०० शब्द व महाविद्यालयीन गटासाठी १००० शब्द अशी मर्यादा आहे. तालुक्यातून विजेत्यांना प्रथम द्वितीय तृतीय सन्मानचिन्ह प्रमाणपत्र असे बक्षीस दिले जाणार आहे. तालुक्यातील सर्व मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी आपल्या शाळा व महाविद्यालयांमधून निबंध लेखनासाठी विद्यार्थी पाठवावेत असे आवाहन या निमित्ताने संयोजकांनी केले आहे. निबंध वक्तृत्व स्पर्धा नियोजन समितीमध्ये संयोजक म्हणून संजयकुमार बोंदर, महेश कुलकर्णी, प्रसाद महामुनी, नागेश धर्माधिकारी, रोहित भोसले, डॉ.सतीश महामुनी यांचा समावेश आहे. तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

### उमरगा नगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी जुनी पेंशन योजनेसाठी संपावर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० ऑगस्ट-**

उमरगा नगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी जुनी पेंशन योजना लागू करा, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (नविन) तात्काळ अंमलबजावणी करा. तसेच नगरपरिषद / नगरपंचायती राज्य संवर्ग अधिकारी व नगरपरिषद/नगरपंचायती आस्थापनेवरील स्थानिक कर्मचाऱ्यांच्या मुलभूत समस्या व मागण्यांवर कार्यवाही करा या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या माध्यमातून नगरपालिकेसमोर गुरुवारपासून बेमुदत संपावर बसले आहेत.

महाराष्ट्र शासन अंतर्गत नगरपरिषद, नगरपंचायती मधील राज्य संवर्ग ३,००० अधिकारी व स्थानिक ६०,००० वर कर्मचारी यांना अद्याप राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच, जुनी पेंशन योजना बंद झाल्याने दि.२९ ऑगस्ट पासून बेमुदत संप सुरू केला आहे.

नगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या



समस्या यामध्ये जुनी पेंशन योजना लागु करणे किंवा नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करणे, राज्य संवर्ग पदे सातवा वेतन आयोग अधिसुचनेत पदांचा समावेश करुन सेवार्थ नंबर मिळणे, सहायक अनुदान एक महिना आगाऊ देणे,

सातव्या वेतन आयोग फरक व मागील महागाई फरक रक्कम मिळणे, राज्य संवर्ग सर्वसाधारण बदल्यांमधील जाचक अटी वगळणे, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १०, २०, ३०, लागु करणे, पदोन्नतीतील कोट्यातील रिक्त पद तात्काळ भरणे, मुख्याधिकारी विभागीय स्पर्धा परिक्षा तात्काळ एमपीएससी मार्फत घेणे,

सेवानिवृत्ती उपदान व रजा रोखीकरण शासनाकडे भरणे व स्थानिक कर्मचारी यांना निवृत्ती रक्कमांचे अनुदान मिळणे, धारणाधिकार सह नियुक्ती व बदली पदस्थापना करणे, या समस्या वर उपाययोजनात करा, आदी मागणयासांठी आंदोलन सुरु करण्यात आले आहे. यावेळी ए.बी.सानप, कृष्णा काळे, महेश शिंदे, राजन वाघमारे, तुलसीदास वराडे, विशाल माळी, रमेश हजारे, इरफान शेख, व्यंकट क्षिरसागर, माधव नगराळे, असलम शेख, बाळू माने, राजेंद्र कटके आदी कर्मचारी बेमुदत संपावर बसले आहेत

# अर्चना पाटील यांच्यावतीने निघालेल्या श्री सप्तश्रृंगी देवी दर्शन यात्रेत महिलांनी लुटला मनमुराद आनंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट-**

श्रावणमासा निमित्त आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे यावर्षीही महिलांसाठी जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्यावतीने देवस्थान दर्शन यात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री सप्तश्रृंगी गड, रेणुका माता, आणि नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे दर्शन सहल आयोजित करण्यात आली. यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इतक्या मोठ्या संख्येत महिला असलेली ट्रिप सुरू झाली आणि प्रत्येक महिलेने मनमुराद आनंद लुटला.

सदरील दर्शन यात्रा दि.२८ रोजी प्रतिष्ठान भवन, धाराशिव येथून पहाटे निघाली होती रात्रीपर्यंत या महिलांनी या सहलीचा आनंद लुटला. धाराशिव शहरातील छत्रपति शिवाजी महाराज



यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सहलीची सुरुवात झाली. यावेळी धाराशिव तालुक्यातील प्रमुख पदाधीकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. श्रावण महिन्यानिमित्त यावेळी धाराशिव तालुक्यातील भाविक महिलांना श्री सप्तश्रृंगी गड वणी, चांदवड येथील रेणुका माता, नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे दर्शनाची संधी उपलब्ध करून दिली होती. यासाठी ८ बसेसची सोय करण्यात आली.

श्री सप्तश्रृंगी गड नाशिक पासुन ६० कि.मी अंतरावर कळवण तालुक्यात स्थित आहे. देवीचे मंदिर ७ शिखरांनी वेढलेले असुन समुद्रसपाटीपासुन ४६५९ फुट उंचीवर आहे. यास महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी ''अर्ध शक्तीपीठ'' मानले जाते. देवीची आठ फुट उंचीची मुर्ती पाषाणात कोरलेली असुन दोन्ही बाजुस ९ असे एकुण १८ हात व त्यात विविध आयुधे असलेली आहे. या ठिकाणी माता भगवती निवास करते. ''सप्तश्रृंग'' हया शब्दाचा अर्थ ''सातशिखरे'' असा आहे. सप्तश्रृंगीदेवीचे दर्शन झाल्यानंतर शेकडो महिलांसह नजीकच्या चांदवड येथील रेणुका माता, नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथेही घेतले. यामुळे महिलांचा आनंद द्विगुणित झाला.

या सहली निमित्त महिलांची हितगुज करताना अर्चना पाटील म्हणाल्या की देवदर्शन एक निमित्त आहे, देवदर्शन आपण आपल्या गावात सुद्धा करू शकतो. पण महिलांना कधीही घराच्या बाहेर पडून स्वतःसाठी आनंद घेता येत नाही. त्यामुळे मी दरवर्षी अशा सहलीचे नियोजन करते. आणि त्यानंतर महिलांमधून ज्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया येतात, त्या जो आनंद घेतात, त्यामुळे माझा स्वतःचा आनंद द्विगुणीत होऊन पुन्हा पुन्हा अशा सहलीचे नियोजन करावे असे माझ्या मनामध्ये सतत येत राहते. यंदाच्या या ट्रीपला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आम्ही स्वतः सुद्धा इतक्या मोठ्या प्रमाणात महिला घेतल्यामुळे सांशक होतो की महिला कसा प्रतिसाद देतील. परंतु महिलांनी इतका सुंदर या सहलीचा आनंद लुटला कुठल्याही प्रकारे गालबोट न लागता निर्विघ्नपणे महिलांना सुखरूप घरी सोडल्याचे माझ्या मनामध्ये समाधान आहे. अशीच सहल तुळजापूर तालुक्यातील महिलांसाठी दर्शन सहल आज ३० सप्टेंबर रोजी निघणार असून त्यालाही असाच उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा.

या सहलीमध्ये सहभागी झालेल्या महिलांनीही अर्चनाताईच्या माध्यमातून आपल्याला सहलीचा पहिल्यांदाच आनंद घेता आला व आपण सहल कशी असते हे पाहिल्याचे जाणीवपूर्वक नमूद केले. यावेळी देवस्थान प्रशासनाच्या वतीने अर्चनाताई पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

# भटक्या व विमुक्तांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा : राऊत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३० ऑगस्ट -**

रोजच्या जगण्यासाठी हातावर पोट घेवून संघर्ष करणाऱ्या भटक्या विमुक्तांना शासकीय योजनाचा लाभ मिळावा, त्यांना रहिवासी प्रमाणपत्रा सोबतच इतर सर्व प्रमाणपत्र मिळावेत यासाठी शासन- प्रशासन प्रयत्नशिल आहे. तसेच भटक्या विमुक्तांना शासकीय योजनांचा लाभ मिळून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांचा सहभाग खूप महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

आज महाराजस्व अभियानातर्गंत भटक्या व विमुक्त जातीतील लोकांना जातीचे प्रमाणपत्र, रहीवासी व शिधापत्रिका वाटपाचा कार्यक्रम त्यांच्या हस्ते तहसिल कार्यालयात झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, भटके व विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे, पारंपारिक वेशभुषा परिधान केलेले वासुदेव, गारुडी, मसणजोगी, जोशी, गोंधळी, पारधी, भोई समाजातील नागरिक आदीची उपस्थिती होती.



भटक्या विमुक्त जातीतील लोकाकडे कुठलाच पुरावा नसतो. त्यामुळे त्यांना रहीवासी प्रमाणपत्र मिळत नाही. म्हणून ते योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता असते. यासाठी मागील काळात जिल्ह्यातील बळीरामपूर, चौफाळा, लोहा तालुक्यातील किवळा येथे शिबिराचे आयोजन करुन अनेक लोकांना रहीवासी प्रमाणपत्रासोबत इतर आवश्यक प्रमाणपत्राचे वितरण केले आहे. प्रमाणपत्राच्या उपलब्धीमुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. त्यांना सर्व प्रकारचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांच्यापर्यत पोहोचून ते उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. आजच्या कार्यक्रमातही महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही भटक्या विमुक्तांना आवश्यक ते प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तत्परतेने केली याबाबतही जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी कौतुक केले. तसेच सेवा देताना अधिकारी कर्मचारी यांनी माणुसकी आणि कर्तव्याच्या भावनेतून नागरिकांची प्राध्यान्याने कामे करण्यावर भर द्यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच भटक्या विमुक्त जातीतील सुशिक्षित तरुणांनी समाजातील इतर लोकांची पुढे आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते २८ शिधापत्रिका, दोन उत्पनाचे प्रमाणपत्र, दोन जणांना रहीवासी प्रमाणपत्र, ९ जणांना जात प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आहे.

भटक्या विमुक्त जातीतील लोकांना विविध योजनांचा लाभ मिळावा त्यांना समाजाच्या प्रवाहात येता यावे यासाठी विविध प्रमाणपत्र उपलब्ध होण्यासाठी भटके व विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे यांनी खूप परिश्रम घेतले. याबाबत प्रशासनाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसिलदार संजय वारकड यांनी मनोगत व्यक्त केली.

## संक्षिप्त वृत्त

### अनिल जोशी हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड** -श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय विष्णुपुरी येथील प्रयोगशाळा परिचर या पदावरील अनिल दिगंबरराव जोशी हे दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी नियतवयोमानाने प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. विष्णुपुरी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील प्रयोगशाळा परिचर या पदावर दिनांक २८ मे १९९२ रोजी नियुक्ती झाली होती नियतवयोमानाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. सदरील सेवानिवृत्ती बद्दल महाविद्यालयाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते्. त्यांच्या या सेवानिवृत्ती बद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. मनीष कोकरे, महाविद्यालयीन अधिकारी, कर्मचारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व संघटना यांनी त्यांचे पुढील आयुष्य हे निरोगी व आनंदी राहावेत यासाठी शुभेच्छा दिल्या.



### पिंपळगाव नि. येथील वादग्रस्त मोकळी जागा प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत

**नांदेड** -भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी नांदेड तालुक्यातील मौ. पिंपळगाव नि. येथील सदर वादग्रस्त मोकळी जागा २८ ऑगस्ट रोजी २४ वाजेपासून ते ३१ ऑगस्ट २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे.तसेच मौ. पिंपळगाव नि. येथील वादग्रस्त जागेवरुन गावामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देशीत पोलीस अधीक्षक नांदेड यांना दिले आहेत. संबंधीतास नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणिबाणीचे प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये एकतर्फी आदेश २८ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत.

### नांदेड जिल्ह्यात ड्रोन कॅमेऱ्यासह मानवनिर्मित वस्तू उडविण्यास प्रतिबंध

**नांदेड** -जिल्ह्यात, शहरात, गुरुद्वारा परिसर व श्री गुरु गोविंदसिंहजी विमानतळाच्या परिसरात २ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून ते ४ सप्टेंबर २०२४ च्या मध्यरात्रीपर्यत ड्रोन उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार ड्रोन कॅमेरा, ड्रोन सदृश्य वस्तु व हवेत उडविल्या जाणाऱ्या मानवनिर्मित वस्तू उडविण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रतिबंध केले आहे. ४ सप्टेंबर २०२४ रोजी अतिमहत्वाच्या व्यक्ती हे नांदेड जिल्हा येथील कार्यक्रमासाठी येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्यादृष्टिने जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी याबाबतचा आदेश निर्गमीत केला आहे.

### जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग आणि रायफल शुटिंग स्पर्धेतील खेळाडूंना बक्षीस वितरण

**नांदेड** -क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय ग्रामीण व शहरी बॉक्सिंग स्पर्धा आणि रायफल शूटिंग स्पर्धा नुकतीच येथील विक्रांत खेडकर स्पोर्ट्स अकॅडमी उर्वशी घाट, वजिराबाद, नांदेड येथे संपन्न झाली. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी स्किल डेव्हलपमेंट भारत सरकारचे महाराष्ट्र प्रतिनिधी इंजि. अनिरुद्ध शिरसाट, कल्याणकर कोचिंग क्लासेसचे संचालक डॉ. नागेश कल्याणकर, एमजीएमचे पवार, माजी सैनिक सातपुते, डॉ. रमेश नांदेडकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.नांदेड जिल्ह्यातून व शहरी भागातून फार मोठ्या संख्येने विविध तालुक्यातून व शाळेतून बॉक्सिंग आणि रायफल शुटिंगचे खेळाडू सहभागी झाले होते. बक्षीस वितरण नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी नांदेड जिल्हा हौशी बॉक्सिंग संघटनेचे सचिव आंतरराष्ट्रीय खेळाडू पोलीस कमांडो ट्रेनर विक्रांत खेडकर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ज्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. प्रथम व द्वितीय खेळाडूंना सुवर्ण व रौप्य पदक देऊन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते व अकॅडमीचे व्यवस्थापक प्रमुख माधवदास स्वामी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी भारतामधील खेळाबद्दलची माहिती सांगून भविष्यात नांदेडमधून सुद्धा दर्जेदार खेळाडू तयार होण्याच्या अपेक्षा व्यक्त केल्या. त्या दृष्टीने खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि खेळाचा प्रसार व प्रचाराकरिता सहकार्य करण्याची भावना व्यक्त करत सर्व खेळाडूंचे कौतुक केले. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता क्रीडा अधिकारी शिरशीकर, म.न.पा.चे पुरुषोत्तम, अझर तसेच ज्यांनी ही स्पर्धा अथक परिश्रम करून यशस्वी केली असे पंच व जजेस रेफ्री म्हणून विक्रांत खेडकर, सत्यपाल हनवते, लक्ष्मीकांत हाटकर, नागराज चावरे, अरविंद सावंत, मुंजाजी खराणे, सचिन पंडित, प्रांजल कुलकर्णी, कृष्णा भास्कर, प्रदीप वाघमारे, रुपेश भावरे, पवन धोंडगे, सुमेश, योगेश कटारे, रूपाली ऑस्टुरकर यांनी सहकार्य केले.

### अण्णाभाऊचे क्रांतिकारी विचार आत्मसात करा : विजय रणखांब

**नांदेड** -डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य विज्ञानवादी असून ते साहित्य वाचून तरुणांनी अण्णाभाऊंचे क्रांतिकारी विचार आत्मसात केले पाहिजे,आणि शिक्षणाची कास धरली पाहिजे जो शिक्षण घेईल तोच समोर जाणार आहे. आपल्याला शिक्षणा शिवाय तरुणोपाय नाहीच . अण्णाभाऊंनी सांगितले आहे जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव, म्हणून आपण अज्ञानावर, अंधश्रद्धेवर , आळसावर व गुलामगिरी करणाऱ्या विचारावर घाव घातलाच पाहिजे असे मार्गदर्शन लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी लोहा तालुक्यातील आंबेसांगवी येथे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त बोलताना व्यक्त केले आहे.

# हदगाव पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,३० ऑगस्ट -**

हदगाव शहरात झालेल्या घरफोडीच्या घटनेतील चोरट्यांना आतापर्यंत अटक न झाल्याकारणाने त्या चोरट्यांचे मनोबल वाढल्याचे दिसून येत आहेत. पोलीस प्रशासन आपला तपासकाम योग्य दिशेने करत आहेत की नाही याबाबत साशंकता निर्माण होत असून ही घरफोडीची मालिका कधी थांबणार असा प्रश्न हदगावकर उपस्थित करत आहेत. यावेळी वरिष्ठ अधिकारी यांनी एक पथक नेमून तांत्रिकदृष्ट्या या घटनांचा तपास लावून चोरट्यांना जेरबंद करावे अशी ही मागणी होत आहे.

घरफोडीच्या एकूण घटने पैकी तीन घटनेत प्रथमदर्शनी एक बाब साम्य असून चोरट्यांनी ज्यांचे घर कुलूप बंद आहेत त्याच ठिकाणी आपली मोहीम फत्ते केली असून यात स्थानिकांचा सहभागाशिवाय हे शक्यच नसल्याचे सुद्धा यावेळी बोलले जात असून रात्रीच्या वेळेस गस्त घालण्याची प्रक्रिया अत्यंत चोखपणे पार पडण्यात यावी अशी मागणी होत आहे. गस्त घालत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी हे मद्यप्रशान करून असतात असा आरोप फिर्यादी मधून होत आहे. हदगाव शहरात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काही वर्षांपूर्वी लोकसहभागातून शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. त्यानंतर काही महिन्यांनी त्या कॅमेराकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे या कॅमेरापैकी काही बंद अवस्थेत आहेत तर काही कॅमेऱ्यांची अद्यात व्यक्तींनी मोडतोड करून त्या कॅमेरेचे तोंड खाली रोडवर करण्यात आले होते. हे कॅमेरे शासनाने व्यवस्थित रित्या चालू करावे अशी ही मागणी नागरिकांकडून होत आहे जेणेकरून भविष्यात होणाऱ्या अप्रिय घटना टाळता सुद्धा येतील व पोलीस प्रशासनाच्या तपास कमी याचा फायदा होऊन चोरटे ,समाजकंटक, भांडखोर व्यक्ती ,अवैधरित्या वाहनांद्वारे होणारे वाहतूक करणाऱ्यांवरती आळा बसेल असे मत नागरीक व्यक्त करीत आहेत.

# लेकीच्या वाढदिवसानिमित्त वडिलांचे रक्तदान..! राम गाढे पाटील यांनी पुरविला लेकीचा बालहट्ट...

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३० ऑगस्ट -**

येथील आनंदनगर भागातील फायनान्शियल डव्हायझर राम गाढे पाटील यांनी त्यांच्या सहा वर्षीय कन्येच्या वाढदिवसानिमित्ताने लेकीच्या बालहट्टा खातीर रक्तदान करून वाढदिवस साजरा केला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की राम गाढे पाटील यांची कन्या अयोध्या हिचा २७ ऑगस्ट रोजी वाढदिवस होता त्या वाढदिवसानिमित्त कुमारी आयोध्या हिने वडिलांकडे इच्छा व्यक्त केली ती म्हणजे ती म्हणाली की,पप्पा तुम्ही पण माझ्या बर्थडेला ला रक्तदान करा ना,लोकं कसे राजकारणी लोकांच्या बर्थडे ला ला रक्तदान करतात. तिच्या या बाल मनाच्या इच्छे खातीर वडिलांनी मुलगी अयोध्या च्या जन्मदिवशी जिजाऊ ब्लड बँक शिवाजीनगर येथे स्वतः आपल्या कन्या समवेत जाऊन रक्तदान करून समाजापुढे एक नवा पांयडा प्रस्थापित केला आहे



**मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनीही केले होते अयोध्या हिचे कौतुक ...!**

मनोज जरांगे पाटील यांच्या जूलै महिन्यातील नांदेड दौऱ्या दरम्यान कू. आयोध्या हिने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर कविता सादर करून अनेक उपस्थितांची मन जिंकली होती तिच्या या कवितेबद्दल मनोज जरांगे पाटील यांनी तिची जवळ घेऊन स्तुती केली होती व व या चिमुकलेच्या हुशारीचे तोंडभरून कौतुक केलं होतं.

# प्रफुल्लनगर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**भोकर,३० ऑगस्ट -**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती दि.२९ ऑगस्ट २०२४ गुरुवारी मोठ्या थाटामाटात ढोल ताशाच्या गजरात तैलचित्राची मिरवणूक काढून आण्णाभाऊ साठे यांच्या गाण्यावर ठेका धरून नव तरुणांनी उत्साहात व शांततेत जयंती साजरी करण्यात आली. प्रफूल्लनगर जयंती मंडळाकडून उत्कृष्ट नियोजन केले,प्रथम सत्रात प्रफुल्ल नगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर बहुजन नेते नागनाथराव घिसेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. दूपारी भोकर ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना अमोल बसवंते मित्रमंडळाकडून फळे वाटप करण्यात आले.यावेळी ओबीसीचे नागोराव शेंडगे बापू व युवा नेते शेख यूसुफ भाई गोटू क्षीरसागर घीसेवाड मित्र मंडळाचे निखिल हंकारे पत्रकार सिद्धार्थ जाधव उत्तम कसबे सुभाष नाईक संदीप नरवाडे रमेश गुंडेकर संदिप नरवाडे संदेश पोतरे साईनाथ बसवंते संभाजी बरगेवाड माधव यनूरवाड शूभम तेलंग नागेश मूळेकर गणेश पवळे साहेबराव वाहूळकर अर्जून जिनेवाड खंडू जिनेवाड अमोल सूर्यवंशी गंगा बसवंते अंकूश चव्हाण बालाजी बरगेवाड मूखीद शेख श्रीकांत नागठाणे आदी नवयुवक व महिला जयंती सोहळ्यात मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी बहुजन नेते नागनाथराव घिसेवाड यांनी आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व नागोराव बापू शेंडगे यांनी सुद्धा अण्णाभाऊनी जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव असे संदेश दिला त्यांची फकीरा ही कादंबरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली अण्णाभाऊ साठे यांचे परिवर्तनवादी विचार लहु फुले शाहू आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांची कास धरून आपण आपले जीवन अंगीकृत केले पाहिजे व त्यांच्या विचाराचे अनुकरण करून आपल्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून समाज परिवर्तन केले पाहिजे असे ते यावेळी म्हणाले.

# सिडकोत अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,३० ऑगस्ट -**



साहित्यरत्न, लोकशाहीर, डॉ. अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे सभागृह सिडको येथे दोन दिवसीय विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास दिग्गज आजी-माजी राजकीय व सामाजिक पदाधिकारी यांची उपस्थिती लाभणार असून प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम सुकमलाताई वाघमारे व संच आणि शाहिरी जलसा शाहीर गौतम पवार व संच यांचे सादरीकरण होणार आहे.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळ २०२४ च्या वतीने सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता धम्म ध्वजारोहण माजी नगरसेविका सौ. बेबीताई जनार्धन गुपीले यांच्या हस्ते होईल. त्यानंतर १० वाजता रक्तदान शिबिर तर सायंकाळी ५ वाजता प्रबोधन सभा होईल. त्या सभेचे उद्घाटक आनंदराव पाटील बोंडारकर जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट नांदेड दक्षिण यांच्या हस्ते होईल. यावेळी प्रमुख उपस्थिती मा.खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, मा.खा. हेमंत पाटील यांची असेल तर या सभेचे अध्यक्ष चंद्रकांत मेकाले, प्रमुख वक्ते माजी प्रा. दयाराम मस्के यांचे मार्गदर्शन होईल. तसेच दुपारी ३ वाजता प्रबोधन गीतांचा कार्यक्रम सुकमलाताई वाघमारे आणि संचाच्या वतीने होईल. दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मिरवणूक डॉ. अण्णा भाऊ साठे पुतळ्यापासून सिडको हडकोतील मुख्य रस्त्याने संभाजी चौक मार्गे अण्णाभाऊ साठे पुतळा येथे मिरवणूकीचा समारोप होईल. त्यानंतर लागलीच ४ वाजता शाहिरी जलसा शाहीर गौतम पवार आणि त्यांचा संच सादर करतील. त्यानंतर प्रबोधन सभा सायंकाळी ६ वाजता होईल या सभेचे उद्घाटन आ. मोहनराव हंबर्डे यांच्या हस्ते होईल. विशेष सत्कार मा.ना. कमलकिशोर कदम यांचा होईल यावेळी प्रमुख उपस्थिती आ. जितेश अंतापुरकर, सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे, विनय पाटील गिरडे यांची राहील. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव डोम्पले हे राहातील तर याकार्यक्रमाचे वक्ते गुणवंत काळे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यानंतर शाहिरी जलस सायंकाळी ४ वाजता शाहीर गौतम पवार व संच यांचे सादरीकरण आपणास ऐकावयास मिळणार असल्याची माहिती अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष सचिन वाघमारे व कार्याध्यक्ष पप्पू गायकवाड यांनी दिली. सदरील जयंती मंडळाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सुरेश कांबळे, आनंदा वाघमारे, पप्पू कांबळे, ईरवंत सूर्यकर, दशरथ कंधारे, अंबादास मेकाले, निवृत्ती गायकवाड, राजेश गायकवाड, बालाजी वाघमारे, सचिन मांजरमकर, संजय गायकवाड, स्वप्निल गव्हाणे, प्रा. बालाजी गवाले, नवनाथ कांबळे हे जयंती मंडळ संयोजन समिती परिश्रम घेत आहेत.

# लोहा नगर परिषद पथ विक्रेता समिती बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,३० ऑगस्ट -**

दीनदयाळ अंतोदय योजना राष्ट्रीय उपजिविका अभियान अंतर्गत लोहा नगर परिषद पथ विक्रेता सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घेण्यात आला. एकूण आठ जागांपैकी सहा जागा बिनविरोध निवडण्यात आल्या तर दोन जागा रिक्त राहिल्या. निवड झालेल्या उमेदवारांना सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा न. प. चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.





महाराष्ट्र उपजिविका संरक्षण समिती अर्थात लोहा नगर परिषद पथ विक्रेता समितीच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी आठ जागे करिता नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. दि. १६ ऑगस्ट रोजी नामांकन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी आठ पैकी सहा नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्राप्त झाले तर नामांकन अर्ज दाखल केले नसल्यामुळे दोन जागा रिक्त रहिल्या. निवड घोषणा होण्यापूर्वीच सर्व सहा उमेदवार बिनविरोध ठरले होते. सदरील निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी मुख्याधिकारी तथा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी काम पाहिले तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून न. प. चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांनी काम पाहिले. दि. ३० रोजी शुक्रवारी दुपारी नगर परिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांच्या हस्ते निर्वाचित उमेदवार दत्तात्रय कांबळे (अनुसूचित जाती), सय्यद सिकंदर (सर्वसाधारण), सोहेल मुस्तफा (सर्वसाधारण), सुमनबाई संगेवार (विकलांग महिला), युनूस नजीर शेख (इमाव), लक्ष्मीबाई नागेश्वर (सर्वसाधारण महिला) आदींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी पालिकेच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी मंजुषा जाधव यांनी यांची उपस्थिती होती.

लोहा नगर परिषदेचे माजी गटनेते व बांधकाम सभापती करिमभाई शेख यांनी या निवडणुकीत मोलाची भुमिका घेवून या निवडणुकीत पॅनल तयार करुन बिनविरोध कसे काढता येईल या विचाराने सर्वांशी चर्चा केली .पुढील काळात रस्त्यावरील पथ विक्रेतेना शासन स्तरावरुन योजना व आडीआडणी सोडवेल असे उमेदवाराची निवड करायची हा दृष्टिकोनात ठेऊन संघर्ष शहर विकास आघाडी पॅनल तयार केली आणि त्याच्यां नेतृत्वाखाली खेळीमेळीच्या वातावरणात निवडणुका पार पडली या निवडणुकीत करिमभाई शेख यांनी मोलाची भुमिका बजावली त्यामुळे या निवडणुकीत यश मिळावता आले.यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष व उपानगराध्यक्ष शरद पाटील पवार,खा.प्रताप पाटील यांचे खंदे समर्थक माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, रिपाईचे तालुका अध्यक्ष सुरेश महाबळे,खरेदी विक्री संघाचे संचालक भिमराव पाटील शिंदे,माजी नगरसेवक नबी शेख, माजी नगरसेवक केतन खिलारे,आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नागरिक गंगाधर महाबळे यांनी बिनविरोध पॅनल शुभेच्छा दिल्या बिनविरोध सदश्यने आभार मानले.

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल


## संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची शालेय योगा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ३० ऑगस्ट-**

पावसाळी क्रीडा स्पर्धेत तालुकास्तरावर आयोजित केलेल्या योगासनाच्या स्पर्धा नुकत्याच अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय अहमदपूर येथे संपन्न झाल्या.

या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाचा प्रणव काशिनाथ पुणे, वेदांत पुरुषोत्तम पंचारे, मुलींमधून सोनाक्षी संतोष दराडे, श्रेया प्रल्हाद करंडे या चार विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावरील योगा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



या स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या आहेत. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक मीर सय्यद यांनी मार्गदर्शन केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गणेश दादा हाके, सचिवा प्राचार्या रेखाताई तरडे, उपाध्यक्षा ॲड. मानसी हाके, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख मठपती, मुख्याध्यापिका आशा रोडगे, मुख्याध्यापिका मीना तोवर, बब्रुवान कलालेसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त



### आ.अमित देशमुख यांची नवीन कृषी उत्पन्न बाजार समिती कामाची पाहणी

**लातूर, दि. ३० ऑगस्ट-**

आमदार अमित देशमुख यांनी २९ ऑगस्ट रोजी बार्शी रस्त्यावर होत असलेल्या नवीन लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती कामाची आणि संपूर्ण परिसराची पाहणी केली. नवीन एमआयडीसी भागात जवळपास ११२ एकर जागेत नवीन लातुर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती उभारण्यात येत असून या ठिकाणी ८ ऑक्षन हॉल, रस्ते, आडत व्यापाऱ्यांसाठी बाहेरील बाजूने २७३ व्यापारी गाळे आणि आतील बाजूने जवळपास ११०० गाळे, सुसज्ज वाहन पार्किंग, बाजार समिती कार्यालय यासह अन्य आवश्यक सोयी सुविधा शेतकरी बांधव, आडत व्यापारी यांच्यासाठी उभारल्या जाणार आहेत. यावेळी बाजार समिती सभापती जगदिश बावणे, विलास सहकारी साखर कारखाना व्हा.चेअरमन रवींद्र काळे, ट्वेन्टी वन शुगर्स व्हा. चेअरमन विजय देशमुख, समद पटेल, डॉ. बालाजी वाघमारे, बालप्रसाद बिदादा, बळवंत पाटील, सचिन सूर्यवंशी यांच्यासह बाजार समितीचे सदस्य, अधिकारी उपस्थित होते.



### शारदा स्कूलमध्ये दहीहंडी उत्सव उत्साहात

**लातूर, दि. ३० ऑगस्ट-**

येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून मंगळवारी (दि.२७) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे रचत जल्लोषात दहीहंडी फोडली. श्रीकृष्ण जन्माष्टमी हा सण श्रावण महिन्याच्या अष्टमी तिथीला आणि दहीहंडीचा सण श्रावण महिन्याच्या नवमी तिथीला साजरा केला जातो. हा सण श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. दहीहंडीच्या परंपरेत, भगवान श्रीकृष्णाच्या बालपणीच्या आठवणी समोर ठेवल्या जातात. याच क्षणाचे औचित्य साधून शारदा इंटरनॅशनल स्कूलमधील बालगोपाळांनी दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला. प्रारंभी शाळेचे प्राचार्य दत्ता घारगे यांच्या हस्ते कृष्ण पूजन करण्यात आले. यावेळी दहीहंडी, विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची वेशभूषा करून विविध गीतांवर नृत्य सादर केले. नृत्य स्पर्धेत कविता मनोज सताळकर प्रथम तर योगिता सूर्यकांत जाधव हिने द्वितीय क्रमांकाचे आणि अभिनय स्पर्धेत सुप्रिया विकास थिटे हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. श्रीकृष्णाच्या वेशभूषेतील बालगोपाळांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडली. कार्यक्रमाचे संयोजन पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयक विद्या पाल यांनी केले. या उपक्रमाचे रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य घारगे यांनी कौतुक केले. उपप्राचार्य विलास गायकवाड, उपप्राचार्या शीला शेळके व मुख्य समन्वयिका वैशाली गिरवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव पार पडला. यशस्वितेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.



### लालबहादूर शास्त्री विद्यालयात विशाखा समितीची बैठक

**उदगीर, दि. ३० ऑगस्ट-**

येथे लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात विशाखा समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी विशाखा समितीच्या अध्यक्षा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सभासद व माजी विद्यार्थिनी मोहिनी आचोले तर या बैठकीसाठी विशेष उपस्थिती विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांची लाभली होती. बैठकीच्या सुरुवातीलाच विशाखा समितीच्या सचिव अनिता येलमटे यांनी प्रास्ताविकामधून सध्याच्या सामाजिक स्थित्यंतरांची माहिती देत कायदेविषयक जनजागृती व मुलींचे संरक्षण या संदर्भाने विवेचन केले. येष्ठ शिक्षिका प्रमोदिनी रेड्डी यांनी मुलींच्या सुरक्षितते संदर्भात शालेय शिस्त महत्त्वाची असे नमूद केले. यावेळी विद्यालयात मुलीच्या सुरक्षितते संदर्भात परिसरात सीसीटीव्ही लावणे व पोलीस चौकी ची मागणी करणे या संदर्भाने चर्चा झाली. समिती सदस्या प्रीती शेंडे यांनी गुड टच आणि बॅड टच या संदर्भाने मुलींना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे, असे नमूद केले. ज्येष्ठ शिक्षिका शोभा नेत्रगावकर यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे समुपदेशन करण्यासंदर्भात प्रस्ताव ठेवला. समिती सदस्य लक्ष्मी चव्हाण व अनिता मुळखेडे यांनी माता पालक मेळावे या अनुषंगाने मत मांडले. यावेळी मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांनी सीसीटीव्ही व तक्रारपेटी संदर्भात माहिती दिली. तसेच विद्यालयासाठी मुलींची सुरक्षितता प्राधान्यक्रमात असल्याचे नमूद केले. तर अध्यक्षीय समारोपात मोहिनी अचोले यांनी स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेपासून ते पोलीस चौकी पर्यंत विविध विषयावर आपली मते मांडली.

## मराठा समाजाचे अहमदपुरात सामुहिक वर्षश्राद्ध घालून जेलभरो आंदोलन

**त.भा.वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. ३० ऑगस्ट-**

सकल मराठा समाजाच्या वतीने विविध मागण्यांसाठी अहमदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सर्वपक्षीय मराठा नेत्यांचे सामुहिक श्राद्ध घालणे व जेलभरो आंदोलन करण्यात आले.




सकल मराठा समाजाच्या वतीने श्राद्ध घालणे कार्यक्रमात संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामध्ये गेल्या एक वर्षापासून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून तेही ५०% च्या आतून आरक्षण मिळावे, यासाठी लोकशाही मार्गाने अनेक वेळा मराठा सम ाजाच्या वतीने उपोषण केली आहेत. या संपूर्ण वर्षभरामध्ये महाराष्ट्रात विविध मार्गाने आंदोलने केले व अंतरवाली सराटी (जि. जालना) येथे झालेल्या अमाणूष लाठीचार्ज व गोळीबारास एक वर्ष पूर्ण होऊन सुद्धा महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाच्या कोणत्याच मागण्या मान्य केलेल्या नाहीत. त्याउलट शासनाने आंदोलकावरच खोटे दाखल केले आहेत तसेच आंदोलकावरील गुन्हे मागे घेणे व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून आरक्षण देण्याचे वचन सरकारने तीन वेळेस दिले होते. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता तो ही पाळला नाही तसेच ४०० वर्षापूर्वी बांधलेले गढकिल्ले आणखीन मजबुत असून ८ महिन्याखाली बसवलेला छत्रपती शिवाजी म हाराज यांचा पुतळा वाऱ्याने पडला, असे बेताल वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करून मोकळे झाले.

हे अशोभनीय असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील मराठा समाजाचा कोणताही नेता व त्यांच्या पक्ष आरक्षणाच्या बाजूने ठोसाची भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे या सर्वांचा निषेध म्हणून आज छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहमदपूर या ठिकाणी सर्व पक्षीय मराठा नेत्यांचा श्राद्ध घालून आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रा. गोविंद शेळके, प्रा.नाना कदम, प्रा. रोहिदास कदम, प्रा.विनोद माने, शिवशंकर लांडगे , जयराम पवार, देवानंद मुळे आदिंनी यावेळी समाजाच्या वतीने शोक व्यक्त केला. यावेळी यावेळी प्रा. गोविंद शेळके, विजयकुमार बोडके, गणेश पवार, सुनील पवार,माणिक कदम, प्रवीण मुळके, बालाजी कदम जवळगेकर, धनंजय साखरे, श्रीधर तराटे, शिवाजी पाटील, आगलावे, सुनील पाटील, धनराज पाटील , शिवशंकर लांडगे, पिके मुळे, मुकेश पाटील, दत्तात्रय अडसूळ, शैलेश जाधव, शिवाजी पाटील, सतीश नवटके, सिद्धार्थ दापके, राम मुळके, विशाल जाधव, भास्कर जाधव, विजय पवारसह सकल मराठा समाज बांधव उपस्थिती होता. प्रास्ताविक ॲड.आनंद जाधव व सुत्रसंचालन मुकेश पाटील यांनी केले.



## संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त ग्रंथ दिंडी

**तभा वृत्तसेवा -**
**रेणापूर, दि. ३० ऑगस्ट-**

रेणापुर तालुक्यातील पानगाव येथील नाभिक समाजाच्या वतीने शुक्रवारी (दि.३०) सकाळी श्रीसंत सेना महाराजांची महापुजा, नंतर ग्रंथ, तुळसी वृंदावन, ध्वज, पताके, टाळ मृदंगाच्या गजरात भव्य दिव्य ग्रंथ दिंडी काढण्यात आली.

त्यानंतर काल्याचे किर्तन श्री ह.भ.प.भास्कर तुरे महाराज आळंदीकर यांचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येवून सर्व नाभिक समाजाच्या वतीने श्रीसंत सेना महाराजांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शुक्रवारपासून (दि.२३) श्री. संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त भागवत कथा ज्ञानयज्ञ व कीर्तन कार्यक्रम झाला. भागवत कथाकार ह.भ.प.प्रभाकर गिरी महाराज पानगावकर, कीर्तनकार ह.भ.प.व्यंकटी महाराज फावडेवाडीकर, ह.भ.प.ओमकार कठारे (बाल कीर्तनकार) महाराज(भादा) औसा, ह.भ.प.कांतराव पांडे गुरुजी महाराज यांची किर्तन सेवा संप्पन्न झाली.

## विज्ञान मेळावा म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना चालना : प्रदीप दिंडेगावे

**तभा वृत्तसेवा -**
**लातूर, दि. ३० ऑगस्ट-**

शैक्षणिक क्षेत्रामध्ये लातूर पॅटर्न हा सर्वपरिचित आहे परंतु अलीकडे सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सुद्धा लातूरने एक वेगळा ठसा उम टवलेला आहे. शासनातर्फे तालुका, जिल्हा आणि विभागस्तरीय नाट्योत्सव स्पर्धा घेण्यात येत आहे यामध्ये विद्यार्थ्यांमधील कलागुणांना चालना मिळते आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये वाढ घडून येते, असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांनी केले.



लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, श्री म हात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या वतीने विभागस्तर विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विज्ञान नाट्योत्सवाचा उद्घाटन कार्यक्रम महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये झाला. कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वनाने झाली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, पठाण एस.एम, प्रा. परमेश्वर पाटील, परीक्षक प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. संदिपान जगदाळे, प्रा. सुशील कोरे प्रा. ज्ञानोबा आव्हाड, प्रा. कोमल गोमारे प्रा. शिवलिंग नागापुरे उपस्थित होते. प्रास्ताविक सहशिक्षक शिवलिंग नागापुरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. घनश्याम ताडेवार यांनी केले उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सायकल रॅली

**तभा वृत्तसेवा -**
**लातूर, दि. ३० ऑगस्ट-**

राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल च्यावतीने गुरुवारी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. २९ ऑगस्ट हा दिवस प्रसिद्ध हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी केला जातो. या निमित्ताने स्कूलच्या वतीने भव्य अशा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



उपसंचालक आणि जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लाखडे यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर सायकल रॅलीला सकाळी ७:०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथून प्रारंभ झाला. औसा रोड, शिवाजी महाराज चौक आणि मिनी मार्केट मार्गे स्कूलच्या मैदानावर रॅलीचा समारोप झाला. क्रीडा अधिकारी धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, अरविंद चव्हाण, कृष्णा केंद्रे, जयराम मुंडे आणि प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते हुतात्मा स्म ारकाला अभिवादन करून मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

मुख्य अतिथी जगन्नाथ लाखडे यांनी आपल्या भाषणात क्रीडाचे महत्व विशद केले आणि राज्य सरकारद्वारा उत्कृष्ट खेळाडूंना जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांची माहिती दिली. विनोद चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर सुनील म ुनाळे यांनी आभार मानले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, कॅप्टन बीके भालेराव, शैलेंद्र डावळे, सुनिता झुंजे, प्रियंका गडदे आदींनी परिश्रम घेतले.

## ५८ गावातील सभागृहाच्या बांधकामांसाठी ६ कोटींचा निधी

**● आ.अभिमन्यू पवार यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा -**
**औसा, दि. ३० ऑगस्ट-**

अनेक गावांतील मंदिर परिसरात सभागृह बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची म ागणी औसा मतदार संघातील अनेक गावातून करण्यात आली.

गावोगावच्या भाविकांकडून करण्यात येणाऱ्या पाठपुराव्यामुळे पहिल्याटप्प्यात५८गावातीलसभागृह बांधकाम व सुशोभीकरणाची कामे करण्यासाठी मूलभूत सुविधा अंतर्गत ६ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. उर्वरित गावांसाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही आ.अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिली. गेल्या पंचवार्षिकमध्ये आ. अभिमन्यू पवार



यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करुन औसा विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांचा अनुशेष म ोठ्या प्रमाणात भरून काढला आहे. औसा मतदारसंघ विकासाचे एक मॉडेल म्हणून राज्यात नावलौकिक मिळवित असून या पंचवार्षिकम ध्ये भरघोस निधीतून गावोगावी कोट्यवधी रुपयांची विकासकामे पूर्ण होताना दिसत आहेत.

## गटारीवरील डास, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

**● औसा शहरवासियांची नगरपालिकेकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा -**
**औसा, दि. ३० ऑगस्ट-**

औसा शहरात व परिसरात मोकाट कुत्र्यांची होत असलेली वाढ नागरीकांसाठी खुप मोठी समस्या झाली आहे. या मोकाट कुत्र्यांपासुन लहान मुलं व वृध्दांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे. रात्री उशीरा घरी यायचे असेल तर किंवा बाहेर पडले तर मोकाट कुत्र्यांचे मोठे झुंड अंगावर येऊन चावा घेत आहेत.

याचबरोबर शहरातील गटारी तुंबल्याने डास वाढले असून शहरात ताप , खोकला, सर्दीच्या रुग्णांत झपाट्याने वाढ होत आहे



.नगरपालिकेने शहरातील गटारी स्वच्छ करुन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी एम आयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील नाली व गटारे तुडुंब भरले आहेत.यामध्ये जलालशाही चौक ते औटी गल्लीपर्यंतची नाली नेहमी भरलेली असते. यामुळे या भागातीलच नव्हे तर या भागातून ये जा करणाऱ्यांना येथील दुर्गंधीचा सुगंध नाईलाजास्तव घ्यावा लागत आहे .या दुर्गंधीमुळे डासांचे प्रम ाण वाढले असून शहरात ताप व साथीच्या रुग्णसंख्येत नुसती वाढ नसून रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे .यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. एकीकडे पावसाने वाढणाऱ्या डासाच्या संख्येत दुर्गंधीमुळे वाढ होत आहे , नगरपालिकेने शहरातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहवे . यासाठी शहरातील सर्व गटारीची स्वच्छता करुन धुर फवारणी करणे गरजेचे आहे. असे या निवेदनात म्हटले आहे .

शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. दिवसभर व रात्रभर झुंडीने कुत्रे फिरत असून शाळा ,कालेजात जाणारी मुलं व विद्यार्थी आणि वयोवृध्द नागरिकांना भुंकणे, अंगावर चवताळून जात चावा घेण्याचे प्रकार वाढले आहेत. यामध्ये रात्रीच्या वेळी घराकडे येणे किंवा कांही कामानिमित्त घराबाहेर जाणे धोक्याचे होत आहे . यामुळे या मोकाट कुत्र्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्यात यावा .अशी मागणी शहरवासियांच्या वतीने एमआयएमचे औसा प्रमुख मुझ्झफरअली इनामदार यांनी नगरपालिकेकडे केली आहे . अन्यथा नगर पालिकेवर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा मुख्याधिकारी यांना या निवेदनाद्वारे दिला आहे.

## आपल्यातील कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करावा

**● डॉ. अभिजीत यादव; निलंगा महाविद्यालयात व्याख्यान**

**तभा वृत्तसेवा -**
**निलंगा, दि. ३० ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांनी केवळ नियमित अभ्यासक्रमाची तयारी करण्यातच आपला सर्व वेळ न घालवता, बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाच्याही बाहेर जाऊन आपली आवड व सवड यानुसार स्वतःचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करावा. केवळ अभ्यासक्रम, परीक्षा व पदवी एवढ्या पुरतेच आपले उद्दिष्ट मर्यादित न ठेवता आपल्यातील उपजत कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन लातूरच्या राजर्षी शाहू




कॉलेजचे प्रा. डॉ. अभिजीत यादव यांनी केले.

महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने भविष्यामध्ये भौतिकशास्त्रातील विद्यार्थ्यांना संधी या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. कोलपुके होते. यावेळी बोलताना डॉ अभिजीत यादव म्हणाले, भौतिकशास्त्र हे एकमेव असे शास्त्र आहे की, जो सर्व शास्त्रांचा राजा आहे. कारण या विश्वातील सर्व बारीक सारीक घटकांचा व घटनांचा अभ्यास करणारे विज्ञान म्हणजेच पदार्थ विज्ञान होय. म्हणून आपल्यासारख्या हुशार विद्यार्थ्यांचे भविष्य उजळण्यासाठी याभौतिक शास्त्रातील सर्व शाखांची दारे उघडी आहेत. भौतिकशास्त्रातील उच्चशिक्षितांना, संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. यश आणि अपयशांच्या गप्पागोष्टी मध्ये रममान होण्याऐवजी भौतिकशास्त्राच्या उंच कळसाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करा. म्हणजे तुमच्या जीवनाची वाटचाल यशस्वी होईल.

प्रास्ताविक प्रा. डॉ. सी.जे. कदम यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी समीक्षा माने व रोहिणी जगताप यांनी केले तर आभार रत्नशील सोनकांबळे यांनी मानले.

## होमगार्ड सदस्य नोंदणीसाठी झालेल्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा -**
**लातूर, दि. ३० ऑगस्ट-**

लातूर जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणीसाठी बाभळगाव येथील पोलीस मुख्यालय येथे २६ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट या कालावधीत पथकनिहाय होमगार्ड नोंदणी प्रक्रिया घेण्यात आली. यामध्ये उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी, शारिरीक व मैदानी चाचणी घेण्यात आली.

या प्रक्रिये दरम्यान मैदानी चाचणीत दिनांकनिहाय सहभागी झालेल्या उमेदवारांचे तात्पुरते गुणपत्रक https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर करण्यात आले आहे. सहभागी उमेदवारांनी तात्पुरत्या गुणपत्रकाचे अवलोकन करून त्याबाबत काही आक्षेप असल्यास लातूर जिल्हा सम ादेशक होमगार्ड कार्यालयाच्या homeguardlatur123gmail.com ई-मेल आयडीवर किंवा ७५५८६००२२० या व्हॉटस्अप किंवा प्रत्यक्ष जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, मुख्य प्रशासकीय इमारत, बार्शी रोड, लातूर येथे लेखी स्वरूपात ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सादर करावेत.

सायंकाळी ६ वाजेनंतर येणारे आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, असे लातूर जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी कळविले आहे.